# शेरलॉक होम्स ६

## वृषाली जोशी



# शेरलॉक होम्स-6

मूळ इंग्लीश लेखक – ऑर्थर कॉनन डॉयल

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# शेरलॉक होम्स-6

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

शेरलॉक होम्स-6


लेखक : ऑर्थर कॉनन डॉयल

अनुवादिका : वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३ मे २०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शेरलॉक होम्सविषयी



ब्रिटीश लेखक सर आर्थर कॉनन डॉयल, यांच्या सिद्धहस्त लेखणीने निर्माण केलेले, शेरलॉक होम्स हे खासगी गुप्तहेराचे कपोलकल्पित पात्र आहे. निरीक्षणातील अचूकता, गुन्हेगारी शास्त्रातील जाणकारी व तर्कशास्त्रावरील हुकमत, ही त्याची गुन्हा अन्वेषणातील बलस्थाने आहेत. शेरलॉक होम्स हा, सतत तेवीस वर्षे गुप्तहेराचे काम करतो आहे. सतरा वर्षे त्याचा मदतनीस, डॉक्टर जॉन वॉटसन हा त्याच्या बरोबर काम करत असून, वॉटसनच्या लग्नापूर्वी व बायको वारल्यावर, तो आणि शेरलॉक हे दोघेही, २२१, ब, बेकर रस्ता येथे, मिसेस हडसन या मालकीणबाईंकडील सदनिकेत रहात असल्याचे दाखवले आहे. बहुतेक सगळ्या गोष्टी वॉटसनच्या तोंडून कथन केल्या गेल्या आहेत.

A Study In The Scarlet या आर्थर कॉनन डॉयल यांच्या पहिल्या पुस्तकातून हे पात्र उदयास आले व दिवसेदिवस त्याची लोकप्रियता वाढत गेली. काहीजण तर हे कल्पित पात्र नसून खराच माणूस असल्याचे समजू लागले व तो २२१, ब, बेकर रस्ता, येथे खरोखरंच रहातो, असे मानू लागले. रेडिओ व दूरदर्शनवरील नाटके, सिनेमे, शिवाय व्हिडीओ गेम्स, अशी सर्व ठिकाणे; सुमारे शंभर वर्षे, शेरलॉक होम्सने गाजवून सोडली. लंडनमध्ये शेरलॉक होम्स वस्तुसंग्रहालय आहे. सर आर्थर कॉनन डॉयल याच्या जन्मगावी, म्हणजे एडिंबरो येथील पिकार्डो येथे शेरलॉक होम्सचा पुतळाही आहे.

पहिला रहस्यकथा लेखक ॲलन पो याच्या गुप्तहेराची थोडीशी छाप, शेरलॉक होम्समध्ये भासत असली तरी, जोसेफ बेल नावाचा सर्जन, फ्रान्सिस टॅन्की स्मिथ हा पोलीस व सर हेन्री लिटील जॉन हा वैद्यकीय वकील; या खऱ्याखुऱ्या लोकांची छटाही, शेरलॉक या पात्रात कॉननने रंगवलेली दिसते. मॅक्समिलन हेलर हे फ्रेंच लेखक हेन्री कॉव्हेन निर्मित पात्रही शेरलॉक होम्स रंगवण्यासाठी त्याच्याकडून वापरले गेल्यासारखे वाटते. तरीही शेरलॉक होम्स हे अत्यंत गाजलेले, एकमेवाद्वितीय व्यक्तीचित्र असल्याचे मान्य करावेच लागेल.

# प्रस्तावना

पानागणिक उत्सुकता वाढवणाऱ्या रहस्यकथा वाचायला कोणाला आवडत नाहीत? त्याच कारणाने मीदेखील त्या वाचत गेले व मराठी लोकांसाठी त्या अनुवादित कराव्या, असे वाटले. यास्तव हा प्रपंच. या पूर्वी सहा-सहा कथांचे पाच संग्रह प्रकाशित केले. त्यांना वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. म्हणून हा सहा कथांचा सहावा संग्रह!

डॉ. वृषाली जोशी

अर्पणपत्रिका

रहस्ये उकलणाऱ्या शेरलॉक होम्सच्या चातुर्यास

# अनुवादिकेची ओळख



डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व अकरा पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके


सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,


कविता करण्याचा

व शब्दकोडी बनवण्याचा छंद


संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९


चलभाष ९९२१७४६२४५



THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
short story by W. Somerset Maugham
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
4 BOOKS IN ONE
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night



The Sherlock Holmes
शेरलॉक होम्स
वृषाली जोशी



Adventures of
Sherlock
Holmes
शेरलॉक होम्स ४
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE



THE ADVENTURES OF
SHERLOCK HOLMES
शेरलॉक होम्स ३
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE


SHERLOCK
2
HOLMES
शेरलॉक होम्स-२
वृषाली जोशी


शेरलॉक होम्स ५
वृषाली जोशी


वृषाली जोशी
विश्वकथा१


वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३

# वृषाली जोशी यांच्या ई साहित्यवरील प्रकाशित बारा पुस्तकांच्या लिंक्स

1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holms_4_vrishali_joshi.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf
5. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_2_vrishali_joshi.pdf
6. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf
7. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_h_3_vrishali_joshi.pdf
8. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf
9. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_vrishali_joshi.pdf
10. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_3_vrishali_joshi.docx.pdf
11. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_2_vrishali_joshi.pdf
12. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_5_vrishali_joshi.pdf

# कथानुक्रम


| | |
|---|---|
| The Adventure Of Three Students | तीन विद्यार्थ्यांचे साहस |
| The Adventure Of The Golden Pince-Nez | नाकावर क्लिप असलेला सोनेरी चष्मा |
| The Adventure Of Charles Augustus Milverton | चार्ल्स ऑगस्टस मिलव्हेर्टनचे साहस |
| The Adventure Of The Creeping Man | हळूच चालणाऱ्या माणसाचे साहस |
| The Adventure Of The Missing Three Quarter | चुकलेले तीन क्वार्टर |
| The Adventure Of Six Napoleons | सहा नेपोलीयन्सचे साहस |

# The Adventure Of Three Students

# तीन विद्यार्थ्यांचे साहस



‘९५ मध्ये, ज्यात मी आता शिरायची गरज नाही, अशा घटनासाखळीने मला व शेरलॉक होम्सला एका मोठे विद्यापीठ असलेल्या गावात, काही आठवडे घालवावे लागले. त्यावेळी एक लहानसे पण माहितीपूर्ण साहस, आम्ही केले. त्याविषयी सांगतो. त्यातील साद्यंत माहिती सांगतांना, वाचकाला ते महाविद्यालय किंवा गुन्हेगार ओळखू आला असे वाटले, तरी ते फसवे तर्क असू शकतील किंवा त्यामुळे कदाचित कुणाच्या भावना दुखावल्या जाऊ शकतील. इतके दुःखदायक प्रकरण खरे तर काळाच्या पडद्याआड गेले, तर बरे. पण माझा मित्र त्याच्या ज्या

ख्यातीबद्दल प्रसिद्ध होता, ते गुण दाखवणारी ती घटना, खासगीपणा जपून वर्णन करण्यायोग्य आहे. विशेष खासगी असे लोकांचे किंवा जागेचे उल्लेख टाळून, मी ती गोष्ट सांगायचा प्रयत्न करतो. इंग्लिश संस्था स्थापनेसंबंधीचे खूप अवघड असे संशोधनात्मक काम तेव्हा होम्स करत असल्यामुळे, आम्ही वाचनालयाच्या शेजारील छान फर्निचर असलेल्या जागेत रहात होतो. त्या कामाचे निष्कर्ष इतके धक्कादायक आले, की ते कदाचित पुढेमागे माझ्या गोष्टीचा विषय होऊ शकतील. असे झाले की एका संध्याकाळी, आमच्या ओळखीचे एकजण आम्हाला भेटायला आले. सेंट लुक महाविद्यालयातील, व्याख्याता मिस्टर हिल्टन सोमेस. तो उंच, वेगळाच, भावनाशील व पटकन चिडणारा, असा मनुष्य होता. मला तो नेहमी अस्वस्थ वाटे. पण या प्रसंगी, तो इतका अनावर चिडलेला होता, की नक्की काहीतरी स्फोटक घडले असणार, असे वाटत होते.

"मिस्टर होम्स तुमच्या अमूल्य वेळातील काही तास तुम्ही माझ्यासाठी काढू शकाल, असा मला विश्वास वाटतो. आमच्या सेंट लुक महाविद्यालयात एक दुःखदायक प्रसंग घडला आहे. तुम्ही इथेच रहात असल्याने, या खेदकारक बाबतीत तुमचा सल्ला घ्यावा म्हणून मी आलो आहे."

माझा मित्र उत्तरला, "मी आता खूप व्यग्र आहे आणि दुसऱ्या कुठल्या गोष्टीत लक्ष घालू शकत नाही. मला वाटते, तुम्ही पोलिसांची मदत घावी."

"नाही. नाही. प्रिय सर, असे करणे सर्वथा अशक्य आहे. एकदा कायदा तोडला, की मग सगळे बिघडत जाते. परत तो अंमलात आणणे कठीण होते. ही अशी एक केस आहे, की महाविद्यालयाच्या इभ्रतीला धक्का लागू नये म्हणून, हे प्रकरण वाढण्याचे टाळणे फार महत्वाचे आहे. तुमच्या सामर्थ्याविषयी व शक्तीविषयी आम्ही ऐकून आहोत आणि मला मदत करू शकणारे, जगातील तुम्ही एकमेव माणूस आहात. बेकर रस्त्याच्या छान परिसराच्या सवयीला मुकल्यामुळे, माझ्या मित्राची मनस्थिती थोडी बिघडलेली होती. त्याचे माहिती व चित्रे

चिकटवण्याचे बाड, त्याची प्रयोग करण्याची रसायने आणि त्याचा घरभर घातलेला पसारा, याशिवाय तो अस्वस्थ झाला होता.

जेव्हा आमच्या पाहुण्याने उद्दिपित होऊन नाटकी हावभाव करत, त्याची गोष्ट सांगायला सुरवात केली, तेव्हा होम्सने न पटल्यासारखे त्याचे खांदे घुसळले.

“मिस्टर होम्स, मला तुम्हाला हे स्पष्ट केले पाहिजे, की उद्या फोर्टेस्क्यू विद्यावेतनासाठीच्या परीक्षेचा पहिला दिवस आहे. मी एक परीक्षा घेणारा असून, माझा विषय ग्रीक आहे. यात विद्यार्थ्यांनी न वाचलेल्या परिच्छेदांचे भाषांतर करायचे असते. तो प्रश्नपत्रिकेवर छापलेला असतो. तो जर विद्यार्थ्याला आधीच माहिती असेल, तर तो आधी तयारी करू शकेल. म्हणून प्रश्नपत्रिका गुप्त ठेवण्यासाठी खूप काळजी घेतली जाते.

आज साधारण तीन वाजता. या प्रश्नपत्रिका छापून आल्या. थुसायडीडेस (ग्रीक योद्धा) याच्या इतिहासातील एक परिच्छेद त्यात आहे. तो मला काळजीपूर्वक वाचणे जरुरीचे होते, कारण त्यात काही चुका असता कामा नयेत. चार वाजून तीस मिनिटे झाली, तरी माझे काम झाले नव्हते. मी माझ्या एका मित्राला त्याच्या खोलीवर चहासाठी भेटण्याचे वचन दिले होते, त्यामुळे मी माझे काम माझ्या टेबलावर तसेच सोडून, साधारण तासाभराहून अधिक वेळ तिथे गेलो.

“मिस्टर होम्स, तुम्हाला माहिती असेल, की आमच्या महाविद्यालयाला दुहेरी दारे आहेत -- एक लोकरीपासून केलेले हिरवट, जाडसर असे व दुसरे ओकपासून केलेले लाकडाचे जड असे. मी परत येऊन बाहेरील दाराशी गेलो, तेव्हा माझी किल्ली त्याला लावलेली बघून, मी आश्चर्यचकित झालो. क्षणभर मला असे वाटले, की माझ्या हातून किल्ल्या तेथे राहिल्या. पण त्या तर माझ्या खिशात सुखरूप होत्या. गेली दहा वर्षे माझ्याकडे असलेला, संशयातीतपणे प्रामाणिक असा माझा नोकर बॅनिस्टर, याच्याकडेच फक्त माझ्या किल्लीची नक्कल आहे, असे मी समजत होतो. मला चहा हवा आहे का हे विचारण्यासाठी, तो तिथे आला होता. आणि

जातांना निष्काळजीपणे तो किल्ली दारालाच विसरून गेला. मी गेल्यावर काही मिनिटात बहुधा तो आला असावा. इतर वेळी त्याचा विसराळूपणा खपून गेला असता. पण त्या दिवशी मात्र ते फारच वाईट परिणाम करणारे ठरले.

"मी टेबलाकडे पाहताक्षणी मला समजले, की कुणीतरी माझ्या कागदपत्रांमध्ये काही ढवळाढवळ केलेली आहे. तीन लांब चिठ्ठ्यांमध्ये पुरावा दिसत होता. मी त्या एकत्र ठेवल्या होत्या. आता मला असे आढळले, की त्यातील एक जमिनीवर पडलेली होती. दुसरी टेबलाच्या खिडकीजवळील बाजूला होती. आणि तिसरी मात्र मी जशी ठेवली होती तशीच होती."

होम्सने पहिल्यांदाच काही हालचाल केली.

तो म्हणाला, "पहिले पान जमिनीवर, दुसरे खिडकीजवळ व तिसरे, होते तिथेच."

बरोबर, मिस्टर होम्स. तुम्ही मला आश्चर्यचकित केलेत. तुम्हाला हे कसे कळले?"

"हं. तुमचे रुचीपूर्ण सांगणे पुढे चालू ठेवा."

"क्षणभर मला असे वाटले की बॅनिस्टरने अक्षम्य असे स्वातंत्र्य घेऊन, माझ्या कागदपत्रांना हात लावलेला आहे. त्याने खूप मनापासून ते नाकबूल केले. तो खरे बोलत असल्याची, माझी खात्री झाली. दुसरे असे घडले असू शकेल, की कुणी येणाऱ्याजाणाऱ्याने किल्ली दाराला असलेली पाहून, मी तिथे नसल्याचा अंदाज केला असेल व आत शिरून कागद पाहिले असतील. विद्यावेतनाची रक्कम बरीच असल्याने, ती मिळवणे मूल्यवान ठरते. कुणा अप्रामाणिक, अनीतीमान माणसाने धोका पत्करून, त्याच्या ओळखीच्या कुण्या विद्यार्थ्यांचा फायदा करून देण्यासाठी हे केले असावे.

या घटनेने बॅनिस्टर फार नाराज झाला. जेव्हा ही बाब उघडकीला आली, तेव्हा तो जवळजवळ चक्कर येऊन पडला. मी त्याला थोडी ब्रँडी पाजली व खुर्चीवर ठेवले. मी खोलीची खूप काळजीपूर्वक तपासणी केली. मला लगेचच आत शिरलेल्याने मागे खुणा ठेवल्याचे

आढळून आले. खिडकीजवळील टेबलावर पेन्सिलला टोक केल्याचा कचरा पडला होता. तिथे तुटलेले शिसेदेखील पडले होते. नक्कीच त्या हलकटाने घाईघाईने कागदावरील मजकुराची नक्कल करून घेतली होती. असे करतांना पेन्सिलीचे टोकं मोडल्यामुळे त्याला पेन्सिलीला टोक करावे लागले असणार.”

बोलण्याकडे जास्त लक्ष देतांना, त्याचा विनोदी स्वभाव उफाळून आल्याने होम्स बोलला, “उत्तम! नशीब तुझे मित्र दिसते आहे.”

“एवढेच नाही. मला लाल आच्छादन घातलेले नवीन टेबल मिळाले आहे. मी व बॅनिस्टर शपथेवर सांगू शकतो की ते गुळगुळीत व डाग न पडलेले होते. आता त्यात एक तीन इंची ओरखडा दिसतो आहे ---- फक्त ओरखडा नव्हे, तर सरळ चीर गेलेली आहे. अजून सांगायचे तर, टेबलावर मला एक लहानसा मातीचा शंकू दिसला व त्यात लाकूड कापतांना जो कचरा होतो, त्याचे तुकडे भरल्यासारखे वाटले. मला वाटते जो माणूस आत शिरला होता, त्याने या खुणा सोडल्या असाव्यात. त्याच्या पायांचे ठसे किंवा अजून काही खुणा सापडल्या नाहीत. माझे काही डोके चालेनासे झाले, तेव्हा मला अचानक तुम्ही गावात असल्याचे आठवले. मी ताबडतोब हे प्रकरण तुमच्या हवाली करण्यासाठी, निघून आलो. मिस्टर होम्स, कृपया मला मदत करा. तुम्ही पहात आहात, की मी गांगरून गेलो आहे. मला तो माणूस तरी सापडला पाहिजे किंवा मग मी दुसरी प्रश्नपत्रिका काढेपर्यंत, परीक्षा पुढे ढकलली पाहिजे. आणि हे तर स्पष्टीकरण दिल्याशिवाय करता येणार नाही. त्यामुळे भयानक प्रकरण उभे राहील. त्यामुळे महाविद्यालयाच्याच नव्हे तर विद्यापीठाच्या इभ्रतीलाही धक्का लागेल. काही गुप्तता पाळून, गाजावाजा होऊ न देता, मला हे प्रकरण शांतपणे मिटवायची इच्छा आहे.”

उठून त्याचा कोट ठेवत होम्स म्हणाला. “मला यात लक्ष घालायला आवडेल आणि मी तुम्हाला चांगला सल्ला देईन. ही केस अगदीच रुचीपूर्ण नाही, असे नाही. या घटनेनंतर तुम्हाला कोणी भेटले का?”

“हो. माझ्याच इमारतीत रहाणारा दौलत रास नावाचा एक तरुण भारतीय विद्यार्थी, मला परीक्षेसंबंधी काही विचारण्यासाठी आला होता.”

“ज्या परीक्षेला तो बसणार होता, त्यासंबंधी?”

“हो.”

आणि प्रश्नपत्रिका तुमच्या टेबलावर होत्या?”

“माझ्या समजुतीप्रमाणे त्या गुंडाळलेल्या होत्या.”

“पण कदाचित पुरावा म्हणून, त्या ओळखल्या गेल्या असत्या.”

“शक्य आहे.”

तुमच्या खोलीत आणि कुणी नव्हते?”

“नाही.”

“ते पुरावे तिथे असतील, हे कुणाला माहिती होते?”

“छापणारा सोडून, कुणाला नाही.”

“बॅनिस्टरला माहिती होते का?”

“नाही. खात्रीने नाही. कोणालाच माहिती नव्हते.”

“आता बॅनिस्टर कुठे आहे?”

“तो बिचारा बराच आजारी होता. मी त्याला खुर्चीवर ठेऊन तसाच आलो. मी तुमच्याकडे येण्यासाठी घाईत होतो.”

“तुम्ही दार उघडेच ठेवले का?”

“मी प्रश्नपत्रिका प्रथम कुलुपबंद केल्या.”

तर मग मिस्टर हिल्टन सोमेस, आपण असे म्हणू शकतो, की त्या भारतीय विद्यार्थ्याने सांगितल्याशिवाय, त्या कागदांची ढवळाढवळ करणारा माणूस अचानक कसा काय तिथे आला असेल?”

“मलाही तसेच वाटते.”

होम्स अनाकलनीय पद्धतीने हसला.

तो बोलला, “आपण तिथे एक चक्कर मारू. वॉटसन, मानसिक किंवा शारीरिक अशी कुठल्याही प्रकारची तुझ्या अखत्यारीत येणारी ही केस नाही. ठीक आहे. तुला यायचे असेल तर चल. आता मिस्टर सोमेस, तुमच्यामागून आम्ही येतो.”

एका जुन्या महाविद्यालयाच्या बुरशीचे ठिपके असलेल्या आवारात, लांब, बुटकी नक्षीदार खिडकी असलेली अशी आमच्या अशीलाची खोली होती. गोथिक शैलीच्या दारातून आत गेल्यावर, एक झिजलेला दगडी जिना लागला. तळमजल्यावर व्याख्यात्याची बाहेरची खोली होती. त्याच्यावर प्रत्येक मजल्यावर एक असे तीन विद्यार्थी रहात होते. आम्ही समस्येच्या जागी पोचलो, तेव्हा आधीच संधीप्रकाश पडला होता. होम्सने खिडकीशी थांबून, निरखून पाहिले. नंतर चवड्यावर उभे राहून, मान तिरपी करून खोलीत बघितले.

आमचा विद्वान मार्गदर्शक म्हणाला, “तो नक्की या दाराने आला असला पाहिजे. या एका तावदानाशिवाय, दुसरा काही आत जायचा मार्ग दिसत नाही.”

आमच्या नवीन पाहुण्याकडे बघत, वेगळ्या प्रकारे हसत होम्स बोलला, “अरे प्रिय माणसा, “जर इथे काही सापडण्यासारखे नसेल, तर आपण आत गेलेले बरे.”

त्या व्याख्यात्याने बाहेरील दाराचे कुलूप काढून आम्हाला आत घेतले. आम्ही दाराशी उभे राहिलो. होम्स गालीच्याचे निरीक्षण करू लागला.

तो म्हणाला, इथे तर काही खुणा दिसत नाहीत. अशा कोरड्या दिवशी अशी आशा करणे व्यर्थ आहे. तुमचा नोकर बराच सावरलेला दिसतो आहे. तुम्ही त्याला खुर्चीत सोडून आल्याचे म्हणालात. कुठली खुर्ची?"

"ती खिडकीजवळील."

"अस्स. या लहान टेबलाजवळ. तुम्ही आता आत येऊ शकता माझा गालीचा तपासून झाला आहे. प्रथम लहान टेबलाकडे बघू. अर्थात काय झाले, हे अगदी उघड आहे. तो माणूस आत आला. मधल्या टेबलावरून कागदपत्रांचे गठ्ठेच्यागठ्ठे घेतले. ते खिडकीजवळील टेबलावर नेले. कारण तिथून तुम्ही महाविद्यालयाच्या आवारातून येतांना दिसला असतात आणि त्याला पळून जाता आले असते."

सोमेस बोलला, "नाही. त्याला असे करता आले नसते. कारण मी कडेच्या दाराने आलो."

"ओहो, असे केले होय! ठीक आहे. तसेही त्याच्या मनात असणार. मला तीन चिठ्ठ्या बघू. बोटांचे ठसे नाहीत ---- नाही. ठीक आहे. त्याने ही पहिल्यांदा घेतली आणि उतरवून काढली. असे करायला कमीत कमी किती वेळ लागला असेल? पाऊण तास? त्यापेक्षा कमी नाही. मग त्याने तो कागद खाली टाकला व दुसरा घेतला. ते करत असतांनाच जेव्हा तुम्ही परत आलात, तेव्हा ---- अती घाईने त्याला ते बंद करावे लागले. तो तिथे आला नव्हता असे भासवण्यासाठी, सर्व काही होते तसे ठेवण्यास, त्याला वेळच मिळाला नाही. तुम्ही बाहेरील दाराने आलात तेव्हा जिन्यावरील घाईचा पदरव तुम्हाला ऐकू आला नाही, बरोबर?"

"नाही. मला ऐकू आला नाही."

"ठीक आहे. त्याने इतक्या जोराने लिहिले, की पेन्सिलीचे टोक तुटले. आणि तुम्ही बघितल्याप्रमाणे त्याला टोक करावे लागले. पेन्सिल काही साधीसुधी नव्हती. ती सर्वसामान्य आकारापेक्षा मोठी व मऊ शिसे असलेली होती. तिचा बाहेरील रंग गडद निळा होता. चांदीच्या

रंगाने ती बनवणाऱ्याचे नाव कोरलेले होते. आणि राहिलेला तुकडा फक्त दीड इंचाचा वाटतो आहे. मिस्टर सोमेस, आता तुमचा माणूस सापडला. मी जेव्हा म्हटले की त्याच्याकडे आकाराने मोठा पण बोथट चाकू होता, तेव्हा तुम्हाला अजून मदत मिळालेली आहे.”

हा माहितीचा पूर ऐकून, मिस्टर सोमेस फार आनंदित झाले. ते म्हणाले, “मला इतर सर्व मुद्दे समजले. पण खरे तर या लांबीच्या प्रकरणात ---- “

होम्सने NN व त्यानंतर काही नसलेला पेन्सिलचा एक लाकडी तुकडा हातात धरला.

“तुम्ही बघता आहात?”

“नाही. मला अजूनही भीती वाटते आहे की ---- “

“वॉटसन, मी तुझ्याबाबतीत नेहमी अन्याय केला आहे. त्यात दुसरेही आहेत. हे NN काय असेल? ते शब्दाच्या शेवटी आहे. तुला माहिती आहे, की जोहान फॅबर ( JOHANN FABER ) हे पेन्सिल बनवणाऱ्याचे अगदी सर्वसामान्य नाव आहे. हे स्पष्ट होत नाही की JOHA ही अक्षरे जाऊन फक्त NN ही अक्षरे कशी काय उरली? पुढची FABER ही अक्षरे कुठे गेली? त्याने लहान टेबल विजेच्या दिव्यापासून बाजूला ठेवले. “मला वाटते, जर त्याने इथे बसून पातळ कागदावर लिहिले असते, तर पॉलिश केलेल्या पृष्ठभागावर काही खुणा दिसल्या असत्या. नाही. मला तर काही दिसत नाही. आता अजून यात बघण्यासारखे काही आहे, असे मला वाटत नाही. आता मधल्या टेबलाच्या बाबतीत काय ते बघू. मला वाटते तुम्ही म्ह्टल्याप्रमाणे, हे शंकूच्या आकाराचे काळे घट्ट पोकळ असे काही आहे व त्यात लाकूड तासून निघतात तसे तुकडे भरलेले वाटत आहेत. प्रिय माणसा, हे फार कुतूहलजनक आहे. आणि चरा ---- ठळक चीर मला दिसते आहे. चरा पडून सुरवात झाली असावी व त्याचा शेवट चीर पडण्यात झाला. मिस्टर सोमेस, या केसकडे माझे लक्ष वळवल्याबद्दल, मी तुमचा ऋणी आहे. मिस्टर सोमेस, हे दार कुठे उघडते?”

“माझ्या झोपायच्या खोलीकडे.”

“त्या घटनेनंतर तुम्ही तिथे गेलात का?”

“नाही. मी सरळ तुमच्याकडे आलो.”

“मला तिथे पहाणी करायला आवडेल. किती छान जुन्या वळणाची खोली आहे! मी जमिनीचे निरीक्षण करेपर्यंत थोडे थांबा. नाही. काही विशेष दिसत नाही. या पडद्याचे काय? तुम्ही तुमचे कपडे त्यामागे ठेवता. जर या खोलीत कुणाला लपावे लागले, तर तिथेच लपावे लागेल. कारण पलंग फार बुटका आहे व कपड्यांचे कपाट फार उंच आहे. मला वाटते, तिथे कुणी नाही आहे. नाही का?”

होम्सने पडदा बाजूला केला, तेव्हा मी सजग होतो. कारण काही गंभीर, अनपेक्षित असे काही होणार असल्याचे, त्याच्या दृष्टीकोनावरुन व ताठरपणावरुन दिसत होते. तसे पहाता, पडद्यामागून काहीच निघाले नाही. पण खुंट्यांना बांधलेल्या दोऱ्यांवर तीन चार कपडे लोंबत होते. होम्स परत फिरला आणि जमिनीवर अचानक थांबला.

तो म्हणाला, “अरेच्चा! हे काय आहे?”

अभ्यासिकेतील छोट्या टेबलावर होते, तसेच शंकूच्या आकाराचे काळे घट्ट काही तिथे पडले होते. विजेच्या दिव्याच्या प्रकाशात, त्याने तळहात उघडून, त्यावर ते ठेवले.

“मिस्टर सोमेस, तुमच्या पाहुण्याने तुमच्या उठाबसायच्या खोलीशिवाय झोपायच्या खोलीतही काही खुणा सोडलेल्या दिसतात.”

“त्याला तिथे काय काम पडले असेल?”

“मला वाटते, मला पुरेसे समजले आहे. तुम्ही अचानक परत आलात. त्यामुळे तुम्ही दाराशी आल्यावर गांगरून जाऊन, त्याला काय करावे ते कळेना. त्याने त्याला उघडे पाडणारे सर्व काही गोळा केले व तुमच्या झोपायच्या खोलीत लपला.”

बापरे, मिस्टर होम्स, तुम्ही मला असे सांगत आहात का, की मी व बॅनिस्टर इथे बोलत असतांना, आत तो माणूस लपलेला होता, आणि आम्हाला हे माहिती नव्हते?

"असे मला वाटते."

"नक्कीच याला काही पर्याय असेल. मिस्टर होम्स, तुम्ही माझ्या झोपायच्या खोलीची खिडकी तपासली का?"

"नक्षीदार जाळी, शिशाची चौकट, तीन अलग खिडक्या, एक बिजागरीवर डुलणारी आणि माणूस त्यातून जाऊ शकेल इतकी मोठी."

"तेच तर. आवारातील एका बाजूने ती दिसते. पण काही भाग न दिसणारा आहे. तो माणूस तिथून आत शिरला असेल, झोपायच्या खोलीतून जातांना खुणा मागे सोडल्या असतील आणि शेवटी दार उघडे बघून सटकला असेल."

होम्सने अधीरपणे मान हलवली.

तो म्हणाला, "आपण व्यावहारिक दृष्टीकोन ठेऊ. तीन विद्यार्थी हा जिना वापरतात, असे तुम्ही मला सांगितले, ते मला समजले. तेव्हा ते तुमच्या दारावरून जातात का?"

"हो."

ते सर्वजण या परीक्षेला बसणार आहेत का?"

"हो."

"इतर दोघांपेक्षा एका कुणावर, तुमचा जास्त संशय आहे का?"

सोमेस अडखळू लागला.

तो म्हणाला, "हा फार नाजूक प्रश्न आहे. काही पुरावे नसतांना, एखादा कसा काय संशय घेऊ शकेल?"

“तो कोण आहे ते तर सांगा. पुराव्यांचे मी बघतो.”

“मग मी तुम्हाला, त्या तिन्ही विद्यार्थ्यांबद्दल सांगतो. सर्वात खाली रहाणारा गिलख्रिस्ट आहे. तो अभ्यासात आणि खेळातही हुशार आहे. तो रग्बी संघातून व महाविद्यालयाच्या क्रिकेट संघातून खेळतो. अडथळ्याच्या शर्यतीत व लांब उडीत त्याला पदक मिळाले होते. तो छान, तगडा आहे. त्याचे वडील सर जाबेझ गिलख्रिस्ट हे रेसच्या नादापायी बदनाम झाले होते. त्यांनी मुलाला दारिद्यात लोटले. पण तो मेहनती व अभ्यासू आहे. तो नक्की पुढे येईल.

“दुसऱ्या मजल्यावर दौलत रास नावाचा भारतीय विद्यार्थी रहातो. तो इतर भारतीयांसारखा शांत, अबोल व समजण्यास कठीण आहे. तो कामाला चांगला आहे. ग्रीक हा त्याचा कच्चा विषय आहे. तो अभ्यासू व व्यवस्थित मुलगा आहे.

“सर्वात वरच्या मजल्यावर माईल्स मॅक्लारेन रहातो. त्याने काम करायचे ठरवले, तर तो हुशार आहे ---- विद्यापीठातील बुद्धिमान व सर्वात चमकदार विद्यार्थी. पण तो जरा वहावत जाणारा, सुखलोलुप व फारसा तत्ववादी नसलेला आहे. पहिल्या वर्षी एका कार्डाच्या प्रकरणावरुन त्याला जवळजवळ बाहेर हाकलण्यापर्यंत पाळी आली होती. तो हट्टी व मनमानी करणारा व वाईट सवयी असलेला आहे. त्याच्या पूर्वीच्या आयुष्यात तो टिवल्याबावल्या करत हिंडत होता. त्याला परीक्षेची नक्कीच भीती वाटत असली पाहिजे.”

“म्हणजे त्याच्यावर तुमचा संशय आहे तर?”

“इतक्या टोकापर्यंत मी जाणार नाही. पण तिघांपैकी तो असण्याची शक्यता कमी आहे.”

“बरोबर. मिस्टर सोमेस, आता तुमचा नोकर बॅनिस्टर याला बोलवा.”

तो एक लहानसा, गोरा, घोटून दाढी केलेला, पन्नाशीचा इसम होता. त्याच्या शांत चाकोरीबद्ध आयुष्यात अचानक उठलेल्या या वादळाने, तो अजूनही त्रासलेला वाटत होता. त्याचा गुबगुबीत चेहरा नाराजीने ताणल्यासारखा झाला होता व बोटे काही चाळा करत होती.

त्याचा मालक बोलला, “बॅनिस्टर आम्ही या प्रकरणाचा तपास करत आहोत.”

“हो, सर.”

होम्स म्हणाला, “तुझी किल्ली दाराला राहिली, हे मी समजू शकतो, बरोबर ना?”

“हो, सर.”

“नेमके आत प्रश्नपत्रिका पडलेल्या असताना, त्याच दिवशी तुझ्या हातून हे व्हावे, हे जरा वेगळेच वाटते.”

हे माझे दुर्दैव आहे, सर. पण माझ्या हातून काही वेळा हा प्रकार, पूर्वी पण झालेला आहे.’

“तू खोलीत कधी शिरलास?”

“साधारण साडेचार वाजता. मिस्टर सोमेस यांची ती चहाची वेळ आहे.”

“तिथे तू किती वेळ होतास?’

“जेव्हा मी पाहिले की ते आत नाहीत, तेव्हा मी लगेच बाहेर पडलो.”

“तू टेबलावर पडलेल्या प्रश्नपत्रिका पाहिल्यास का?”

“नाही, सर ---- खात्रीने नाही.”

“तू किल्ली दाराला कशी काय विसरलास?

“माझ्या हातात चहाचे ताट होते. मला वाटले मी किल्लीसाठी परत येईन. पण मी विसरलो.”

“बाहेरील दाराला आपोआप लागणारे कुलूप आहे का?”

“नाही, सर.”

“मग ते दार पूर्ण वेळ उघडेच होते?”

“हो, सर.”

“खोलीतील कुणीही बाहेर जाऊ शकले असते.”

“हो, सर.”

“जेव्हा मिस्टर सोमेस परत आले व तुला बोलावले, तेव्हा तू फार त्रासून गेलास का?”

“हो, सर. मी इथे असल्यापासून गेल्या अनेक वर्षात, अशी गोष्ट झाली नव्हती. मला जवळजवळ भोवळच आली.”

“ते मी समजू शकतो. तुला बरे वाटत नाहीसे झाले, तेव्हा तू कुठे होतास?”

“मी कुठे होतो? म्हणजे काय? मी दाराजवळ होतो.”

“हे विचित्र आहे कारण तू कोपऱ्याजवळ त्या खुर्चीत बसलास. या इतर खुर्च्या तू का ओलांडल्यास?

“मला माहिती नाही, सर. मी कुठे बसलो त्याचे मला एवढे काही देणेघेणे नव्हते.”

“मिस्टर होम्स, त्याला त्याबद्दल खरेच विशेष माहिती नाही, असे मला वाटते. कारण तो फार अस्वस्थ दिसत होता ---- खूपच घाबरलेला.”

“तुझा मालक गेल्यावर तू इथेच थांबलास का?’

“फार तर एखादे मिनिट. मग मी दाराला कुलूप लावले व माझ्या खोलीवर गेलो. ”

“तुला कोणाचा संशय येतो?”

“ओहो, मी असे काही सांगायचे धाडस करणार नाही. सर, अशी कारवाई करून स्वतःचा फायदा करून घेणारा कुणी सभ्य गृहस्थ या विद्यापीठात असेल, असे मला वाटत नाही. नाही, सर. माझा यावर विश्वास नाही.”

होम्स म्हणाला, “ठीक आहे, चालेल. ओहो, अजून एक गोष्ट. तू त्या तीन विद्यार्थ्यांपैकी कुणाला काही बिघडले असल्याचे, बोलला नाहीस ना?”

“नाही, सर. एकही शब्द नाही.”

“तुला त्यांच्यापैकी कोणी दिसले नाही का?”

“नाही, सर.”

‘छान. मिस्टर सोमेस, आता तुम्हाला चालत असेल, तर आपण महाविद्यालयाच्या आवारात एक चक्कर मारू.”

अंधारात आम्हाला आमच्या डोक्यावर प्रकाशाचे तीन पिवळे चौकोन दिसले.

वर बघत होम्स म्हणाला, “तुमचे तिन्ही पक्षी त्यांच्या घरट्यात आहेत. अरेच्चा! ते काय आहे? त्यांच्यापैकी एकजण पुरेसा अस्वस्थ दिसतो आहे.”

त्या भारतीयाची पडछाया अचानक खिडकीच्या पडद्यावर उमटली. तो त्याच्या खोलीत खालीवर फेऱ्या मारत होता.

होम्स बोलला, “मला प्रत्येकाकडे डोकावायला आवडेल. असे करता येईल का?’

सोमेस उत्तरला, “काही अडचण नाही. महाविद्यालयातील या सर्वात जुन्या खोल्या आहेत आणि पाहुण्यांनी तिथे जाणे काही जगावेगळे नाही. चला, मी स्वतः तुम्हाला घेऊन जातो.”

आम्ही गिलख्रिस्टचे दार वाजवल्यावर होम्स बोलला, “कृपया, नावे सांगू नका.” आम्ही काय उद्देशाने आलो आहोत, ते समजल्यावर, फिकट पिवळ्या रंगाचे केस असलेल्या, उंच व कृश तरुणाने दार उघडून आमचे स्वागत केले. तिथे खरोखरच उत्सुकता वाटेल, असे काही मध्ययुगीन वास्तुशास्त्राचे घरगुती नमुने होते. होम्सला त्यापैकी एक इतका आवडला की त्याने

त्याच्या वहीत त्याचे चित्र काढायचा आग्रह धरला. त्याची पेन्सिल तुटल्यामुळे यजमानाकडून ती मागून घ्यावी लागली. आणि शेवटी स्वतःचा चाकू काढून तिला टोक करावे लागले. तोच चमत्कारिक अपघात, शांत, छोट्याशा, टोक खाली आलेल्या नाकाच्या, आमच्याकडे संशयाने बघणाऱ्या तरुणाबरोबरदेखील झाला. होम्सचा वास्तुशास्त्रीय अभ्यास संपला, तेव्हा तो अर्थातच आनंदी झाला. होम्स जे पुरावे शोधत होता, ते त्याला सापडले, असे काही मला वाटले नाही. फक्त आमची तिसऱ्या विद्यार्थ्याची भेट निष्फळ ठरली. त्याचे बाहेरचे दार आम्ही वाजवल्यावर उघडले नाही. आणि त्यामागून शिव्यांच्या लाखोलीची बरसात सोडून काहीच ऐकू आले नाही. "तू कोण आहेस, याची मला काही पर्वा नाही. तू खड्ड्यात जा. उद्या परीक्षा आहे आणि मी कुणाचेही काही ऐकणार नाही." एका रागीट आवाजाने गर्जना केली.

आम्ही जिन्यावरून खाली जायला लागल्यावर, रागाने उसळत आमचा अशील उद्गारला, "उद्धट माणूस! अर्थात कोण दार ठोठावते आहे, हे त्याला समजले नाही. पण तरी त्याची वागणूक खरोखर असभ्य व काही वेळा तर संशयास्पद वाटते."

होम्सची प्रतिक्रिया औत्सुक्याची होती.

त्याने विचारले, "तुम्ही मला त्याची उंची किती आहे, हे बिनचूक सांगू शकाल का?"

"मिस्टर होम्स, खरे तर नाही. तो भारतीयांपेक्षा उंच आहे. पण गिलख्रिस्टइतका उंच नाही. माझ्या अंदाजाने तो साडेपाच फूट असावा." होम्स बोलला, "ते फार महत्वाचे आहे. आणि सोमेस, आता शुभ रात्र."

आमचा अशील नवल वाटून व दुःखाने ओरडला, "मिस्टर होम्स, देव माझ्यावर दया करो. तुम्ही एकाएकी मला असे सोडून जाऊ शकत नाही. तुम्हाला माझी अवस्था लक्षात आलेली दिसत नाही. उद्या परीक्षा आहे. आज रात्रीच मला काही कृती केली पाहिजे. एका प्रश्नपत्रिकेबाबत काही घोळ झाला असेल, तर परीक्षा रोखायला हवी. आलेल्या परिस्थितीला तोंड द्यायला हवे."

“तुम्ही जे काही आहे, ते तसेच सोडा. मी सकाळी लवकर येतो आणि याबद्दल बोलतो. मला वाटते तेव्हा मी काही निर्णय घ्यायच्या स्थितीत असेन. मध्यंतरीच्या काळात, काही बदलू नका ---- काहीही बदलू नका.”

“ठीक आहे, मिस्टर होम्स.”

“मनावर काही ताण येऊ देऊ नका. तुमच्या अडचणींमधून आपण नक्की बाहेर पडू. मी काळी माती व टोक केलेल्या पेन्सिलचे अवशेष माझ्याबरोबर घेतो. शुभ रात्र.”

आम्ही बाहेर चौकोनी आवारात आलो, तेव्हा आम्ही परत वर खिडकीकडे बघितले. भारतीय विद्यार्थी अजून फेऱ्या मारत होता. बाकी दोघे दिसत नव्हते.

आम्ही मुख्य रस्त्यावर आल्यावर होम्स म्हणाला, “तर मग वॉटसन, तुला काय वाटते? हा छोटासा खेळ आहे ---- तीन पत्त्यांची जादू म्हणता येईल, नाही का? तीन लोक आहेत. त्यातील एकाचे हे कृत्य असणार. तू त्याचे नाव सांग. काय सांगतोस?”

“तो वरच्या मजल्यावरील वाईट तोंडाचा माणूस! त्याच्याबद्दलचा अहवाल सर्वात खराब आहे. तो भारतीयदेखील लबाड व फसव्या आहे. तो खोलीभर फेऱ्या का मारत होता?”

“त्याचे एवढे काही नाही. अनेक माणसे काही पाठ करतांना तसे करत असतात.”

“पण त्याने आपल्याकडे विचित्र नजरेने पाहिले.”

“जेव्हा दुसऱ्या दिवशी असलेल्या परीक्षेचा अभ्यास तुम्ही करत असता आणि एकेक मिनिट महत्वाचे असते, तेव्हा कुणा परक्या लोकांची गर्दी आली तर, तुम्ही देखील असेच बघाल. नाही. मला त्यात काही वाटत नाही. पेन्सिली व चाकू ---- सर्व काही समाधानकारक होते. पण त्या माणसाने मला कोड्यात टाकले.”

“कोणी?’

“तो नोकर, बॅनिस्टर. यात त्याचा काय डाव आहे?”

“त्याने तर तो खूप प्रामाणिक असल्याचे, माझ्या मनावर ठसवले.”

“माझेही तसेच झाले. तेच कोड्यात टाकणारे आहे. इतका प्रामाणिक माणूस का बर ---- ठीक आहे. इथे या मोठ्या दुकानदारांची नावे आहेत. आपण आपले संशोधन इथून सुरु करू.”

ज्यांचा या घटनेवर परिणाम होईल, असे या शहरात फक्त चार कागद, पेन्सिली इ विकणारे दुकानदार आहेत. त्यातील प्रत्येकाला होम्सने पेन्सिलीला टोक केलेला कचरा दिला आहे व तशाच पेन्सिलची मागणीही केली आहे. सगळ्यांनी ते मान्य केले पण ती पेन्सिल आकाराने फार मोठी असून नेहमी दुकानात असतेच असे नाही, असे ते म्हणाले. माझा मित्र त्याच्या हरण्यामुळे निराश झालेला दिसला नाही. पण त्याने अर्धविनोदी पद्धतीने खांदे घुसळले.

“माझ्या प्रिय वॉटसन, हे चांगले झाले नाही. तरी हा उत्तम आणि एकुलता एक शेवटचा पुरावा आहे. आता काही करायचे राहिले नाही. पण खरे तर मला थोडासा संशय आहे, की त्याशिवायदेखील आपण आपली केस उभी करू शकू. अरे देवा! नऊ वाजायला आले, आणि आपली मालकीण हिरवे वाटाणे साडेसातला उकळवते. वॉटसन, तुझ्या सततच्या तंबाखूमुळे, तुला हाकलले जाण्याची भीती मला वाटते आहे. मी तुझ्या अधःपतनात सहभागी होईन ---- पण नाराज व्याख्याता, निष्काळजी नोकर व तीन हुशार, उद्योगी विद्यार्थि यांची समस्या सोडवण्यापूर्वी नाही.”

त्या दिवशी मग होम्सने त्या बाबतीत काही विचार केला नाही. तरी आमच्या उशीरा झालेल्या जेवणानंतर तो खूप वेळ विचारात गुंग होऊन बसला होता.

सकाळी आठ वाजता, तो माझ्या खोलीत आला. माझी सकाळची आन्हिके नुकतीच उरकली होती.

तो बोलला, “वॉटसन, सेंट लुककडे जायची वेळ झाली आहे. तुला न्याहारीशिवाय चालेल का?”

“खात्रीने.”

“आपण सोमेसला काही आशादायी सांगत नाही, तोपर्यंत तो नाराजीने फार अवघड मनस्थितीत असेल.”

“तुझ्याकडे त्याला सांगण्यासारखे, काही आशादायी असे, आहे का?’

“मला वाटते, आहे.”

“तू निष्कर्षाप्रत आलास का?”

“हो. माझ्या प्रिय वॉटसन, मी हे कोडे सोडवले आहे.”

“पण तुला नवीन काय पुरावे मिळाले?”

“ओहो! सकाळी सहासारख्या अवेळी मी स्वतःला काही उगीचच अंथरुणाबाहेर काढलेले नाही. मी दोन तास कष्ट केले आहेत व निदान पाच मैल चाललो आहे, ते काही ठोस दाखवण्यासाठीच. ते बघ.”

त्याने त्याचा हात दाखवला. त्याच्या तळहातावर तीन शंकूच्या आकाराचे काळ्या, घट्ट, मऊसर मातीचे लहानसे ढीग होते.

“का होम्स, काल तर तुझ्याकडे फक्त दोन होते.”

“आज सकाळी अजून एक मिळाला. एक व दोन क्रमांकाचे जिथे मिळाले, तिथेच हा तिसराही मिळाला. कळले का वॉटसन, चल मित्र सोमेसची काळजी दूर करू.”

तो दुर्दैवी व्याख्याता त्याच्या कार्यालयात पोचला तेव्हा नक्कीच फार दयनीय रीत्या चिंतेत होता. काही तासात परीक्षा सुरु झाली असती. झालेले सर्व लोकांमध्ये जाहीर करावे की

गुन्हेगारांना त्यांचे मूल्यवान विद्यावेतन मिळण्यास परवानगी द्यावी, याबद्दल तो अजून दुग्ध्यात होता. त्याच्या मानसिक कुतरओढीमुळे तो जेमतेम गप्प उभा राहिला होता. होम्स दिसताक्षणी तो हात पसरून, त्याच्याकडे धावत गेला.

“मी देवाचे आभार मानतो, की तुम्ही आलात. मी घाबरत होतो, की तुम्ही सगळे अर्धवट सोडले की काय! मी काय करायचे आहे? परीक्षा होऊन द्यायची का?”

“हो. ती अर्थात होऊन द्यायची.”

“पण तो हलकट?”

“तो स्पर्धेत जिंकणार नाही.’

“तुम्हाला तो माहिती आहे?’

“असे मला वाटते. जर या गोष्टी जगजाहीर व्हायला नको असतील, तर आपण शक्तिमान बनून आपल्याला एका खासगी कोर्टाच्या सुनावणीसाठी तयार केले पाहिजे. कृपया, सोमेस, तुम्ही तिथे उभे रहा. वॉटसन, तू इथे उभा रहा, मी खुर्ची मध्यभागी घेतो. मला वाटते, आता आपण गुन्हेगाराच्या मनात भीती उत्पन्न करत आहोत. कृपया घंटी वाजवा.

बॅनिस्टर आला, आणि आमच्या कोर्टातील आविर्भावाला दचकून मागे सरकला. होम्स म्हणाल, “तू ते दार लाव. बॅनिस्टर, आता आता तू आम्हाला कालच्या घटनेबद्दलचे सत्य कृपया सांगशील का?”

तो माणूस नखशिखांत पांढरा फटक पडला.

“मी तुम्हाला सर्व काही सांगितले आहे. सर.”

“अजून काही सांगायचे नाही?’

“नाही, सर.”

“ठीक आहे. मग मी तुला काही सुचवतो. काल जेव्हा तू खुर्चीत बसलास, ते कोण खोलीत येऊन गेले हे कळू नये म्हणून, काही वस्तू लपवण्यासाठी, बसलास का?”

बॅनिस्टरच्या चेहऱ्यावर भीती पसरली.

“नाही सर, खात्रीने नाही.”

होम्स आत्मविश्वासपूर्वक बोलला, “हे फक्त सुचवले होते. मी हे सिद्ध करू शकणार नाही, हे कबूल करतो. पण असे घडले असणे, शक्य असल्याचे वाटते. कारण मिस्टर सोमेस यांची पाठ वळल्याबरोबर, तू झोपायच्या खोलीत लपलेल्या माणसाला सोडलेस.”

बॅनिस्टरने त्याच्या कोरड्या पडलेल्या ओठांवरून जीभ फिरवली.

“नाही. आत कुणीही नव्हते,सर.’

“ओहो! बॅनिस्टर, हे दयनीय आहे. आजपर्यंत तू खरे बोलत आलास, पण आता तू खोटे बोलत आहेस, हे मला समजले आहे.”

त्या माणसाचा चेहरा लक्षणीय रीत्या आक्रमक झाला.

“तिथे कोणीही नव्हते, सर.”

“ये, बॅनिस्टर, इकडे ये.”

“नाही सर, तिथे कुणी नव्हते.”

“तर मग तू आम्हाला अजून काही माहिती देऊ शकत नाहीस. तू इथे खोलीतच राहशील का? त्या तिथे झोपायच्या खोलीच्या दाराशी उभा रहा. आता मिस्टर सोमेस, मी तुम्हाला गिलख्रिस्टच्या खोलीत जाऊन, त्याला तुमच्या खोलीत आणण्याची विनंती करतो.”

क्षणभराने तो व्याख्याता त्या विद्यार्थ्याला घेऊन आला. तो उंच, बारीक, डौलदार, चपळ, आल्हादक व मोकळ्या मनाचा छान मनुष्य होता. त्याचे त्रासलेले निळे डोळे आमच्यापैकी

प्रत्येकाकडे बघत होते. आणि नंतर पुढील कोपऱ्यावर उभ्या असलेल्या बॅनिस्टरवर अनाकलनीय दुःखाने, स्थिर झाले.

होम्स म्हणाला, "दार लाव. आता मिस्टर गिलख्रिस्ट, इथे फक्त आम्हीच आहोत. बाकी कुणी नाही. आपण काय बोलतो आहोत, हे कुणालाही समजण्याची शक्यता नाही. आपण एकमेकांशी मोकळेपणे बोलू शकतो. मिस्टर गिलख्रिस्ट, आम्हाला असे जाणून घ्यायचे आहे, की कालच्यासारखे कृत्य करायला तू आणि तो आदरणीय माणूस कसे काय तयार झालात?"

तो दुर्दैवी तरुण मनुष्य दोन पाऊले मागे झाला व त्याने बॅनिस्टरकडे एक घाबरलेला दृष्टीक्षेप टाकला.

तो नोकर ओरडला, "नाही मिस्टर गिलख्रिस्ट, मी एकही शब्द बोललो नाही ---- कधीच एकही शब्द बोललो नाही."

होम्स म्हणाला, "पण आता बोलला आहेस. आता हे बघ, बॅनिस्टर हे बोलल्यावर, तुझी अवस्था चमत्कारिक झाली आहे. आता तुला मोकळेपणे कबुलीजबाब द्यावाच लागेल."

गिलख्रिस्टने क्षणभर हात वर करून थरथरणाऱ्या शरीरावर काबू आणायचा प्रयत्न केला. नंतर त्याने टेबलाशेजारी गुडघ्यांवर बसकण मारली व चेहरा हातांमध्ये झाकून घेतला. तो भावनावश होऊन जोरजोरात हुंदके देऊ लागला.

होम्स कनवाळूपणे बोलला, "ये. इकडे ये. माणूस म्हटला की चुकतोच. तुला कोणीही उद्दाम व दुष्ट गुन्हेगार म्हणणार नाही. मी जर मिस्टर सोमेसना काय झाले ते सांगितले, तर कदाचित ते तुला बरे पडेल. मी कुठे वेगळे काही सांगू लागलो, तर तू मला दुरुस्त कर. चालेल का? ठीक आहे. उत्तर देण्याचे कष्ट घेऊ नकोस. मी तुझ्यावर अन्याय करत नाही ना, एवढे बघ.

“मिस्टर सोमेस, तुम्ही मला जेव्हा सांगितले, की बॅनिस्टरने तुमच्या खोलीत प्रश्नपत्रिका असल्याचे कुणाला सांगितले असण्याची शक्यता वाटत नाही, तेव्हाच माझ्या मनात ही केस काही आकार घेऊ लागली. अर्थात छापणाऱ्याला वगळता येते. तो त्याच्या खोलीत कागदपत्र तपासू शकतो. भारतीयाचा मला काही संशय आला नाही. जर प्रश्नपत्रिका गुंडाळलेल्या असत्या, तर त्याला कदाचित ते काय आहे, ते कळले नसते. तर दुसरीकडे असे वाटते, की विचार करण्यास अवघड अशा योगायोगाने तो माणूस खोलीत आला आणि नेमके त्याच दिवशी कर्मधर्मसंयोगाने प्रश्नपत्रिका टेबलावर होत्या, हे मी फेटाळून लावतो. आत आलेल्या माणसाला तिथे

प्रश्नपत्रिका आहेत, हे माहिती होते. हे कसे काय?

जेव्हा मी तुमची खोली बघितली, तेव्हा खिडकीचे निरीक्षण केले. समोरील खोल्यांमधील माणसांच्या देखत कुणीतरी आत शिरला व दिवसाढवळ्या तो आत आहे, असा निष्कर्ष मी काढतो आहे की काय, असे तुम्हाला वाटून तुम्ही माझे चांगले मनोरंजन केलेत. अशी कल्पना मूर्खपणाची होती. कुणी माणूस खिडकीवरुन जातांना खोलीतील मधल्या टेबलावरील कागदपत्र दिसण्यासाठी त्याची उंची किती पाहिजे, हे मी मोजत होतो. मी सहा फूट उंच आहे. आणि मला ते बघण्यासाठी प्रयास पडत होते. त्यामुळे सहा फुटांपेक्षा कमी उंची असणाऱ्यांना ते शक्य नाही. मला असा विचार करायचे कारण असल्याचे, तुम्ही आधीच पाहिले आहे. जर तुमच्या तीन विद्यार्थ्यांपैकी एखादा अशा असामान्य उंचीचा असेल, तर त्यालाच हे शक्य आहे.

“मी आत आलो, आणि तुम्हाला विश्वासात घेतले. तुम्ही गिलख्रिस्टबद्दल तो लांब उडी मारणारा असल्याचे सांगेपर्यंत, कडेच्या टेबलाबाबत मी काही विचार केला नव्हता. नंतर क्षणभरात माझ्या सर्व काही लक्षात आले. आणि मग मला माझ्या अंदाजाला पुष्टी देतील, अशा काही खात्रीशीर पुराव्यांची गरज उरली.

जे झाले ते असे झालेः या तरुणाने त्याची दुपार खेळाच्या मैदानावर घालवली होती. तिथे तो लांब उडीचा सराव करत होता. तो त्याच्या खेळातील बुटांसकट परत आला. त्याला अणकुचीदार टोके असतात, हे तुम्हाला माहिती असेल. तुमच्या खिडकीवरुन जातांना त्याने त्याच्या उंचीमुळे आत कागदपत्र पडलेले पाहिले. ते काय असावेत, याचा अंदाज केला. समजा आपल्याला वाटते आहे, त्याप्रमाणे नसले तरी काही बिघडत नाही, असा विचार करताना तुमच्या नोकराच्या हातून चुकून दाराला लटकून राहीलेली किल्ली त्याला दिसली. झटक्यात त्याला वाटले, की आत शिरावे आणि खरेच त्या प्रश्नपत्रिका आहेत का ते बघावे. हे धोकादायक नव्हते. कारण तो सहज काही विचारायला आला होता, अशी थाप तो मारू शकत होता.

जेव्हा त्याने पाहिले की त्या खरेच प्रश्नपत्रिका आहेत, तेव्हा त्याला मोह पडला. बहुधा गालीचा खराब होऊ नये म्हणून, त्याने त्याचे बूट त्या खिडकीजवळील छोट्या टेबलावर ठेवले. अजून तिथे काय ठेवता येईल?”

तो तरुण बोलला, “मोजे.”

होम्सने विजयाने बॅनिस्टरकडे पाहिले. “त्याने त्याचे मोजे खुर्चीवर ठेवले. नक्कल करण्यासाठी प्रश्नपत्रिकांचे एकेक गठ्ठे घेतले. त्याला वाटले, व्याख्याता मुख्य दाराने येईल आणि त्याला दिसू शकेल. तुम्हाला माहिती आहे, त्याप्रमाणे तो बाजूच्या दाराने आला. आता सुटकेचा मार्ग दिसत नव्हता. तो त्याचे मोजे खुर्चीवर विसरला. पण बूट घाईघाईने घेतले व झोपायच्या खोलीत शिरला. तुम्हाला टेबलावर एका बाजूला पडलेली पण झोपायच्या खोलीच्या दिशेने खोल गेलेली चीर दिसली. बुटांचा टोकेरी तळवा त्या दिशेने खेचत नेल्याचा व गुन्हेगार तिथे लपल्याचा, तो पुरावा होता. बुटांच्या टोकेरी भागामधील माती टेबलावर राहून गेली. तसाच दुसरा नमुना झोपायच्या खोलीत पडला. मी अजून असेही सांगू शकतो, की मी खेळायच्या मैदानावर आज सकाळी गेलो, तेव्हा मी पाहिले की खड्ड्यात चिकट माती असते व त्याभोवती

बारीक वाळू पण असते, ज्यामुळे खेळाडू घसरून पडत नाहीत. मी ते नमुने आणले. मिस्टर, गिलख्रिस्ट, हे सर्व खरे आहे ना?

तो विद्यार्थी ताठ उभा राहून बोलला, "हो सर, हे खरे आहे."

सोमेस ओरडला, "अरे बापरे! तुला यात काही भर घालायची नाही का?"

"हो सर, घालायची आहे. पण हे सर्व उघडकीला आल्यामुळे, मी घाबरून गेलो आहे. मिस्टर सोमेस, मी पूर्ण रात्र अस्वस्थतेने घालवल्यावर, आज सकाळी तुम्हाला लिहिलेले हे पत्र माझ्याकडे आहे. मला माझा गुन्हा उघडकीला आल्याचे, तेव्हा माहिती नव्हते. हे घ्या, सर. तुम्हाला दिसेल की मी लिहिले आहे, "मी परीक्षा न द्यायचे ठरवले आहे. मला ऱ्होडेशिअन पोलीसमध्ये भरती होण्यासंबंधी, पत्र मिळाले आहे. मी ताबडतोब दक्षिण आफ्रिकेला जातो आहे."

सोमेस बोलले, "तू केलेल्या गुन्हयामुळे तुला जो फायदा झाला असता, तो न घेण्याचे तू ठरवल्यामुळे मी आनंदित झालो आहे. पण तुझा इरादा बदलला कसा?"

गिलख्रिस्टने बॅनिस्टरकडे बोट दाखवले.

तो म्हणाला, "या माणसाने मला सच्चाईच्या रस्त्यावर आणले."

होम्स म्हणाला, "बॅनिस्टर, इकडे ये. मी जे म्हणालो, त्यावरून तुला समजले असेल, की फक्त तूच या तरुण माणसाला खोलीतून बाहेर काढू शकला असतास. तो खिडकीतून बाहेर गेला, यावर विश्वास ठेवणे अवघड होते. या गूढ प्रकरणातील शेवटच्या घटना तू स्पष्ट करणार नाहीस का? तू तसे का केलेस, हे देखील सांग."

"सर, हे अगदी साधे होते. तुम्ही कितीही हुशार असलात, तरी हे समजणे अवघड होते. पण तुम्ही म्हणूनच हे जाणू शकलात. मी पूर्वी सर वयस्क जाबेझ गिलख्रिस्टकडे, म्हणजे या तरुणाच्या वडिलांकडे, स्वयंपाकी होतो. जेव्हा त्यांचे दिवाळे वाजले, तेव्हा मी नोकर म्हणून

महाविद्यालयात आलो. पण माझ्या जुन्या मालकाला मी कधी विसरलो नाही. कारण तो सध्या वाईट स्थितीत होता. या जुन्या दिवसांच्या पार्श्वभूमीवर मी त्याच्या मुलाकडे बघत असे. तर मी काल जेव्हा या खोलीत आलो, तेव्हा मी खुर्चीवर मिस्टर गिलख्रिस्टचे मोजे पडलेले पाहिले. ते मोजे माझ्या चांगलेच ओळखीचे होते आणि मला काय झाले ते कळले. जर मिस्टर सोमेसने ते पाहिले असते, तर खेळ खलास झाला असता. मी मोजे झाकत, खुर्चीवर विव्हळत पडलो. मिस्टर सोमेस तुम्हाला भेटायला जायला निघेपर्यंत, मोजे उघडे पडू नयेत म्हणून, मी तिथून मुळीच उठलो नाही. नंतर बिचारा तरुण गिलख्रिस्ट आतील खोलीतून बाहेर आला. त्याने माझे गुडघे धरून, सर्व काही कबूल केले. मी त्याला उठवायचा प्रयत्न केला. सर, मी त्याला वाचवावे, हे जरुरीचे होते. त्याचे वडील त्याला समजावून सांगत त्याच्याशी जसे बोलले असते, की अशाने त्याचा काही फायदा होणार नाही, तसे त्याच्याशी मी बोलणे, हे नैसर्गिक नव्हते का? सर, तुम्ही मला दोष द्याल का?"

होम्स उडी मारून उभा रहात म्हणाला, "नाही, खरेच नाही. बरं सोमेस, मला वाटते, तुमची लहानशी समस्या मी सोडवली आहे. आमची न्याहारी, घरी आमची वाट बघत आहे. वॉटसन, चल. आणि गिलख्रिस्ट, ऱ्होडेशिआला तुझा उज्वल भविष्यकाळ तुझी वाट बघतो आहे. एकदा चूक झाली, तरी भविष्यकाळात तू नक्कीच चांगली प्रगती करशील."

## The Adventure Of The Golden Pince-Nez

## नाकावर क्लिप असलेला सोनेरी चष्मा



१८९४ मध्ये आम्ही काम केलेले तीन मोठे खंड मी बघतो, तेव्हा कबूल करतो, की गोष्टींच्या अमूल्य अशा संग्रहातून, माझा मित्र ज्यासाठी प्रसिद्ध आहे, अशा त्याच्या विशिष्ट शक्ती ज्यातून दिसून येतील, अशा खूप बहारदार गोष्टी शोधून काढणे, हे कठीण काम आहे. मी पाने उलटतो, तेव्हा मला ज्यापासून पळ काढावा अशा लाल अळीच्या व बँकर क्रोसबायच्या भयानक मरणाच्या गोष्टी दिसतात. इथे मला ॲडेल्टनच्या दुःखांतिकेचा तपशीलही दिसतो आणि जुन्या ब्रिटीश मालवाहू जहाजातील विचित्र मालही दिसतो. याच सुमारास प्रसिद्ध स्मिथ मॉर्टीमर मालिका केस, हुरेतचा मागमूस व अटक, महामार्गावरील खून

---- ज्या केसबद्दल होम्सला फ्रेंच राष्ट्राध्यक्षांच्या सहीचे आभाराचे पत्र मिळाले. यापैकी प्रत्येक गोष्ट सांगण्यासारखी आहे. पण एकंदरीत माझे मत असे आहे की यापैकी कुठल्याही केसमध्ये इतक्या रुचीपूर्ण विचित्र बाबी भरलेल्या नाहीत, जितक्या विलोघबाय स्मिथचा असमाधान-कारक मृत्यू, तदनुषंगिक घटनांमुळे त्यावर पडलेला प्रकाश व गुन्ह्यामागील कारणे या यॉक्सले जुन्या जागेच्या केसमध्ये भरलेल्या आहेत.

ती एक रानटी, खोलवर ढवळून काढणाऱ्या भावनांनी भरलेली रात्र होती. पूर्ण संध्याकाळभर होम्स आणि मी शांतपणे बसलो होतो. तो शक्तिमान भिंगानी एकमेकात मिसळलेल्या लिखित कागदाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत होता. मी पद्धतशीर व नेटकेपणाने लिहिलेल्या शस्त्रक्रियेवरील पुस्तकवाचनात गढलो होतो. बाहेर बेकर रस्त्यावर वारा घोंघावत होता. खिडक्यांवर पाऊस जोराने आपटत होता.

निसर्गाच्या लोखंडी पंजात सापडलेला शहराच्या कानाकोपऱ्यात दहा मैलांपर्यंत विचित्र वातावरण होते. शेतावर होणाऱ्या बारीक खड्यांच्या माऱ्यासारखा मारा लंडनभर होत होता. प्राथमिक स्वरूपाचे वादळी वारे वाहत होते. मी खिडकीशी जाऊन, बाहेर सुनसान रस्त्याकडे पाहिले. चिखलमय रस्त्यावर घरांच्या छपरांवर, मधूनमधून दिवे चकाकत होते. ऑक्सफर्ड रस्त्याच्या शेवटाकडून एक गाडी पाणी तुडवत येत होती.

त्याचे भिंग बाजूला ठेवत व कागदाची घडी करत होम्स बोलला, “वॉटसन, आपण आज कुठे बाहेर जायला नको. मी एका बैठकीसाठी पुरेसे काम केले आहे. हे डोळे दमवणारे काम आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे, पंधराव्या अर्धशतकातील भिक्षु वा जोगिणींच्या वृतांताइतके उत्सुकता वाढवणारे दुसरे काहीच नाही आहे. हॅलो! हॅलो! हे काय आहे?”

सं सूं वाऱ्याच्या आवाजात, घोड्यांच्या खुरांचा आवाज आला. त्यापाठोपाठ चाके घासल्याचा आवाज आला. मी पाहिलेला टांगा आमच्या दाराशी थांबला.

त्यातून एक मनुष्य उतरल्यावर मी म्हटले, “याला काय हवे असेल?”

"हवे असेल? त्याला आपण हवे असू आणि आपल्याला हवेचा सामना करण्यासाठी, मोठा कोट, मफलर व गमबूट हवे आहेत. तरी जरा थांब. इथे टांगा आला आहे. अजून आशा आहे. त्याने ते ठेवले असेल. जर त्याला आपण यायला हवे असेल, तर माझ्या प्रिय माणसा, खाली धाव व दार उघड. सगळे गुणी लोक खूप वेळ झोपलेले असतात."

मध्यरात्री आलेल्या आमच्या पाहुण्यावर जेव्हा हॉलचा उजेड पडला, तेव्हा त्याला ओळखायला मला वेळ लागला नाही. तो तरुण स्टॅन्ले हॉपकीन्स, होतकरू गुप्तहेर, होता. त्याच्या व्यावसायिक आयुष्यात होम्सने अनेक वेळा खूप रस दाखवला होता.

त्याने उत्सुकतेने विचारले, "तो आत आहे का?"

वरून होम्सचा आवाज आला, "प्रिय सर, वरती या. मला अशी आशा आहे की

अशा रात्रीसाठी तुझ्याकडे काही महत्वाकांक्षी बेत नसतील."

तो गुप्तचर जिना चढला, आणि आमचा दिवा त्याच्या रेनकोटवरून परावर्तित

झाला. मी तो काढायला त्याला मदत केली. होम्सने शेकोटीतील विस्तवातील लाकडे वरखाली केली.

तो म्हणाला, "प्रिय हॉपकीन्स, आता तुझे पाऊले वर करून शेक. ही सिगरेट घे. अशा रात्रीसाठी गरम पाणी व लिंबू चांगले आहे, अशी शिफारस डॉक्टरांनी केली आहे. अशा वादळी हवेत तू आलास, त्याअर्थी तसेच महत्वाचे काम असले पाहिजे."

"मिस्टर होम्स, ते खरे आहे. मी तुम्हाला सांगतो, माझी दुपार फार गडबडीची गेली. तुम्ही अलीकडील वर्तमानपत्रात यॉक्सले केसबद्दल काही पाहिलेत का?

"पंधराव्या शतकानंतर आजपर्यंत मी काही पाहिलेले नाही."

"ठीक आहे. एक परिच्छेद आला होता आणि तो सर्व चुकीचा होता. तेव्हा तुम्ही काही गमावले नाहीत. मी त्या केसमध्ये अजून काही काम करायला सुरवात केली नाही. ते गाव रेल्वे रुळांपासून तीन मैलांवर व चॅथमपासून सात मैलांवर असलेल्या केंट इथे आहे. मला ३. १५ ला तार आली. मी जुन्या यॉक्सले येथे ५ ला पोचलो. तपास केला व गाडीने चेरिंग क्रॉसला परत आलो. तेथून टांग्याने सरळ तुमच्याकडे आलो."

"याचा अर्थ मला वाटते, तुझ्या केसबद्दल तुला पुरेसा उलगडा झालेला नाही, बरोबर?"

"याचा अर्थ मला केस ओ नाम ठो, काहीही समजलेली नाही. मी आतापर्यंत पाहिलेल्या केसेसमध्ये ही फार गुंतागुंतीची केस आहे, एवढेच मला समजले आहे. तरीही पहिल्याप्रथम ती इतकी साधी सोपी वाटली, की त्यात कुणीच चुकू शकणार नाही. मिस्टर होम्स यात काही उद्देशच सापडत नाही. त्याचाच मला त्रास होतो आहे. ---- उद्देश समजल्याशिवाय मी माझा तपास सुरु करू शकत नाही. इथे एक मनुष्य मेला आहे ---- ते कुणी नाकारत नाही पण कुणी त्याला का त्रास द्यावा, हे काही कळत नाही."

होम्सने सिगारेट पेटवली व खुर्चीत मागे रेलून बसला.

"त्याबद्दल आम्हाला ऐकू दे."

स्टॅन्ले हॉपकीन्स म्हणाला, "मला सर्व बाबी स्पष्ट झाल्या आहेत. पण त्याचा अर्थ काय, हे मला समजून घ्यायचे आहे. मला समजल्याप्रमाणे गोष्ट अशी आहे. काही वर्षांपूर्वी हे गावाकडचे घर, यॉक्सले जुनी जागा, प्राध्यापक कोरम नावाच्या एका वयाने मोठ्या माणसाने विकत घेतली. तो अपंग होता. अर्धा वेळ अंथरुणावरच असे. उरलेला अर्धा वेळ काठी घेऊन घरभर फिरत असे. किंवा चाकांच्या खुर्चीत माळी त्याला फिरवत असे. तो शेजाऱ्यापाजाऱ्यांचा आवडता होता. ते तिथे येऊन बसत. तो विद्वान मनुष्य असल्याचे बोलले जाई. त्याच्याकडे एक मिसेस मार्कर नावाची वयस्क घर राखणारी होती व सुसान टार्लटॉन नावाची नोकराणी होती. तो आल्यापासून या दोघी त्याच्याबरोबर होत्या. त्या दोघी चांगल्या चारित्र्याच्या वाटत. प्राध्यापक

एक विद्वत्तापूर्ण पुस्तक लिहित होता. एक वर्षापूर्वी त्याला एक सचिव नेमायची गरज वाटली. पहिले दोन त्याने ठेवलेले सचिव, काही टिकले नाहीत. पण तिसरा मिस्टर विलोघबाय स्मिथ, विद्यापीठातून बाहेर पडलेला तरुण मनुष्य, त्याच्या मालकाला हवा तसा होता. प्राध्यापक सांगे ते सकाळभर लिहून घ्यायचे असे आणि संध्याकाळी सहसा दुसऱ्या दिवशी संदर्भासाठी लागणारे लिखाण शोधण्यात जात. या मिस्टर विलोघबाय स्मिथला केंब्रिजचा तरूण म्हणून किंवा उपिंगहॅमचा मुलगा म्हणून, प्राध्यापकाविरुद्ध काही तक्रार नव्हती. तरीही आज सकाळी त्या मुलाचा प्राध्यापकाच्या अभ्यासिकेत मृत्यू ओढवला. तो खून असल्याचे वाटत होते."

खिडक्यांमध्ये वारा घोंघावत होता. तो तरुण इन्स्पेक्टर सावकाशीने त्याची गोष्ट कथन करत असतांना, होम्स आणि मी शेकोटीजवळ आलो.

"बाहेरच्या संपर्कापासून अलिप्त व मोकळे असलेले असे घर, तुम्ही पूर्ण इंग्लंडमध्ये

पाहिले नसेल. आठवडाभरात कोणी बागेचे गेट उघडून कुठे जात नसे. प्राध्यापक त्याच्या कामात बुडालेला असे. त्याशिवाय त्याला दुसरे काही आयुष्य नव्हते. तरूण स्मिथला आसपासचे कुणी माहिती नव्हते. तो त्याचा मालक त्याला ठेवे, तसा रहात असे. त्या दोन्ही कामवाल्या बायकांना, घरातून घेण्यासारखे काही नव्हते. मॉर्टीमर माळी प्राध्यापकाला, चाकाच्या खुर्चीतून फिरवत असे. तो सैन्यातील कैदी होता व उत्तम चारित्र्याचा होता. तो घरात रहात नसे, तर बागेच्या टोकाला असलेल्या तीन खोल्यांच्या खोपटात रहात असे. यॉक्सले जुन्या जागेच्या ठिकाणी एवढेच लोक रहात. मुख्य लंडनपासून हे घर चॅथम रस्त्याने शंभर यार्डांवर होते. त्याला कुलूप नसे आणि आत यायला कुणालाही बंदी नव्हती.

आता मी तुम्हाला या घटनेबद्दल काही सांगू शकणाऱ्या एकुलत्या एक अशा, सुसान टार्लटॉनचा वृतांत कथन करतो. दुपारी अकरा ते बाराच्या दरम्यान, ती वरच्या मजल्यावरील पुढील बाजूस असलेल्या झोपायच्या खोलीत पडदे लावत होती. प्राध्यापक कोरम अजून

झोपलेले होते. कारण जेव्हा हवा खराब असे, तेव्हा ते दुपारी लवकर उठत नसत. मिसेस मार्कर घराच्या मागील बाजूस काही काम करत होती.

विलोघबाय स्मिथ उठाबसायला वापरे, त्या त्याच्या झोपायच्या खोलीत होता. पण नोकराणीने त्याला पॅसेजमधून तिच्या असलेल्या खोलीच्या खाली असणाऱ्या अभ्यासिकेकडे जातांना ऐकले. ती म्हणते की जरी तिने त्याला पाहिले नाही, तरी त्याच्या चपळ विशिष्ट चालीवरुन तो नक्की तोच होता. तिने अभ्यासिकेचे दार लावलेले ऐकले नाही. पण नंतर तिथून मोठे भीतीदायक किंचाळणे ऐकू आले. ते रानटी, घोगऱ्या आवाजातील अनैसर्गिक व विचित्र असे किंचाळणे होते. ते बाईचे होते की पुरुषाचे ते समजले नाही. त्याच क्षणी काही जड पडल्याचा आवाज झाला आणि घर हादरले. मग सर्व शांत झाले. नोकराणी क्षणभर एका जागी खिळून राहिली. मग धीर गोळा करून ती खाली धावली व अभ्यासिकेचे बंद दार उघडले. आतमध्ये तरुण विलोघबाय स्मिथ जमिनीवर पडला होता. पहिल्यांदा तिला काही जखम दिसली नाही. पण ती त्याला उठवायला गेली, तेव्हा त्याच्या मानेखालून रक्त येतांना दिसले. तिथे लहानशी, पण खोल जखम झाली होती. मेंदूला व मानेला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत भोसकले गेले होते. हत्यार शेजारी गालीच्यावर पडले होते. तो जुन्या पद्धतीच्या लिहायच्या टेबलात असणारा, मेणाने वस्तू बंद करतांना वापरला जाणारा, हस्तिदंती मूठ असलेला लहान धारदार चाकू होता. तो प्राध्यापकाच्या स्वतःच्या टेबलामधील होता.

पहिल्यांदा नोकराणीला वाटले की तरुण स्मिथ आधीच मेलेला आहे पण त्याच्या कपाळावर पाणी मारल्यावर त्याने क्षणभर डोळे उघडले. तो पुटपुटला, “प्राध्यापक, ---- ती ती होती.” नोकराणी शपथेवर ते तसेच शब्द होते, असे सांगते. तो मुश्किलीने अजून काही बोलायचा प्रयत्न करत होता व त्याने उजवा हात हवेत वर उचलला होता. नंतर तो मरून पडला.

मध्यंतरीच्या काळात मिसेस मार्कर पण तिथे येऊन दाखल झाली. पण तोपर्यंत स्मिथ मेलेला होता. सुसानला प्रेताजवळ ठेऊन ती प्राध्यापकच्या खोलीकडे घाईघाईने गेली. तो भयंकर त्रासून अंथरुणावर उठून बसलेला होता. कारण त्याला जे आवाज आले, त्यावरून त्याला काही भयानक घडल्याचा संशय आला होता. मिसेस मार्कर खात्रीने सांगते आहे, की प्राध्यापक अजून रात्रीच्या कपड्यात होता. त्याला मॉर्टीमरच्या मदतीशिवाय, कपडे घालणे खरेच शक्य नव्हते. मॉर्टीमरला बाराला यायला सांगितलेले असे. प्राध्यापकाने लांबून ओरडण्याचा आवाज ऐकला. पण अजून काही त्याला माहिती नव्हते. तरुण माणसाच्या शेवटच्या शब्दांचा अर्थ, तो सांगू शकत नव्हता. पण त्याने ते शब्द बिघडलेल्या मानसिक स्थितीत उच्चारले असावेत, असे त्याला वाटत होते. त्याचा विश्वास होता, की विलोघबाय स्मिथला कुणीही शत्रू नव्हता. गुन्ह्याचे कारण काय असावे, ते तो सांगू शकत नव्हता. त्याने प्रथम काय केले, तर मॉर्टीमरला स्थानिक पोलिसांना बोलवायला पाठवले. नंतर काही वेळाने मला बोलावले गेले. मी तिथे जाईपर्यंत काही हलवले नव्हते. सक्त ताकीद दिली गेली होती, की कोणीही घराकडे जाणाऱ्या वाटेवरून चालू नये. मिस्टर शेरलॉक होम्स, तुमच्या कल्पना प्रत्यक्षात आणून बघायला चांगली संधी आहे. याहून अजून काय हवे?”

माझा मित्र काहीसे कडू हसत बोलला, “मिस्टर शेरलॉक होम्स सोडून सगळे काही तिथे होते. ठीक आहे आपण याबद्दल ऐकू. तू काय काय काम केलेस?”

“मिस्टर होम्स, प्रथम मला तुम्हाला विचारले पाहिजे, की तुम्ही या साधारण स्वरूपाच्या नकाशावर लक्ष टाकाल का? यात प्राध्यापकाची अभ्यासिका आणि इतर खोल्या, बाग वगैरेच्या जागा दाखवल्या आहेत. हे बघून तुम्हाला माझ्या तपासासंबंधी बाबी कळतील.”

त्याने तो दुमडलेला नकाशा उघडून दाखवला. हा फक्त महत्वाची ठिकाणे दाखवणारा आहे व मोजूनमापून बनवलेला नाही. नंतर तुम्ही पत्यक्ष सगळे बघालच. पहिल्यांदा असे गृहीत धरू की खुनी घरात शिरला, तर तो किंवा ती कसे शिरले असतील? संशयातीतपणे बागेच्या

वाटेने. व मागील दाराने. तिथून अभ्यासिकेत जायला जवळचा रस्ता आहे. दुसरा कुठलाही मार्ग गुंतागुंतीचा असू शकतो. नंतर पळून जाण्याचा मार्गदेखील तोच असला पाहिजे. कारण दुसऱ्या मार्गात सुसान उभी होती व दुसरा सरळ प्रोफेसरच्या झोपायच्या खोलीच्या दिशेने जातो. त्यामुळे मी माझे लक्ष बागेतील रस्त्याकडे वळवले. तो नुकत्याच पडलेल्या पावसाने ओला झाला होता आणि नक्कीच पावलांच्या खुणा दाखवू शकला असता.

मी एका सावधानता बाळगणाऱ्या हुशार गुन्हेगाराचा माग काढत असल्याचे, तपासात माझ्या लक्षात आले. मला वाटेवर पाऊलखुणा सापडल्या नाहीत. पण त्या वाटेने कोणीतरी गवताच्या कडेने गेले, एवढे कळत होते. मागे खुणा राहू नयेत, म्हणूनच त्याने असे केले असावे. काही ठसे वगैरे मला सापडले नाहीत. पण गवत वाकलेले समजत होते. तो नक्की खुनीच असणार. कारण त्या दिवशी सकाळी माळी किंवा कुणीही तिथे आले नव्हते. रात्रीच पाऊस सुरु झाला होता."

होम्सने विचारले, "एक मिनिट, हा रस्ता कुठे जातो?"

"मुख्य रस्त्याकडे."

"तो किती लांब आहे?'

"साधारण शंभर यार्ड असेल."

"गेटजवळ तुला पाऊलखुणा नक्की सापडल्या नाहीत?"

"दुर्दैवाने तिथे फरशा बसवलेल्या आहेत.'

"ठीक आहे. निदान रस्त्यावर?"

"नाही. तिथे पाणी साठले होते.'

"अरेरे! ठीक आहे. गवतावरील खुणा जाणाऱ्या होत्या की येणाऱ्या?"

"हे सांगणे अशक्य आहे. त्या तितक्या ठळक नव्हत्या."

"पाऊल मोठे होते की लहान?"

"तसा फरक समजणे अवघड होते."

होम्सने अधीरतेचा उद्गार काढला.

तो पुढे बोलला, "तेव्हापासून पाऊस कोसळतो आहे व वादळ सुटले आहे. आता तो कागद वाचणेही अवघड आहे. पण त्याला काही इलाज नाही. तुला काहीच धागेदोरे सापडत नाहीत म्हटल्यावर, तू काय केलेस?"

"मला वाटते मिस्टर होम्स, मी बरेच काही ठरवले. मला माहिती होते, की कोणीतरी घरात अगदी काळजीपूर्वक प्रवेश केला होता. नंतर मी पॅसेज तपासला. त्यावर झावळ्यांचा गालीचा घातलेला आहे. त्यावर काहीही खुणा उमटल्या नव्हत्या. मग मी अभ्यासिकेत आलो. त्यात थोडेसे फर्निचर आहे. तिथे मुख्यत्वे, त्यात खण असलेले एक मोठे लिहायचे टेबल आहे. त्यात मध्ये छोटे कपाट असलेली खणांची दुहेरी ओळ आहे. खण उघडे होते. कपाट कुलूपबंद होते. बहुतेक खण नेहमी उघडेच असतात. त्यात काही किमती सामान ठेवलेले नसते. पण तिथे काही उचकाउचकी केलेली दिसली नाही. प्राध्यापकाने खात्रीपूर्वक सांगितले की तेथून काही गेले नाही. म्हणजे एवढे नक्की आहे, की चोरी झालेली नाही.

"आता मी तरूण माणसाच्या प्रेताकडे येतो. ते खणांच्या थोडे डावीकडे पडले होते. ते मी नकाशात दाखवले आहे. चाकू मानेच्या उजवीकडे मागून पुढे असा पडलेला होता. त्यामुळे तो त्याने स्वतःच मारून घेतलेला असण्याची शक्यता वाटत नव्हती."

"होम्स म्हणाला, "जर तो चाकूवर पडला नसेल तर."

“बरोबर. ते माझ्या मनात येऊन गेले. पण चाकू प्रेतापासून काही फुटांवर पडलेला आढळला. त्यामुळे ते शक्य नाही. मग आता मरणाऱ्या माणसाचे शब्द व शेवटी मृत माणसाच्या उजव्या हातात घट्ट धरलेला असा सापडलेला महत्वाचा पुरावा.”

स्टॅन्ले हॉपकीन्सने खिशातून एक लहानसे कागदी पाकीट काढले. ते उघडून त्याने त्यातून नाकावर क्लिप असलेला सोनेरी चष्मा काढला. त्याच्या दोन्ही टोकांपासून काळी रेशीम टोके लोंबत होती. तो म्हणाला, “विलोघबाय स्मिथची नजर निर्दोष होती. हा त्याच्या किवा खुन्याच्या चेहऱ्यावरून ओढला गेला असेल, अशी शक्यता वाटत नव्हती.

शेरलॉक होम्सने चष्मा हातात घेतला. तो रस घेऊन, नीट निरखून बघितला. त्याने तो स्वतःच्या नाकाला लावला. त्यातून वाचायचा प्रयत्न केला. खिडकीशी जाऊन रस्ता बघायचा प्रयत्न केला. दिव्याच्या प्रकाशात, त्याचे सखोल निरीक्षण केले आणि गालातल्या गालात हसून, टेबलाशी बसून, एका कागदावर काही ओळी लिहिल्या. त्याने तो कागद स्टॅन्ले हॉपकीन्सला दिला.

तो बोलला, “मी तुझ्यासाठी जास्तीत जास्त चांगले, एवढे करू शकतो. याचा काही उपयोग होऊ शकेल.”

चकित झालेल्या गुप्तहेराने मजकूर मोठ्याने वाचला. तो असा होताः

उच्चभ्रू बाईसाहेबांसारखे कपडे घातलेल्या एका चांगल्या बाईची गरज आहे. तिचे नाक उल्लेखनीय रित्या जाड हवे. त्याच्या दोन्ही बाजूला डोळे जवळ हवेत. आठ्या असलेले कपाळ हवे. ऐटीचे हावभाव हवेत व बहुधा गोल खांदे हवेत. गेल्या काही महिन्यात तिने निदान दोनदा डोळ्यांच्या डॉक्टरला भेट दिलेली हवी. तिचा चष्मा खूप नंबरचा असल्यामुळे व डोळ्यांच्या डॉक्टरांची संख्या जास्त नसल्यामुळे, तिला शोधून काढणे कठीण जाऊ नये.”

हॉपकीन्सला आश्चर्यचकित झालेले बघून होम्स हसला. ते हसू माझ्यावरही उमटले असणार. तो बोलला, “हा माझा अगदी साधा तर्क आहे. चष्म्यापेक्षा, विशेषतः अशा उल्लेखनीय चष्म्यापेक्षा, निष्कर्ष काढायला सोपी अशी दुसरी वस्तू शोधून काढणे, अवघड आहे. त्याचा नाजुकपणा बघून आणि अर्थात मरणाऱ्या माणसाच्या शब्दांवरून, तो एका स्त्रीचा असल्याचे अनुमान मी काढले. ती उच्चभ्रू व चांगले कपडे केलेली असल्याचा निष्कर्ष, मी तो चष्मा सोन्यात केलेला असल्याने काढला.

असा चष्मा घालणारी बाई गबाळी व घाणेरडी असणे शक्य नाही. तुमच्या नाकासाठी क्लिप फार फताड्या आहेत. त्यामुळे त्या बाईचे नाक फताडे असल्याचे समजते आहे. असले नाक साधारणपणे बुटक्या व नितळ कांती नसलेल्या लोकांचे असते. पण मी वर्णन केल्यासारखे असेल, असे नाही. अपवाद असू शकतात. माझा स्वतःचा चेहरा अरुंद आहे तरी माझे डोळे चष्म्याच्या मध्यभागी किंवा निदान मध्यभागाच्या जवळ नाहीत. त्यामुळे त्या बाईचे डोळे नाकाच्या दोन्ही बाजूला अगदी जवळ असणार. वॉटसन, तुला हे समजले असेल, की चष्म्याच्या काचा आतून खोलगट असून जास्त जाड व शक्तिमान आहेत. त्या बाईची नजर आयुष्यभर खूपच खराब असणार. ती तशी असल्याचे कपाळ, पापण्या व खांद्यांवरून दिसते आहे.”

मी म्हणालो, “हो. मला तुझे प्रत्येक वाक्य पटते आहे. तरीही मी कबूल करतो, की डोळ्यांच्या डॉक्टरला दोनदा भेट दिल्याचे तू कसे काय म्हणालास.”

होम्सने चष्मा त्याच्या हातात घेतला.

तो बोलला, “तुझ्या लक्षात येईल की नाकावरील दाब कमी व्हावा म्हणून क्लीपला खाली बुचाचे छोटे तुकडे लावलेले आहेत. त्यातील एक रंगहीन असून थोडा झिजलेला वाटतो. पण दुसरा नवीन आहे. त्यामुळे हे उघड आहे की तो पडल्यामुळे नवीन बसवलेला आहे. त्यापैकी

जुना आहे तो तिथे काही महिनेच असणार, असे मला वाटते आहे. दोन्ही एकमेकांशी बरोबर जुळत आहेत. त्यावरून असे वाटते की ती बाई डोळ्यांच्या डॉक्टरकडे दोनदा गेली असणार.

मोठ्या आनंदाने होम्सची स्तुती करत, हॉपकीन्स ओरडला, "देवा रे, किती छान! इतका पुरावा माझ्या हातात असतांना, मला काहीच समजले नाही. मी आता लंडनमधील किंवा जवळील डोळ्यांच्या डॉक्टरकडे जातो."

"अर्थात तू जावेस. तुला केसबद्दल अजून काही सांगायचे आहे का?"

"काही नाही, मिस्टर होम्स. मला वाटते आता तुम्हाला, माझ्याइतकेच माहिती आहे ---- कदाचित जास्त. आम्ही ही चौकशी केली, की गावातील रस्त्यांवर किंवा रेल्वे स्टेशनवर कुणी परका इसम आढळला का, तर असे कोणी आढळले नसल्याचे आम्हाला समजले. गुन्ह्याच्या जागेवरील सर्व वस्तू आपल्याला मिळाल्या की नाही, याबद्दल मी साशंक आहे. कोणीच खून करण्याचा हेतू सांगू शकत नाही."

"ओहो! आता मी तुला मदत करू शकत नाही. पण मला वाटते तू आम्हाला उद्या बोलावशील, नाही का?"

"मिस्टर होम्स, मी काही फार मागणी करत नाही आहे. चेरिंग क्रॉसपासून सकाळी सहा वाजता गाडी आहे. आपण यॉक्सले जुन्या जागेला आठ ते नऊच्या दरम्यान पोचू शकू."

"ठीक आहे तर मग. तुझ्या या केसमध्ये नक्कीच खूप उत्सुकता वाढवणारे, असे काही दिसते आहे. मला त्यात लक्ष घालायला आवडेल. तर आता एक वाजायला आला आहे. आपल्याला काही तासांची झोप मिळू शकते. तू इथे शेकोटीसमोरील सोफ्यावर झोपू शकतोस. आपण सकाळी निघण्यापूर्वी, मी माझा स्पिरीटचा दिवा पेटवून तुला एक कप कॉफी देऊ शकतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी जोरदार वारे वहात होते. आम्ही आमचा प्रवास सुरु केला ती एक कडू सकाळ होती. थेम्स नदीपासून दूरपर्यंत पाणी साचलेल्या उदास भागात, थंड हिवाळ्यातील सूर्य उगवत होता. आमच्या व्यवसायाच्या सुरवातीच्या काळातील, अंदमान बेटावरील रहिवाशांचा केलेला तपास मला आठवला. लांबलचक व त्रासदायक प्रवासानंतर आम्ही, चॅथमपासून काही तासांवर असलेल्या एका लहानशा स्टेशनवर उतरलो. टांगा करून वाटेत थांबून, घाईने न्याहारी केली व शेवटी यॉक्सले जुन्या जागेला पोचून, कामाला सुरवात केली.'

"कसे काय विल्सन, काही बातमी?"

"नाही सर, काही नाही."

"एखादा परका माणूस आसपास दिसला?"

"नाही, सर. काल स्टेशनवरून कुणी आले किंवा गेले, अशी नोंद देखील नाही."

"तुम्ही खानावळीत व लॉजमध्ये चौकशी केली का?"

"हो सर, तसे कुणी सापडले नाही."

"ठीक आहे. इथून चॅथमपर्यंत चालत जाणे शक्य आहे. तिथे राहून कुणाच्या नकळत, कुणीही गाडीनेदेखील येऊ शकते. मिस्टर होम्स, मी ज्याबद्दल बोललो, तो हा बागेतील रस्ता आहे. इथे काही खुणा नसल्याचे, मी काल बोललो होतो."

"गवतावरील खुणा कुठल्या बाजूला होत्या?"

"या बाजूला, सर. ही वाट आणि फुलांचा वाफा, यामधील अरुंद गवताच्या पट्ट्यात. मला तेव्हा ते दिसले होते. पण आता दिसत नाहीत."

गवतावर वाकून, होम्स म्हणाला, “हो. हो. कुणीतरी इथून गेलेले आहे. त्या बाईने हळूवारपणे पाऊले टाकली असणार. कारण दुसऱ्या बाजूने गेल्यास फरशीवर पाऊलखुणा उमटल्या असत्या आणि ओलसर पाणथळ जागेत तर त्या अगदीच स्पष्ट उमटल्या असत्या. नाही का?”

“हो, सर. तिने फार विचारपूर्वक चाल खेळलेली आहे.”

मी होम्सच्या चेहऱ्यावर काही हेतूपूर्ण भाव उमटलेले पाहिले.

“तू म्हणतोस की ती या वाटेने परत आली असणार?”

“हो, सर. दुसरा कुठला मार्ग नव्हता.”

“गवतावरून?”

“मिस्टर होम्स, असू शकेल.”

“हं. हे तिचे कृत्य फार उल्लेखनीय आहे ---- फारच उल्लेखनीय. ठीक आहे आपण दमेपर्यंत या वाटेची तपासणी केली आहे. आता अजून पुढे जाऊ. मला वाटते, हे बागेचे गेट सहसा उघडे असते? मग ती खुनी सरळ आत आली असेल. तिच्या मनात खून करायचे नसेल. नाहीतर तिने स्वतःबरोबर काहीतरी शस्त्र आणले असते. लिहायच्या टेबलाच्या खणातला चाकू घेतला नसता. ती या पॅसेजने पुढे आली असेल. झावळ्यांचा गालीच्यावर काही खुणा न ठेवता, पुढे आली असेल. मग ती अभ्यासिकेत पोचली असेल. तिथे ती किती वेळ असेल? आपण अंदाज करू शकत नाही.”

सर, काही मिनिटांपेक्षा जास्त नाही. मी तुम्हाला सांगायला विसरलो, की मिसेस मार्कर, घर राखणारी बाई, तिथे पाऊण तासापूर्वी काही आवराआवरी करत होती, असे ती म्हणते.”

“छान त्यामुळे वेळावर मर्यादा आली. खुनी बाईने आत आल्यावर काय केले असेल? ती लिहायच्या टेबलाशी गेली असेल. कशासाठी? खणामधले काही घेण्यासाठी नव्हे. त्यातून पळवण्यासारखे काही मूल्यवान असते, तर ते नक्कीच कुलुपबंद केले गेले असते. नाही ती कपाटामधील काही घ्यायला गेली असेल. ओहो, त्याच्यावर ओरखड्यासारखे काय दिसते आहे? वॉटसन, जरा काडी ओढ. हॉपकीन्स, तू मला हे का सांगितले नाहीस?”

तो तपासत असलेली खूण किल्लीच्या भोकाच्या उजवीकडे ब्रासवर उमटून, पुढे चार इंचांपर्यंत जाऊन तिने पृष्ठभागावरील पॉलीशवर चरे उमटवले होते.

“मिस्टर होम्स, मला ते दिसले होते. पण किल्लीच्या भोकाभोवती चरे नेहमीच असतात.”

“हे नुकतेच पडलेले वाटतात, अगदी नुकतेच. हे बघ चरा पडलेल्या ठिकाणी ब्रास कसे चकाकते आहे. चऱ्याच्या दोन्ही बाजूला पॉलीशचे गोल डाग आहेत. तिथे मिसेस मार्कर आहे का?”

दुःखी चेहऱ्याची वयस्क बाई खोलीत आली.

“तुम्ही काल सकाळी हे कपाट, फडके मारून साफ केले का?”

“हो, सर.”

“तुम्हाला हा चरा दिसला का?”

“नाही, सर.”

“माझी तशी खात्री आहे, कारण फडक्याने पॉलीशचे तुकडे व कण ढकलले गेले असणार. या कपाटाची किल्ली कुणाकडे असते?”

“प्राध्यापक ती त्यांच्या घड्याळ्याच्या साखळीत ठेवतात.”

“ती साधी किल्ली आहे का?”

“नाही, सर. ती माशाचे किचेन असलेली जाड किल्ली आहे.”

“छान. मिसेस मार्कर, तुम्ही जाऊ शकता. आता आपली थोडी प्रगती झाली आहे. ती खुनी बाई खोलीत शिरते. कपाटाकडे जाऊन ते उघडते किंवा उघडणयाचा प्रयत्न करते. ती असे करत असतांना तरुण विलोघबाय स्मिथ खोलीत येतो. किल्ली काढून घेण्याच्या घाईत, तिच्या हातून दारावर चरा उमटतो. तो तिला पकडतो. ती जवळील वस्तू पकडायच्या प्रयत्नात, योगायोगाने चाकू घेते व चाकूने त्याला मारण्याचा प्रयत्न करते, जेणेकरुन त्याची पकड ढिली होईल. तिचा वार वर्मी लागतो. तो पडतो. ती ज्यासाठी आली होती, त्या वस्तूसकट किंवा ती न घेता, ती निसटते. सुसान नावाची नोकराणी तिथे असते का? सुसान, तुला ओरडण्याचा आवाज आल्यावर, मग कुणी त्या दारातून पळून गेले का?”

“नाही, सर. हे अशक्य आहे. मी जिना उतरायच्या आत, मला पॅसेजमध्ये कुणी दिसले असते. शिवाय दार उघडले गेले नाही. नाहीतर मला आवाज आला असता.”

“मग बाहेर जाण्यावर आपली बोलती बंद झाली. म्हणजे ती बाई आली, तशीच बाहेर पडली असणार. हा दुसरा पॅसेज प्राध्यापकाच्या खोलीकडे जातो. बाहेर पडायचा अजून कुठला मार्ग नाही का?”

“नाही, सर.”

“आता आपण खाली जाऊन प्राध्यापकाशी ओळख करून घेऊ. हॅलो, हॉपकीन्स! हे फार महत्वाचे आहे. खरेच, फार महत्वाचे आहे. प्राध्यापकाच्या खोलीत जायचा पॅसेजसुद्धा झावळ्यांच्या गालीचाने झाकलेला आहे.”

“ठीक आहे. सर, त्याचे काय?”

“त्याचा या केसशी संबंध, तुझ्या लक्षात येत नाही? ठीक आहे. ठीक आहे. मी काही तसा आग्रह धरत नाही. मी देखील चुकत असेन. पण मला असे घडले असण्याची, शक्यता वाटते. माझ्याबरोबर येऊन माझी ओळख करून दे.”

आम्ही पॅसेज ओलांडून गेलो. तो बागेकडे जाणाऱ्या पॅसेजइतकाच लांब होता. तिथे शेवटी थोड्या उंच पायऱ्या व मग दार होते. आमच्या मार्गदर्शकाने दारावर टकटक केले व मग आम्ही प्राध्यापकाच्या झोपायच्या खोलीत शिरलो. ती एक मोठी खोली होती. तिथे मांडणींपासून कोपऱ्यातील ढिगांपर्यंत अगणित वस्तू लगडलेल्या होत्या. किंवा भितींवरील कपाटांखाली अनेक वस्तू कोंबल्या होत्या. पलंग खोलीच्या मध्यभागी होता. आणि त्यावर उशांनी वेढलेला घराचा मालक पहुडला होता. मी इतका उल्लेखनीय दिसणारा माणूस, क्वचितच पाहिला होता. तो आमच्याकडे वळलेला, एक त्रासिक, गरुडासारखा चेहरा होता. दाट, केसाळ भुवयांखाली गडद, भेदक डोळे होते. त्याचे केस व दाढी सफेद होती. तोंडाच्या कडेची दाढी, विचित्रपणे पिवळे डाग असलेली होती. तो सिगरेट ओढत होता. खोली तंबाखूच्या वासाने भरून गेली होती. त्याने होम्सच्या दिशेने हात उंच केला, तेव्हा त्यावरही निकोटीनचे पिवळे डाग मला दिसले. त्याने विचित्र खालच्या आवाजात पण उत्कृष्ट इंग्लिशमध्ये विचारले, “मिस्टर होम्स, सिगरेट घेणार? ही घ्या. आणि तुम्हाला सर? त्या विशिष्ट प्रकारे अलेक्झान्ड्रीयाच्या आयोनाइड्सपासून बनवलेल्या आहेत, म्हणून मी त्यांची शिफारस करतो. तो मला एका वेळी हजार पाठवतो. मला दर पंधरवड्याला नवीन मागवाव्या लागतात. वाईट, सर, फार वाईट. पण म्हाताऱ्या माणसाची थोडीच सुखे असतात. तंबाखू आणि माझे काम एवढ्या दोनच गोष्टी माझ्या आयुष्यात उरल्या आहेत.”

होम्सने सिगरेट पेटवली व खोलीभर धारदार नजरेचे कटाक्ष टाकले.

म्हातारा उद्गारला, “तंबाखू आणि माझे काम. पण आता फक्त तंबाखू! काय मरणांतिक अडथळा आहे! इतक्या संकटाची कुणी कल्पना केली होती? इतका चांगला तरुण मनुष्य! मी

तुम्हाला सांगतो, काही महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर, तो वाखाणण्याजोगा मदतनीस होता. मिस्टर होम्स, तुम्हाला काय झाले असेल, असे वाटते?”

“मी अजून ठरवले नाही.”

“आम्हाला काय झाले, ते काहीच समजत नाही. तुम्ही यातून मार्ग काढलात, तर मी तुमचा ऋणी राहिन. माझ्यासारख्या अपंग व पुस्तकातील किड्याला असा धक्का म्हणजे अतीच आहे. माझी विचारशक्ती खुंटली आहे. पण तुम्ही कार्यकुशल आहात ---- तुम्ही अनेक केसेस हाताळलेल्या आहेत. तुमच्या आयुष्यात अशा केसेस, म्हणजे रोजचीच बाब आहे. प्रत्येक कठीण प्रसंगात, तुम्ही स्वतःला समतोल ठेवता. तुम्ही आमच्या बाजूला उभे राहिल्यामुळे, आम्ही खरेच नशीबवान ठरलो आहोत.”

वयस्क प्राध्यापक बोलतांना, होम्स खोलीच्या एका बाजूला फेऱ्या मारत होता. मी पाहिले की तो फार जोराने झुरके मारत होता. हे सरळ होते की तो आमच्या यजमानाच्या ताज्या अलेक्झान्ड्रीयन सिगरेटबद्दल विचार करत होता.

वयस्क मनुष्य म्हणाला, “हो, सर. हा फार मोठा धक्का होता. त्या तिथे कडेच्या टेबलावर तो कागदांचा ढीग दिसतो आहे, तो माझा महत्वाच्या मोठा ग्रंथाचा मजकूर आहे. सिरीया आणि इजिप्तमधील पुरातन बौद्ध भिक्षुच्या काळातील कागदपत्रांचे, हे मी केलेले विश्लेषण आहे. त्या धर्माच्या शिकवणीच्या पायाभूत गोष्टींचा, खोलवर अभ्यास यात केलेला आहे. माझ्या क्षीण तब्येतीमुळे मला माहिती नाही, की मी ती ग्रंथ पुरा करू शकेन की नाही, कारण आता माझा मदतनीस पण माझ्याकडून, हिरावून घेतला गेला आहे. प्रिय होम्स, तुम्ही माझ्यापेक्षाही जोरजोरात सिगरेट ओढत आहात.”

होम्स हसला.

सिगरेटच्या पेटीतून अजून एक, चौथी, सिगरेट घेत व संपत आलेल्या सिगरेटवरून ती पेटवत, तो बोलला, "माझ्या आवडीच्या क्षेत्राच्या बाबतीत मी झटपट अनुमान काढणारा आहे. प्राध्यापक कोरम, मी तुम्हाला माझ्या लांबण लावणाऱ्या उलट तपासणीने त्रास देणार नाही. मला असे समजले की गुन्हा घडला, तेव्हा तुम्ही तुमच्या अंथरुणात होतात आणि तुम्हाला काय घडले, ते काही माहिती नव्हते. मी फक्त एवढेच विचारतोः मृत माणसाचे शेवटचे शब्द होते, 'प्राध्यापक ---- ती ती होती.' याचा अर्थ काय?

प्राध्यापकाने मान हलवली.

सुसान ही गावाकडील बाई आहे. आणि तुम्हाला त्या प्रकारच्या लोकांचा मूर्खपणा माहिती आहे. मला वाटते, तो बिचारा अस्वस्थपणे काही अनाकलनीय शब्द बोलला असेल व त्या बाईला ते अर्थहीन शब्द असे ऐकू आले असतील."

"अस्स. तुमच्याकडे याचे काही स्पष्टीकरण नाही?"

"अपघाताची शक्यता वाटते. शक्यता. हे मी फक्त आपल्याआपल्यात बोलतो आहे. आत्महत्या ---- तरुण माणसांना त्यांच्या छुप्या समस्या असतात. काही प्रेमप्रकरण ---- आपल्याला काही माहिती नाही. खुनापेक्षा मला त्याची शक्यता वाटते."

"पण तो चष्मा?"

"ओहो! मी फक्त विद्यार्थी आहे. स्वप्ने बघणारा मनुष्य. मी आयुष्याचे व्यवहार स्पष्ट करू शकत नाही. पण तरीही, माझ्या मित्रा, ती प्रेमप्रकरणे वेगळा विचित्र आकार घेऊ शकतात. जाऊदे. अजून सिगरेट घ्या. असे दुसऱ्यानी माझ्या सिगरेटची स्तुती करणे, आनंददायी आहे. मनुष्य त्याचे आयुष्य संपवतो, तेव्हा तो आपल्याला आवडते असे काय जवळ ठेवतो, हे काय सांगावे? पंखा, मोजा, चष्मा? तुम्ही गवतावरील खुणांबद्दल बोलता आहात पण शेवटी ते चुकीचेही ठरू शकते. तो दुर्दैवी माणूस पडला तेव्हा चाकू लांब फेकला गेला, असे झाले असू

शकेल. मी लहान मुलासारखे बोलतो आहे, असे तुम्हाला वाटेल. पण मला वाटते विलोघबाय स्मिथने स्वतःचा मृत्यू स्वतःच ओढवून घेतला.”

असल्या वक्तव्याने होम्सला धक्का बसला. तो काही वेळ वरखाली चालत राहिला. सिगरेटीमागून सिगरेटी ओढत विचारात हरवून गेला.

शेवटी तो बोलला, “मला असे सांगा प्राध्यापक कोरम, त्या खोलीतील कपाटात काय आहे?”

“चोराच्या कामाचे काही नाही. कौटुंबिक कागदपत्र, माझ्या बिचाऱ्या बायकोची पत्रे, माझी विद्यापीठांची शैक्षणिक प्रमाणपत्रे इ. या घ्या किल्ल्या. तुम्ही स्वतः बघू शकता.”

होम्सने किल्ली उचलली आणि क्षणभर तिच्याकडे पाहिले. नंतर त्याने ती परत केली.

तो म्हणाला, “नको. त्याचा मला काही उपयोग होईल, असे वाटत नाही. त्यापेक्षा मी शांतपणे बागेत जाणे पसंत करेन, तिथे मी सगळ्या गोष्टींचा परत नीट विचार करेन. तुम्ही मांडलेल्या आत्महत्येच्या उपपत्तीचा मी विचार करेन. प्राध्यापक कोरम, तुम्हाला तसदी दिल्याबद्दल माफ करा. तुम्हाला जेवायच्या वेळेपर्यंत आम्ही त्रास देणार नाही. दुपारी दोन वाजता, आम्ही परत येऊ. तेव्हा मध्यंतरीच्या काळात काही घडले असल्यास, त्याचा वृतांत देऊ.”

होम्सचे मन थाऱ्यावर नव्हते. बागेतील पायवाटेवर आम्ही शांतपणे वरखाली चालत होतो.

शेवटी मी विचारले, “तुला काही पुरावा सापडला आहे का?”

तो म्हणाला, “ते मी ओढलेल्या सिगरेटींवर अवलंबून राहील. कदाचित असे असेल की मी पूर्णपणे चुकत असेन. सिगरेटी मला सांगतील.”

मी ओरडलो, “माझ्या प्रिय होम्स, “असे कसे काय ---- “

"ठीक आहे. ठीक आहे. तू तुझे काय ते बघ. जर तसे करायचे नसेल, तरी काही बिघडले नाही. अर्थात आपल्याकडे डोळ्यांच्या डॉक्टरांचा पुरावा अजून यायचा आहे. पण तो आला, की मी सत्याच्या अजून जवळ जाऊ शकेन. बरे झाले, मिसेस मार्कर इकडे येते आहे. आपण पाच मिनिटे तिच्याशी संभाषणाची मौज घेऊ."

मी हे मागे म्हणालो असेन, की होम्स त्याला पाहिजे तेव्हा, स्त्रियांबरोबर उत्तम संवाद साधू शकतो. त्यांचा विश्वास मिळवू शकतो. त्याने त्या घरकाम करणाऱ्या मिसेस मार्करबरोबर, असा काही मोकळेपणा प्रस्थापित केला होता, की जणू तो तिला अनेक वर्षे ओळखतो आहे.

"बरं का, मिस्टर होम्स, तुम्ही म्हणता तसे, ते फार भयंकर सिगरेटी ओढतात. कधी सबंध दिवसभर तर कधी सबंध रात्रभर. मी सकाळी ती खोली पाहिली आहे. ---- सर, तुम्हाला ते लंडनचे धुके वाटले का? बिचारा तरुण मिस्टर स्मिथ. तोदेखील सिगरेटी ओढायचा पण प्राध्यापकाइतक्या नाही. त्याची तब्येत ---- बरी होती का माहिती नाही. पण सिगरेट न ओढण्याइतकी वाईट नव्हती."

होम्स बोलला, "अस्स. पण त्याने भूक मरते."

"सर, मला त्याबद्दल माहिती नाही."

"मला वाटते, प्राध्यापक फारसे काही खात नसतील, नाही का?"

"ते कधी खात, तर कधी नाही, असे मी त्यांच्याबद्दल म्हणू शकेन."

"मी सांगतो, ते सकाळी न्याहारी घेत नसणार. इतक्या सिगरेटी ओढल्यावर त्याना जेवणही जात नसेल."

"सर, तुम्ही चुकता आहात. ते सकाळी खूप न्याहारी करत. त्यांनी कधी भरपूर न्याहारी न केल्याचे, मी सांगू शकत नाही. ते जेवतांना कटलेट करायला सांगत. मला आश्चर्य वाटे. कारण मी काल त्या खोलीत आले, व तरुण स्मिथला जमिनीवर मरून पडलेले पाहिले, तेव्हा

मी इतकी खचले, की अन्नाकडे बघू शकले नाही. तसेही जगात अनेक प्रकारचे लोक रहातात आणि प्राध्यापक मात्र त्यांचे जेवण चुकवू शकले नाहीत."

आम्ही सकाळभर बागेत फिरत बसलो. आदल्या दिवशी चॅथम रस्त्यावर काही मुलांनी एका विचित्र बाईला पाहिल्याची अफवा उठली होती, त्यात लक्ष घालण्यासाठी स्टॅन्ले हॉपकीन्स गावात गेला होता. माझा मित्र गलितगात्र झाला होता. मी त्याला अशी अर्धवट मन घालून केस हाताळतांना, पाहिले नव्हते. हॉपकीन्सने अशी बातमी आणली, की त्याला ती मुले भेटली व त्यांना होम्सने वर्णन केल्यासारखी बाई दिसली. तिने चष्मा घातला होता. तिच्याबद्दल कुणी फार रुची दाखवली नाही. तो सुसानपेक्षा जास्त लक्षपूर्वक बघणारा होता. त्याने आम्हाला जेवायला नेले व अशी माहिती दिली, की मिस्टर स्मिथ काल सकाळी बाहेर फिरायला गेला होता व ही दुःखांतिका घडण्याअगोदर अर्धा तास घरी आला होता. मला या घटनेचा काही संबंध लावता आला नाही. पण होम्स त्याच्या डोक्यात चालू असलेल्या बेतामध्ये ती विणत बसला होता. अचानक तो खुर्चीतून उठला आणि त्याच्या घड्याळाकडे बघितले. तो बोलला, "लोकहो, दोन वाजले आहेत. आपण हे आपल्या प्राध्यापक मित्राला सांगितले पाहिजे.'

त्या वयस्क माणसाचे जेवण नुकतेच झाले होते. त्याच्या रिकाम्या थाळीकडे बघून, तो भरपूर जेवल्याचे समजत होते. त्याने त्याची दाढी व चकाकणारे डोळे आमच्याकडे वळवले, तेव्हा तो खरच एक विचित्र वल्ली वाटला. त्याच्या ओठात सतत असणाऱ्या सिगरेटमधून धूर येत होता. तो व्यवस्थित कपडे करून शेकोटीशेजारील हाताच्या खुर्चीत बसला होता.

"कसे काय, मिस्टर होम्स, तुम्ही अजून हे गूढ सोडवले की नाही? त्याने ओढून संपवलेल्या सिगरेटींचा ढीग माझ्या मित्राच्या शेजारील टेबलावर, मोठ्या टीनच्या भांड्यात पडला होता. त्याच वेळी होम्सने त्याचे हात ताणले. त्या दोघांमध्ये ते टीनचे भांडे ओतून दिले. एक दोन मिनिटे आम्ही सगळे गुडघ्यांवर बसून सिगरेटचे तुकडे कुठून कुठून गोळा करू लागलो.

जेव्हा आम्ही उठलो, तेव्हा होम्सचे डोळे चकाकत होते आणि गालांवर रंग चढला होता. फक्त काही संकटाच्यावेळीच मी, हा लढाईचा पूर्वरंग पसरलेला पाहिला होता.

तो म्हणाला, "हो. मी हे गूढ सोडवले आहे."

स्टॅन्ले हॉपकीन्स व मी आश्चर्याने त्याच्याकडे बघू लागलो. काहीशा फसव्या हास्याने वयस्क प्राध्यापक थरथरत होता.

"खरे की काय? बागेत?"

"नाही. इथे."

"इथे? केव्हा?"

"या क्षणी."

"तुम्ही नक्कीच विनोद करत आहात, मिस्टर शेरलॉक होम्स. असले प्रकार करायला, हे फार गंभीर प्रकरण असल्याची, मी तुम्हाला आठवण करून देतो."

"मी माझ्या साखळीतील प्रत्येक दुवा तपासला आहे. प्राध्यापक कोरम, मला खात्री आहे की सर्व काही बरोबर आहे. मला अजून यात तुमचा उद्देश काय व या विचित्र प्रकरणात तुम्ही नक्की काय भाग घेतलेला आहे, हे अजून नीट स्पष्ट झालेले नाही. बहुतेक काही मिनिटात, मी ते तुमच्याच तोंडून ऐकेन. मध्यंतरीच्या काळात, मी तुमच्या फायद्यासाठी पूर्वी काय घडले, ते सांगतो. त्यामुळे तुम्हाला हे समजेल की मला अजून काय माहिती हवी आहे.

"काल एक बाई तुमच्या अभ्यासिकेत शिरली. तुमच्या कपाटातील काही कागदपत्र तिला हवे होते. तिच्याकडे तिची किल्ली होती. मला तुमची किल्ली तपासण्याची संधी मिळाली. पॉलिशवरील चऱ्यामुळे ती जराही रंग उडालेली दिसली नाही. तुम्ही त्या किल्लीचे रंगरूप

बदलू शकत नव्हतात. मला कळले आहे त्याप्रमाणे ती तुमच्या नकळत तुम्हाला लुटण्यासाठी आली होती."

प्राध्यापकाने ओठातून एक धुराचा ढग सोडला. तो म्हणाला, "हे फार मनोरंजक व उपयोगी आहे. तुम्हाला अजून काही सांगायचे नाही का? नक्कीच या बाईचा पाठलाग करून तिचे काय झाले, हेदेखील तुम्ही सांगू शकाल."

"मी तसे करायचा प्रयत्न करणार आहे. पहिल्या प्रथम तुमच्या सचिवाने तिला पकडले. तिने सुटका करून घेतांना, त्याला भोसकले. ही हादरवून टाकणारी घटना, म्हणजे एक नकोसा अपघात होता. कारण माझ्या अंदाजाप्रमाणे त्या बाईचा इतकी मरणांतिक जखम करायचा विचार नव्हता. खुनी कधी निःशस्त्र येत नाही. तिच्या हातून काय घडले, त्याने हादरून गेली. ती वेगाने पळून गेली. दुर्दैवाने तिचा चष्मा या भानगडीत हरवला आणि तिला चष्म्याशिवाय नीट दिसत नसल्याने ती अगतिक होऊन, ज्या पॅसेजने धावली तो मार्ग, ती आलेला मार्ग नव्हता. दोन्ही पॅसेजमध्ये झावळ्यांचा गालीचा अंथरलेला होता. तिने चुकीचा मार्ग घेतला, हे तिला समजले, तेव्हा फार उशीर झाला होता. तिचे योग्य मार्गाने पलायन, आता शक्य नव्हते. मग ती काय करणार? ती परत जाऊ शकत नव्हती. ती आहे तिथे राहू शकत नव्हती. तिला कुठेतरी जाणे भाग होते. ती जात राहिली. ती जिना चढली. दार ढकलले. ती तुमच्या खोलीत आली."

वयस्क मनुष्याचा आ वासला गेला. तो रानटीपणे होम्सकडे पाहू लागला. आश्चर्य आणि भीती त्याच्या बोलक्या चेहऱ्यावरून प्रतिबिंबित होत होती. मोठ्या मुश्किलीने त्याने त्याचे खांदे घुसळले व लबाडीने हसला.

तो म्हणाला, "मिस्टर होम्स, खूप छान. पण तुमच्या या प्रभाव पाडणाऱ्या उपपत्तीत, एक चूक आहे. मी माझ्याच खोलीत होतो आणि दिवसाभरात बाहेर पडलो नाही."

"ते मला माहिती आहे, प्राध्यापक कोरम."

“आणि तुम्ही असे म्हणता आहात, की मी अंथरुणावर पडून आहे व मला माझ्या खोलीत ती बाई शिरलेली माहितीदेखील नाही?”

“मी असे म्हणालो नाही. तुम्हाला ते कळले होते. तुम्ही तिच्याशी बोललात. तुम्ही तिला ओळखले. तुम्ही तिला पळून जायला मदत केलीत.”

पुन्हा प्राध्यापक मोठ्याने हसला. तो उठून उभा राहिला. त्याचे डोळे धगधगणाऱ्या कोळशाप्रमाणे दिसत होते.

तो ओरडला, “तुम्ही वेडे असून, वाटेल ते बरळत आहात. मी तिला पळून जायला मदत केली? मग आता ती कुठे आहे?”

होम्स म्हणाला, “ती तिथे आहे.” त्याने खोलीच्या कोपऱ्यात असलेल्या पुस्तकांच्या उंच कपाटाकडे निर्देश केला.

मी पाहिले की म्हाताऱ्याने त्याचे दोन्ही हात वर केले. त्याच्या कडक चेहऱ्यावरून, अचानक आक्रमकता तरळून गेली. तो खुर्चीवर मागे पडला. त्याच वेळेस होम्सने निर्देश केलेले पुस्तकांचे कपाट एका बिजागरीवर लटकू लागले. आणि एक बाई खोलीत अवतीर्ण झाली. विचित्र परदेशी आवाजात ती ओरडली, “तुमचे बरोबर आहे. मी इथे आहे.”

ती धुळीने चॉकलेटी झाली होती. ती लपलेल्या जागेतील कोळीष्टके तिला चिकटली होती. तिचा चेहराही धुळीने माखला होता. आणि तसेही ती कधीच सुंदर नव्हती. होम्सने अंदाजाने तिचे जसे शारीरिक वर्णन केले होते, तशीच ती होती. त्याशिवाय तिची हनुवटी लांब व हट्टी होती. तिच्या अंगभूत आंधळेपणाचे व अंधारातून उजेडाकडे जाण्याच्या बदलाचे कारण असल्याने ती घाबरून, रागाने आम्ही कोण आहोत, ते बघत उभी राहिली. तरीही या साऱ्या तोट्यांशिवाय, तिच्यात थोडा खानदानीपणा होता. तिच्या मुजोर हनुवटीतून व ताठ मानेतून धैर्य दिसत होते. त्यामुळे ती मान देण्यासारखी व स्तुत्य वाटत होती.

स्टॅन्ले हॉपकीन्सने तिचा हात पकडला आणि ती कैदी असल्याचे घोषित केले. पण तिने ज्या अती उमदेपणे त्याला हळूच बाजूला ढकलले, त्यामुळे हॉपकीन्सला तिचे ऐकावे लागले. म्हातारा खुर्चीत भोवळ आल्यासारखा चेहरा करून पडला होता व तिच्याकडे रागारागाने बघत होता.

तो बोलली, "हो सर, मी तुमची कैदी आहे. मी जिथे उभी आहे, तिथून मला सर्व काही ऐकू येते आहे. तुम्हाला सत्य काय ते कळल्याचे, मला समजले आहे. मी ते कबूल करते. त्या तरुण माणसाला मी मारले. पण तो एक अपघात असल्याचे तुम्ही म्हणालात, ते बरोबर आहे. मी हातात धरलेला तो चाकू आहे, हे देखील मला माहिती नव्हते. मी गडबडीने टेबलावरून काहीतरी ओढून घेतले व ते त्याला मारून, माझी जायची वाट मोकळी केली. मी खरे तेच सांगते आहे."

होम्स बोलला, "बाईसाहेब, माझी खात्री आहे, की ते सत्य आहे. मला वाटते, तुम्ही ठीक नाही."

तिच्या चेहऱ्यावरील धुळीच्या रंगासकट, ती भीतीदायक रीत्या रागाने लाल झाली. ती अंथरुणाच्या कडेला बसली. मग ती थोडी भानावर आली. ती म्हणाली, "माझ्याकडे अगदी थोडा वेळ आहे. पण तुम्हाला खरे काय, ते माहिती पाहिजे. मी या माणसाची बायको आहे. तो इंग्लिश माणूस नाही. तो रशियन आहे. मी त्याचे नाव सांगणार नाही."

पहिल्यांदाच म्हातारा हलला. तो ओरडला, "देव तुझे भले करो, ॲना. देव तुझे भले करो."

तिने त्याच्याकडे तुच्छतादर्शक कटाक्ष टाकला. ती बोलली, "तू इतक्या हिन दर्जाचे आयुष्य जगायला का प्रवृत्त झालास, सर्गीअस? यामुळे अनेकांना त्रास झाला आणि कुणाचेच भले झाले नाही ---- तुझे स्वतःचेही नाही. तरीही मला तुझा कच्चा धागा शेवटच्या कबुलीजबाबाच्या वेळी तुझ्याकडून खेचून घ्यायचा नव्हता. जेव्हा मी या शापित घराचा उंबरा

ओलांडला तेव्हा माझ्या आत्म्यावर आधीच पुरेसे दडपण आले होते. पण मला बोलू दे, नाहीतर फार उशीर होईल.

"सभ्य गृहस्थहो, मी असे म्हटले, की मी या माणसाची बायको आहे. तो पन्नाशीचा आणि मी वीस वर्षांची मूर्ख मुलगी होते, तेव्हा आम्ही लग्न केले. ते रशियामधील एक विद्यापीठाचे शहर होते ---- मी त्याचे नाव सांगणार नाही."

म्हातारा पुन्हा पुटपुटला, "देव तुझे भले करो, ॲना."

"आम्ही सुधारणावादी -- क्रांतिकारी -- निधर्मी लोक आहोत. समजले का? तो, मी आणि अजून अनेकजण. मग त्रासाचा काळ सुरु झाला. एक पोलीस ऑफिसर मारला गेला. खूपजणांना पकडले. पुरावा हवा होता. त्याचे स्वतःचे आयुष्य वाचवण्यासाठी व मोठे बक्षीस मिळवण्यासाठी, या माझ्या नवऱ्याने त्याच्या स्वतःच्या बायकोला व मित्रांना उघडे पाडले. त्याच्या कबुलीजबाबावरून आम्हा सर्वांना अटक झाली. काहीजणांना फाशी झाली व काहीजणांना सैबेरियाला पाठवण्यात आले. मी त्या दुसऱ्या गटात होते. आमचे आयुष्य जगणे मुश्कील होते. माझा नवरा त्याच्या आजारासकट इंग्लंडला आला आणि तेव्हापासून इथे शांतपणे जगतो आहे. जर कोणाला कळले असते की तो इथे आहे, तर त्याला न्याय द्यायला एक आठवडा सुद्धा लागला नसता."

म्हाताऱ्याने थरथरत हात लांब करून, एक सिगरेट घेतली. तो बोलला, "मी तुझ्या हातात आहे, ॲना. तू माझ्याबरोबर नेहमीच चांगली वागलेली आहेस."

ती म्हणाली, "मी अजून तुम्हाला त्याच्या खलनायकगिरीचा कळस सांगितलेला नाही. सर्व कॉमरेडस् मध्ये एक माझा जवळचा मित्र होता. तो उमदा, निःस्वार्थी आणि प्रेमळ होता, माझा नवरा तसा नव्हता. त्या माझ्या मित्राला हिंसाचार आवडत नसे. हिंसाचार अपराध असेल तर ---- आम्ही सर्वजण अपराधी होतो ---- पण तो नव्हता. तो नेहमी आम्हाला हिंसाचारापासून परावृत्त करणारे लेखन करे. या पत्रांनी त्याला वाचवले असते. तसेच माझी रोजनिशी, ज्यात

दिवसानुदिवसांच्या माझ्या त्याच्याबद्दलच्या भावना आणि आमच्यापैकी प्रत्येकाचे दृष्टीकोनही मी नोंदवले होते. माझ्या नवऱ्याने ती पत्रे व माझी रोजनिशी दोन्ही घेऊन लपवले आणि त्या तरूण माणसाचे आयुष्य धोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्यात त्याला यश मिळाले नाही. पण अलेक्सीसला सैबेरीयाला पाठवले गेले. तिथे तो या घडीला मिठाच्या खाणीत काम करतो आहे. अरे खलनायका, त्याचा विचार कर. ज्याचे नाव उच्चारायची देखील तुझी लायकी नाही, तो अलेक्सीस या क्षणी गुलामासारखा राबतो आहे आणि तुझे आयुष्य माझ्या हातात असतांना मी तुला सोडून देऊ?"

सिगरेट ओढतांना म्हातारा बोलला, "तू नेहमीच एक उमदी स्त्री होतीस, ॲना."

ती उठून उभी राहिली. पण काही दुखल्यामुळे ओरडून, परत पडली.

ती म्हणाली, "मला हे संपवले पाहिजे. जेव्हा माझी शिक्षा संपली, तेव्हा मी रोजनिशी व पत्रे मिळवण्याचा चंग बांधला. ते रशियन सरकारला पाठवून, माझ्या मित्राची सुटका झाली असती. मला माझा नवरा इंग्लंडला आल्याचे माहिती होते. अनेक महिने त्याला शोधल्यावर, मला त्याचा पत्ता सापडला. त्याच्याकडे अजून रोजनिशी असणार, हे मला माहिती होते. कारण मी सैबेरियात असतांना, मला त्याच्याकडून एक पत्र आले होते. त्यात मला रोजनिशीतील काही उतारे देऊन, दूषणे देण्यात आली होती. पण माझी खात्री होती, की त्याचा सूड उगवण्याचा स्वभाव लक्षात घेता, तो त्याच्या इच्छेने ती रोजनिशी मला कधीच देणार नाही. ती माझी मलाच मिळवली पाहिजे, अशा हेतूने मी एक खासगी गुप्तहेर नेमला. तो माझ्या नवऱ्याच्या घरी त्याचा सचिव म्हणून नोकरीस लागला. हा तुझा दुसरा सचिव होता, सर्गीअस. पहिला तुला तडकाफडकी सोडून गेला होता. मला हवी असलेली कागदपत्रे त्या कपाटात असल्याचे त्याने मला सांगितले व मला त्या किल्लीची नक्कल करून दिली. त्यापुढे तो गेला नाही. त्याने मला घराचा नकाशाही दिला व मला सांगितले की कलत्या दुपारी बहुधा अभ्यासिकेत कुणी नसते.

त्यानंतर इथे नवीन सचिव नेमला गेला. शेवटी मी धीर गोळा केला आणि स्वतः ती कागदपत्रे नेण्यासाठी आले. मला ती मिळाली. पण काय किंमत मोजून?

"मी ते कागद घेतले व कपाट परत कुलुपबंद करत होते. तेव्हा त्या तरुणाने मला पकडले. मी त्याला आधीच सकाळी पाहिले होते. तो मला रस्त्यावर भेटला होता. तो त्यांचा नोकर आहे हे माहिती नसल्याने, मी त्याला प्राध्यापक कोरम कुठे रहातात, असे विचारले होते."

होम्स म्हणाला, "बरोबर, तसेच! सचिव परत आला. आणि त्याने त्याच्या मालकाला एक बाई भेटल्याबद्दल सांगितले. मग शेवटचा श्वास घेतांना, त्याने असे सांगायचा प्रयत्न केला, की जिच्याबद्दल तो बोलला, तीच ती बाई होती."

त्या बाईचा चेहरा काही दुखत असल्यासारखा आक्रसला होता. स्वतःला महत्व देत, ती म्हणाली, "तुम्ही मला बोलू दिले पाहिजे. तो खाली पडला, तेव्हा मी खोलीतून पळाले. चुकीचे दार निवडले आणि मी माझ्या नवऱ्याच्या खोलीत गेले. तो मला पकडून देण्याबद्दल बोलला. मी त्याला म्हटले, की त्याने जर असे केले, तर त्याचे आयुष्य माझ्या हातात असेल. जर त्याने मला पोलिसांच्या हवाली केले, तर मी त्याला माझ्या कॉमरेडस् मंडळींच्या हवाली करेन. मला माझ्यासाठी जगायचे होते असे नव्हे, पण मला माझा हेतू साध्य करायचा होता. त्याला माहिती होते, की मी बोलल्याप्रमाणे करेन ---- त्याचे स्वतःचे भविष्य माझ्या नशीबात अडकले होते. फक्त त्यामुळे त्याने मला लपायला सांगितले. फक्त त्यालाच माहिती असलेल्या जुन्या अडगळीच्या कपाटात मला घुसवले. तो त्याचे जेवण खोलीत घेत असे. त्यामुळे त्याच्यातले अन्न तो मला देई. असे ठरले की पोलीस गेले, की मी रात्री निघून जावे आणि परत येऊ नये. पण कसे कुणास ठाऊक, तुम्हाला आमचे बेत समजले" तिने तिच्या छातीजवळून एक पाकीट काढले. ती म्हणाली, "हे माझे शेवटचे शब्द आहेत. हे पाकीट अलेक्सीसचे प्राण वाचवेल. मी

हे तुमच्याकडे, तुमच्या न्यायप्रियतेला सुपूर्द करते. हे घ्या. तुम्ही ते रशियन राजदूतावासाकडे द्याल. आता मी माझे कर्तव्य केले, आणि ---- "

होम्स ओरडला, "तिला थांबवा." त्याने तिच्या हातातून विषाची कुपी ओढून घेतली. त्याने खोली सर्व बाजूनी बंद केली होती.

ती परत अंथरुणावर बसत म्हणाली, "फार उशीर झाला. मी लपलेल्या जागेतून बाहेर येण्यापूर्वीच विष घेतले आहे. माझे डोके गरगरते आहे. मी चालले. सर, पाकीट विसरू नका, सर. मी तुमच्यावर ती जबाबदारी सोपवली आहे."

आम्ही परत गेलो तेव्हा होम्स म्हणाला, "साधी केस, पण काही बाबतीत उपयोगी आणि माहितीपूर्ण! नाकावर क्लिप असलेल्या चष्म्यापासून ती सुरु झाली आणि मरणाऱ्या माणसाने तो हिसकावून घेण्याच्या साधलेल्या सुदैवी संधीमुळे मी या केसची तड लावू शकलो. त्या चष्म्याच्या काचेचा टणकपणा बघून, तो वापरणारी व्यक्ती त्याच्याशिवाय आंधळी व बेसहारा झाली असणार, याची मला खात्री झाली. ती गवताच्या अरुंद पट्टीतून न अडखळता चालल्याचे तू म्हणालास, तेव्हा मी म्हटल्याचे तुला आठवत असेल की ही उल्लेखनीय बाब आहे. माझ्या मनात मी त्याची नोंद अशक्य अशी केली. फक्त तिच्याकडे तसाच दुसरा चष्मा असता, तरच ते शक्य होते. त्यामुळे मला असा अंदाज करावाच लागला, की ती घरातच असणार. दोन्ही पॅसेजचा सारखेपणा लक्षात घेता, ती अशी चूक करण्याची शक्यता असल्याचे लक्षात आले. त्यामुळे मग हे नक्की झाले, की ती प्राध्यापकाच्या खोलीत गेली असणार. त्याच्याशी संबंधित बाबींवर मी नजर ठेऊन होतो. त्यामुळे मी प्राध्यापकाच्या खोलीची काळजीपूर्वक तपासणी करून तिथे कुठे लपण्यासारखी जागा आहे का, याचा शोध घेतला. गालीचा सलग व जमिनीला घट्ट ठोकलेला होता. त्यामुळे त्यात काही चोरदरवाजा असण्याची कल्पना, मी फेटाळून लावली. पुस्तकांच्यामागे रिकामी जागा आहे का, याचाही मी शोध घेतला. तुम्हाला माहिती असेल की जुन्या वाचनालयात असे कप्पे असतात. माझ्या लक्षात आले की, सर्व कपाटे

पुस्तकांनी लगडलेली आहेत. पण एक कपाट रिकामे होते. मग तिथेच दार असू शकेल, असा अंदाज मी बांधला. मला मार्गदर्शन करायला त्यावर काही खुणा नव्हत्या. पण गालीचा फिकट करड्या विटकरी रंगाचा होता. त्यामुळे त्यावर काही पडलेले तपासणे सोपे होते. मी त्या छान सिगरेटी खूप ओढल्या आणि खोलीभर राख विखरून ठेवली. त्या संशय असलेल्या कपाटासमोर जरा जास्तच! ही साधी युक्ती होती. पण बरीच परिणामकारक होती. मग मी खाली गेलो. वॉटसन, तुझ्या देखत, पण तुझ्या लक्षात न आलेले वाक्य बोललो, प्राध्यापक कोरमचे जेवण हल्ली वाढले आहे ---- हे असे सांगण्यासाठी होते, की तो अजून एका व्यक्तीला पोसतो आहे. आपण परत वरती त्या खोलीत गेलो, तेव्हा सिगरेटची डबी विस्कटून मला जमिनीचे चांगले दृष्य बघायला मिळाले. सिगरेटच्या राखेवरील ठशांवरून मला पक्के कळले, की कैदी आपण तिथे नसतांना वावरलेली आहे. बरं, हॉपकीन्स, आपण इथे चेरिंग क्रॉसला आहोत. केस यशस्वीपणे सोडवल्याबद्दल, मी तुझे अभिनंदन करतो. तू आता तुमच्या मुख्य कार्यालयात जात असशील, यात काही संशय नाही. मला वाटते वॉटसन, आपण गाडीने रशियन राजदूतावासाकडे जाऊया.

## The Adventure Of Charles Augustus Milverton

## चार्ल्स ऑगस्टस मिलव्हेर्टनचे साहस



मी आता सांगतो आहे ती घटना घडल्याला अनेक वर्षे लोटली, तरी मी आत्मविश्वासाने त्याकडे तुमचे लक्ष वेधू शकतो. खासगी गोष्टी वा भावना उघड न करण्याच्या विचारामुळे, खूप काळ या गोष्टी जगजाहीर करता आल्या नाहीत. पण आता त्यातील मुख्य व्यक्ती, माणसाने बनवलेल्या कायद्याच्या पलीकडे गेल्यामुळे आणि त्यामुळे आता कोणीही दुखावले जाण्याची शक्यता न उरल्याने, त्यातील काही भाग वगळून, मी ही गोष्ट सांगू शकतो. मिस्टर शेरलॉक होम्स व मी या दोघांच्याही व्यावसायिक आयुष्यातील, पूर्णपणे अनन्यसाधारण असा हा अनुभव होता. प्रत्यक्ष या घटनेचा पाठपुरावा करणे शक्य होऊ नये, म्हणून ती केव्हा घडली व त्यातील काही भाग मी न सांगितल्यास, वाचकांनी मला समजून घ्यावे.

हिवाळ्यातील एका गार व धुके पडलेल्या संध्याकाळी, होम्स आणि मी फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडून साधारण सहाच्या सुमारास परत आलो होतो. होम्सने दिवा लावल्यावर टेबलावरील कार्डावर उजेड पडला. त्याने त्याकडे नजर टाकली आणि मग उबग आल्याचा उद्गार काढून, त्याने ते जमिनीवर फेकून दिले. मी ते उचलून वाचलेः

चार्ल्स ऑगस्टस मिलव्हेर्टन, अपेलडोर टॉवर्स, हँपस्टेड, दलाल.

मी विचारले, “हा कोण आहे?”

त्याने शेकोटीसमोर त्याचे पाय पसरत म्हटले, “लंडनमधील सर्वात वाईट माणूस. कार्डाच्या मागे काही लिहीले आहे का?”

मी कार्ड उलटले व वाचले,

“६.३० ला फोन करतो ---- चा. ऑ. मि.”

“हं. तो येणार असे दिसते आहे. वॉटसन, जेव्हा तू प्राणीसंग्रहालयात नागमोडी गतीने सरपटणाऱ्या, झेप घेणाऱ्या, भयानक डोळ्यांच्या, चपट्या, दुष्ट तोंडाच्या, विषारी सापासमोर उभा असतोस, तेव्हा तुला काही आक्रसल्यासारखी व भुळभुळल्यासारखी संवेदना होते का? मिलव्हेर्टनला पाहीले, की मला तसे होते. मी माझ्या व्यावसायिक आयुष्यात पन्नास तरी खुनी पाहीले असतील. पण याला बघून मला जशी किळस येते तशी कुणालाच पाहून आलेली नाही. तरीही मी त्याला संपर्क केल्यावाचून राहू शकत नाही. खरच, माझ्या बोलावण्यामुळेच तो इथे आलेला आहे.”

“पण तो कोण आहे?”

“मी तुला सांगतो, वॉटसन. तो ब्लॅकमेल करणाऱ्यांचा राजा आहे. देव माणसाना सुखरूप ठेवो, विशेषतः स्त्रियांना. कारण त्यांची कीर्ती व गुपिते मिलव्हेर्टनच्या अधिकारात आहेत. हसऱ्या चेहऱ्याने पण दगडी हृदयाने, तो सगळ्यांना ते पूर्णपणे सुकेपर्यंत पिळून घेतो.

त्याच्या पद्धतीने तो अती चाणाक्ष आहे आणि गोडपेक्षा मसालेदार व्यापारात त्याने चांगलाच ठसा उमटवला आहे. त्याची पद्धत अशी आहेः संपत्ती व वरचा हुद्दा असलेल्या लोकांच्या पत्रांसाठी तो खूप मोठी रक्कम द्यायला तयार असतो, हे तो जाहीर करतो. फक्त लबाड अंगरक्षक किंवा नोकरांकडून नव्हे, तर बरेच वेळा स्त्रियांच्या विश्वासातील प्रेमळ व नम्र भासणाऱ्या गुन्हेगारांकडूनही, तो ही रक्कम मिळवतो. चिक्कू माणसाबरोबर तो हातमिळवणी करत नाही. मला माहिती आहे की ज्यामुळे एक खानदानी कुटुंब उध्वस्त झाले, अशा एका दोन ओळींच्या पत्राकरता त्याने एका वॉचमनला सातशे रुपये दिले होते. बाजारातील प्रत्येक गोष्ट मिलव्हेर्टनकडे जाते आणि अशा शेकडो शहरांचा त्याच्या नावाने थरकाप होतो.

कोण कसे त्याच्या पकडीत येईल, ते सांगता येत नाही. कारण तो अती श्रीमंत आहे आणि लबाडी करण्यात फार हुशार आहे. तो एखादे पत्र वर्षानुवर्षे जपून ठेवेल आणि जेव्हा त्याचा बाजारभाव वधारेल, तेव्हा तो ते बाहेर काढेल. म्हणून मी असे म्हणालो, की तो लंडनमधील सर्वात वाईट माणूस आहे. जो आधीच स्वतःची खासगी मालमत्ता भरून वहात असतांना, स्वतःच्या मित्रावर रक्तपाती हल्ला करायला मागेपुढे बघत नाही, व्यवस्थित बेत आखून, सवडीने, त्याला छळून चिरडीस आणतो, अशा एखाद्या गरम रक्ताच्या आक्रमक गुन्हेगाराला तू काय म्हणशील?

मी माझ्या मित्राला इतके जीव तोडून बोलतांना ऐकले नव्हते.

मी म्हणालो, "पण तो माणूस नक्कीच कायद्याच्या कचाट्यात सापडेल, नाही का?"

"तांत्रिक दृष्ट्या नक्कीच, पण प्रत्यक्षात नाही. उदाहरणार्थ, जर एखाद्या बाईचा सर्वनाश ओढवणार असेल, तर त्याला काही वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊन तिचा काय फायदा आहे? तो ज्यांचे बळी घेतो, ते त्याला प्रतिकार करू शकत नाहीत. जरी त्याने एखाद्या निरागस माणसाला ब्लॅकमेल केले, तर खरच तो पकडला गेला पाहीजे, पण तो पापी आणि लबाड

आहे. तो दुष्ट माणसासाठी जशी लबाडी करेल, तशीच निरागस माणसांसाठीही करतो. नाही. नाही. आपण त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी, काही दुसरे नवीन मार्ग शोधले पाहिजेत."

"आणि तो इथे कशासाठी येतो आहे?"

"कारण एका प्रसिद्ध अशा माझ्या अशीलाने तिची करूणापूर्ण केस माझ्याकडे सोपवली आहे. ती इव्हा ब्लॅकवेल, मागील ऋतुतील सर्वात सुंदर उच्चभ्रू खानदानी बाई आहे. डोव्हेरकोर्टच्या उमरावाबरोबर पंधरवड्यात तिचे लग्न होणार आहे. या दुष्टाकडे तिने बेदरकारपणे लिहिलेली बरीच पत्रे आहेत. वॉटसन, बेदरकारपणे लिहिलेली! ---- त्याहून वाईट काही नाही ---- ती गावातील एका फारशा श्रीमंत नसलेल्या तरुण जमीनदाराला लिहिलेली आहेत. त्याने हे लग्न मोडू शकते. मिलव्हेर्टनला मोठे घबाड मिळाले, तर तो ती पत्रे उमरावाला पाठवणार आहे. मला मध्यस्थ म्हणून काम करायचे असून त्याच्याबरोबर शक्य तेवढा चांगला सौदा करायचा आहे."

त्याच क्षणी खाली रस्त्यात गडबड सुरु झाली. खाली बघतांना मला चकचकीत पार्श्वभागाशी चमचमते दिवे असलेल्या, दोन घोड्यांची ऐटदार गाडी दिसली. टांगेवाल्याने दार उघडले आणि एक गबाळ्या लोकरीच्या कोटातील दणकट, बुटका इसम खाली उतरला. मिनिटाभराने तो आमच्या खोलीत होता.

चार्ल्स ऑगस्टस मिलव्हेर्टन बुद्धिमान, मोठ्या डोक्याचा, गोल, फुगीर, लवरहीत चेहऱ्याचा, सतत त्याच प्रकारचे थंड हसू हसणारा, मोठ्या सोनेरी फ्रेमच्या चष्म्याआडून दोन करडे डोळे चमकणारा, पन्नाशीचा इसम होता. दिसायला तो मिस्टर पिकविकसारखा नीटनेटका व दयाळू दिसत होता. पण अस्थिर व भेदक डोळे आणि कृत्रिम हास्यातील लबाडी, मात्र विरोधाभासात्मक वाटत होती. त्याचा छोटासा गोबरा हात पुढे करून तो आला तेव्हा, त्याच्या चेहऱ्यासारखाच त्याचा आवाजही ह्ळूवार व आत्मविश्वासपूर्ण वाटला. आमच्याबरोबर त्याची एक भेट चुकल्याबद्दल तो खंत वाटून, काही शब्द पुटपुटला. त्याने पुढे केलेल्या

हाताकडे होम्सने दुर्लक्ष केले व कठोर चेहऱ्याने त्याच्याकडे पाहीले. मिलव्हेर्टनचे हास्य रुंदावले, त्याने खांदे उडवून त्याचा कोट काढला. काळजीपूर्वक त्याची घडी करुन खुर्चीच्या पाठीवर ठेवली व बसला.

मझ्याकडे निर्देश करत तो म्हणाला, “हा माणूस इथे असला तर चालेल का? हे बरोबर आहे का?

“हा डॉ वॉटसन, माझा मित्र आणि व्यवसायातील भागीदार आहे.”

“ठीक आहे, मिस्टर होम्स. हे फक्त तुमच्या अशीलाच्या काळजीपोटी मी बोललो. हे प्रकरण खूपच नाजूक आहे ---- ”

“डॉ वॉटसनने त्याबद्दल आधीच ऐकलेले आहे.”

“मग आपण कामाकडे वळू. तुम्ही म्हणता की तुम्ही इव्हा बाईसाहेबांसाठी काम करत आहात. माझ्या अटी मान्य करण्याचे अधिकार तिने तुम्हाला दिले आहेत का?”

“तुमच्या अटी काय आहेत?’

“सात हजार पौंड.”

“आणि दुसरा पर्याय?”

“माझ्या प्रिय सर, त्याची चर्चा करायला मला दुःख होते. पण जर मला पैसे १४ तारखेपर्यंत मिळाले नाहीत, तर १८ तारखेला नक्कीच लग्न होणार नाही.” त्याचे असह्य हसू नेहमीपेक्षा जास्त समाधानाचे होते.

होम्सने क्षणभर विचार केला.

शेवटी तो म्हणाला, “तुम्ही सगळे काही फारच मान्य असल्यासारखे धरून चालता. अर्थात मला त्या पत्रांमधील मजकुराबद्दल कल्पना आहे. मी तिला सल्ला देईन, त्याप्रमाणे ती

वागेल. मी तिला असा सल्ला देईन, की तिने तिच्या होणाऱ्या नवऱ्याला सर्व गोष्टी सांगून त्याच्या उदारतेवर विश्वास ठेवावा."

मिलव्हेर्टन गालातल्या गालात हसला व म्हणाला,

"तुम्ही त्या उमरावाला ओळखत नाही."

होम्सच्या रागावलेल्या चेहऱ्याकडे बघून मला कळले, की तो त्या उमरावाला ओळखत होता.

त्याने विचारले, "त्या पत्रांमध्ये त्रासदायक असे काय आहे?"

मिलव्हेर्टन उत्तरला, "ती पत्रे स्फोटक आहेत -- फार स्फोटक! ती स्त्री छान लिहिणारी होती. पण मी तुम्हाला खात्री देतो की डोव्हेरकोर्टचा उमराव त्यांची स्तुती करणार नाही. तरीही तुम्हाला असे वाटत नसेल, तर आपण इथेच थांबू. हा शुद्ध व्यवहार आहे. जर ही पत्रे उमरावाच्या, हातात पडावीत, हा तुमच्या अशीलासाठी उत्तम पर्याय असल्याचे तुम्हाला वाटत असेल, तर ती मिळवण्यासाठी मोठी रक्कम तुम्ही खर्च करणे खरेच मूर्खपणाचे ठरेल." तो उठला व त्याचा मेंढीच्या कातड्याचा कोट घेतला.

होम्स रागाने खजील झाला.

तो बोलला, "एक मिनिट थांबा. तुम्ही फारच घाई करता. अशा नाजूक प्रकरणात काही गैर गोष्ट व्हायला नको म्हणून, आपण निश्चितपणे प्रयत्न केला पाहीजे."

मिलव्हेर्टन परत त्याच्या खुर्चीत बसला.

तो समाधानाने हळू आवाजात म्हणाला, "तुम्ही त्याचा अशा तऱ्हेने विचार कराल, असे मला वाटलेच होते."

होम्सने चालू ठेवले, "तथापि इव्हा बाईसाहेब काही श्रीमंत नाहीत. मला वाटते दोन हजार पौंड म्हणजे डोक्यावरून पाणी ठरेल. तुम्ही सांगितलेली रक्कम तिच्या ऐपतीबाहेरील आहे. त्यामुळे मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही ही रक्कम कमी करावी आणि त्या किमतीला ती पत्रे परत करावीत. मी तुम्हाला खात्री देतो की जास्तीत जास्त तेवढेच पैसे तुम्हाला मिळू शकतील."

मिलव्हेर्टनचे हास्य रुंदावले आणि त्याचे डोळे विनोदाने चमकले.

"तुम्ही त्या बाईसाहेबांच्या सांपत्तिक स्थितीबद्दल जे काही सांगत आहात, त्याबद्दल मी जाणतो. तरीही तुम्हाला हे कबूल केले पाहीजे, की तिचा विवाहप्रसंग हा मित्र आणि नातेवाईक यांच्यासाठी तिला भेटी देण्यास, अगदी अनुकूल आहे. लग्नाची भेट स्वीकारण्यासाठी कदाचित तिच्याकडील लोक कां कू करतील. आपण त्यांना अशी खात्री देऊ, की इतर कुठल्याही भेटींपेक्षा, झुंबराच्या लखलखाटापेक्षा आणि लंडनमधील मलईयुक्त मिठाईपेक्षा, हा पत्रांचा गठ्ठा तिच्या दृष्टीने जास्त आनंददायक ठरेल.

होम्स म्हणाला, "हे शक्य नाही."

खिशातून एक जाड डायरी काढत मिलव्हेर्टन किंचाळला, "अरे मित्रा, हे किती दुर्दैव आहे! प्रयत्न न करण्याचा चुकीचा सल्ला स्त्रियांना दिला जातो, असेच मला ठामपणे वाटते. हे बघा." त्याने पाकिटावरील लिहिलेला लहानसा भाग पुढे धरला. हे कोणाचे नाव आहे माहिती आहे का? -- पण जाऊदे -- कदाचित उद्या सकाळपर्यंत ते नाव सांगणे ठीक नाही. आणि तेव्हा ते त्या स्त्रीच्या नवऱ्याच्या हातातच पडेल. आणि हे सगळे का, तर ती तिच्याकडील हिरे विकून एक किरकोळ रक्कम मिळवू शकत नाही, म्हणून. हे फारच दयनीय आहे. माननीय मिस माईल्स व कर्नल डॉरकिंग यांच्या साखरपुडा मोडलेला तुला आठवतो आहे का? लग्नाच्या दोन दिवस आधी वर्तमानपत्रात तो फिस्कटल्याचे छापून आले होते. आणि का? यावर विश्वास बसणार नाही, पण केवळ बारा हजार पौंडांनी सर्व काही सुरळीत झाले असते. हे दयनीय

नाही का? आणि इथे मी तुमच्या अशीलाचे भवितव्य टांगणीला लागलेले असतांना, तुमच्यासारख्या शहाण्या माणसाला माझ्या अटीमध्ये घासाघीस करतांना पाहतो आहे. मिस्टर होम्स, तुम्ही मला आश्चर्यचकित करत आहात."

होम्स बोलला, "मी म्हणतो ते खरे आहे. तेवढे पैसे मिळणार नाहीत. तुम्हाला काहीही फायदा होणार नसलेले, त्या स्त्रीचे चारित्र्य डागाळण्यापेक्षा, तुम्ही माझी कमी रकमेची मागणी स्वीकारावी, तेच तुमच्यासाठी चांगले ठरेल."

"मिस्टर होम्स, तुम्ही चूक करत आहात. तिला असे उघडे पाडणे, मला खूपच फायद्याचे ठरेल. माझ्याकडे अशा आठ दहा केसेस आहेत. जर त्यांना इव्हा बाईसाहेबांच्या केसबद्दल समजले, तर ते देखील असेच करायला बघतील. तुम्हाला माझे म्हणणे कळते आहे का?"

होम्स त्याच्या खुर्चीतून उडी मारून उठला.

"वॉटसन, त्याच्या मागे उभा रहा. त्याला बाहेर जाऊ देऊ नको. आता, सर, तुमच्या डायरीत काय लिहिलेले आहे ते आपण बघू."

मिलव्हेर्टन एखाद्या उंदरासारखा सुळकन खोलीच्या कडेला जाऊन भिंतीला पाठ टेकवून उभा राहीला.

त्याचा कोट उलगडून आतील खिशातील मोठे पिस्तुल बाहेर काढून सरसावत, तो म्हणाला, "मिस्टर होम्स, मिस्टर होम्स, तुम्ही असा काहीतरी पवित्रा घ्याल, असे मला वाटतच होते. असे कैक वेळा केले गेले आहे. पण त्याचा काय फायदा आहे? तुम्हाला सांगतो मी सुसज्ज आहे आणि कायदा मला दुजोराच देईल, हे जाणून मी माझ्याकडील शस्त्र वापरायला अजिबात मागेपुढे बघणार नाही. त्याशिवाय तुमची जी समजूत आहे, की मी पत्रे माझ्या डायरीतून इथे आणली आहेत, तर ती फार चुकीची आहे. मी इतका मूर्खपणा करणार नाही. आणि आता, सभ्य गृहस्थहो, आज संध्याकाळी माझ्या एकदोन मुलाखती ठरलेल्या आहेत. हॅंपस्टेड इथून

बरेच लांब आहे.” तो पुढे सरला, त्याचा कोट घेतला व हातात पिस्तुल घेऊन दाराशी गेला. मी एक खुर्ची उचलली. पण होम्सने मान हलवली. मग मी ती परत ठेऊन दिली.थोडेसे वाकून, हसत, मिलव्हेर्टन खोलीबाहेर पडला आणि काही मिनिटात आम्ही तो निघून जातानाचा, गाडीच्या दारांचा व चाके घसपटल्याचा आवाज ऐकला.

हात खिशात घालून, हनुवटी छातीत रुतवून, जळणाऱ्या कोळशावर नजर स्थिर करून, अर्धा तास होम्स तसाच स्वस्थपणे शेकोटीशेजारी बसलेला होता. नंतर तो निर्णय घेतलेल्या माणसाच्या आविर्भावात उठून, त्याच्या झोपायच्या खोलीत गेला. थोड्या वेळाने, असातसा दिसणाऱा, बोकडासारखी दाढी असलेला तरुण कामगार रस्त्यावर उतरला. तत्पूर्वी, उद्दामपणे त्याने त्याचा मातीचा पाईप दिव्यावर पेटवला. तो म्हणाला, “वॉटसन, मी थोड्या वेळाने येतो.” व रात्रीत अदृष्य झाला. मला समजले की त्याने चार्ल्स ऑगस्टस मिलव्हेर्टनविरुद्ध त्याची मोहीम उघडलेली आहे. पण ही मोहीम भविष्यात वेडावाकडा आकार घेणार असल्याचे स्वप्न मी बघितले.

होम्स त्याच्या त्या वेषात सर्व वेळ काळ हिंडत होता. पण त्याव्यतिरिक्त वेळ तो हँपस्टेडमध्ये घालवत होता आणि तो फुकट गेला नाही. तो काय करत आहे, ते मला काही माहिती नव्हते. शेवटी खिडकीवर वारा जोराने आवाज करत असलेल्या, एका रानटी, संमिश्र गोंधळलेल्या भावनांनी भरलेल्या संध्याकाळी, तो त्याच्या शेवटच्या मोहिमेवरून परतला. त्याचा वेष बदलून तो शेकोटीसमोर बसला व त्याच्या शांत अंतर्मुख पद्धतीने हसू लागला.

“वॉटसन, तू मला विवाहित माणूस समजणार नाहीस, नाही का?”

“नाही.”

“तुला हे ऐकून नवल वाटेल, की माझे लग्न ठरले आहे.”

“अरे माझ्या मित्रा, मी तुझे अभि ---- ”

“मिलव्हेर्टनच्या घरातील नोकराणीबरोबर.”

अरे बापरे, होम्स!”

“वॉटसन, मला माहिती हवी होती.’

“तू हे जरा जास्तच केलेस. नाही का?”

“त्याची गरज होती. मी होतकरू प्लंबर असून माझे नाव एस्कॉर्ट आहे. मी तिच्याबरोबर रोज संध्याकाळी फिरायला जातो व तिच्याशी बोलतो. ओळख बरं, मी काय बोलत असेन? पण मला पाहिजे ती सगळी माहिती मिळाली. माझ्या हाताच्या तळव्याइतके मला मिलव्हेर्टनचे घर माहिती झाले.”

“पण त्या बाईचे काय?”

त्याने त्याचे खांदे उडवले.

“माझ्या प्रिय वॉटसन, त्याला काही इलाज नाही. जेव्हा तुमच्याबरोबर लबाड माणूस खेळत असतो, तेव्हा तुम्हाला अशी चलाखी करावीच लागते. तरीही मला सांगायला आनंद होतो, की माझी पाठ वळल्याबरोबर मला भोसकेल असा, मी द्वेष करतो असा, एक शत्रू आहे. आज काय बहारदार रात्र आहे!’

“तुला अशी हवा आवडते?’

“माझ्या हेतूला साजेशी अशी ती आहे. वॉटसन, मिलव्हेर्टनच्या घरात शिरून गुन्हा करण्यासाठी, असे मी म्हणतो आहे.”

त्याने दृढ निश्चयाने केलेले वक्तव्य ऐकून माझा श्वास अडला गेला व मी गार पडलो. अशा कृत्याचा रानटी मोठा परिणाम, क्षणार्धात माझ्या डोळ्यांपुढे चमकून गेला. होम्सला ओळखणे, मग पकडणे व मग त्याच्या मान द्यावा अशा व्यावसायिक आयुष्याचे न भरून

येणारे नुकसान! आणि मग माझा मित्र अगदी नकोशा अशा घाणेरड्या मिलव्हेर्टनकडे दयेची भीक मागत पडलेला!

मी ओरडलो, "होम्स, कृपा करून, तू काय करतो आहेस, याचा नीट विचार कर."

"अरे माझ्या प्रिय मित्रा, मी ते सर्व काही लक्षात घेतले आहे. मी अचानक फसलो जाईन असे कुठलेच कृत्य मी करत नाही. खरेच दुसरे काही करणे शक्य असते, तर मी इतक्या उत्साहाने धोकादायक असे हे सोंग घेतले नसते. या गोष्टीकडे आपण स्पष्टपणे व चांगुलपणे पाहू. हा तांत्रिक दृष्ट्या गुन्हा असला तरी, तात्विक दृष्ट्या योग्य असल्याचे तू कबूल करशील, असे मला वाटते. त्याच्या घरात चोरी करणे म्हणजे त्याच्या खिशातील डायरी हिसकावून घेणे असेल आणि त्यात तू मला मदत करणार आहेस."

मी माझी मानसिक तयारी केली व म्हणालो,

"हो. जोपर्यंत आपण बेकायदेशीर कारणाने काही चोरत नाही आहोत, तोपर्यंत ते तात्विक दृष्ट्या न्याय्य आहे."

"तेच तर! हे तात्विक दृष्ट्या न्याय्य असल्याने, मला फक्त व्यक्तीगत धोका आहे. जेव्हा एखाद्या स्त्रीला अगदी निकडीच्या मदतीची गरज असेल, तेव्हा सभ्य गृहस्थाने त्याचे फार ओझे समजायचे काही कारण नाही, नाही का?"

"पण तू इतक्या अडचणीच्या परिस्थितीत असशील."

"हो, तेवढा धोका आहे. ती पत्रे मिळवण्याचा दुसरा कुठला मार्ग नाही. त्या दुर्दैवी स्त्रीकडे पैसे नाहीत आणि तेवढा विश्वास टाकण्यासारखे कुणी माणूस नाही. उद्याचा दिवस ही चाल खेळायचा शेवटचा दिवस आहे. पत्रे मिळवली नाहीत, तर तो दुष्ट त्याचे बोलणे खरे करेल आणि तिला संकटात लोटेल. त्यामुळे मला माझ्या अशीलाला तिच्या नशिबावर तरी सोडले पाहीजे किंवा माझा हा शेवटचा उपाय अंमलात तरी आणला पाहीजे.

“वॉटसन, हा मिलव्हेर्टन व माझ्यातील अटीतटीचा सामना आहे तू पाहिल्याप्रमाणे, त्याच्याकडे त्याने लावलेली बोली आहे. पण माझा आत्मविश्वास व माझी किर्ती यामुळे मी त्याला हरवू शकेन.

मी म्हणालो, “ठीक आहे. मला हे आवडलेले नाही. पण मी समजतो, की ते करावेच लागेल. आपण कधी सुरवात करायची?’

“तू येत नाही आहेस.”

मी बोललो, “तर मग तू ही जात नाही आहेस. तू मला या साहसात सहभागी करून घेतले नाहीस, तर मी टांग्याने सरळ पोलीस स्टेशनला जाऊन, तुझा सर्व बेत त्यांच्या कानावर घालीन.”

“तू काही ऐकणार नाहीस.”

“ते तुला कसे कळले? काय होईल, ते तू सांगू शकत नाहीस. तसेही माझा निर्णय झालेला आहे. तुझ्याशिवाय इतर लोकांनाही स्वाभिमान व किर्ती असते.”

होम्स चिडलेला दिसला. पण त्याची चढलेली भुवई खाली आली आणि त्याने मला माझ्या खांद्यावर थोपटले.

“ठीक आहे. ठीक आहे. माझ्या प्रिय मित्रा, तर असेच होवो. आपण काही वर्षे ही खोली दोघांनी मिळून वापरली, आणि आता आपण शेवटही एकत्रच केला तर ते मनोरंजक ठरेल. वॉटसन, मला तुझ्याजवळ कबूल करायला काही प्रत्यवाय नाही. माझ्याकडे नेहमी अशी कल्पना होती की मी फार चांगला गुन्हेगार होऊ शकलो असतो. माझ्या आयुष्यभर मला त्या दिशेने जाण्याची संधी होती. हे बघ!” त्याने खणातून एक चामड्याची थैली बाहेर काढली आणि ती उघडून बरीच चकाकणारी अवजारे बाहेर काढून दाखवू लागला. “हे नंबर एकचे चोरीचे साहित्य आहे. हा दार किंवा खिडकी उघडायचा निकेलचा लेप असलेला बार आहे. हे टोकाला

हिरे बसवलेले काच कापायचे हत्यार आहे. या बऱ्याच कुलुपांना लागणाऱ्या किल्ल्या आहेत. आणि आधुनिक संस्कृतीतील सर्व सुधारित हत्यारे यात आहेत. माझा कंदीलही आहे. सगळे व्यवस्थित लावलेले आहे. तुझ्याकडे न वाजणाऱ्या बुटांची जोडी आहे का?"

"माझ्याकडे टेनिस खेळायचे रबरी तळव्याचे बूट आहेत."

"छान! आणि मुखवटा?"

"काळ्या रेशमी कापडापासून मी खूप मुखवटे बनवू शकतो."

"मला वाटते अशा गोष्टींसाठी तुझ्याकडे नैसर्गिक रीत्या बळकट इच्छा आहे. आपण निघण्यापूर्वी थंड जेवण घेऊ. आता साडेनऊ झाले आहेत. अकरा वाजता आपण चर्चच्या ओळींमधून जाऊ. तेथून ॲपलडोर टॉवरला चालत जायला पाऊण तास लागेल. मध्यरात्रीपूर्वी आपण कामाला लागू. मिलव्हेर्टन हा झोपेचा पक्का आहे आणि रोज साडेदहाला नियमितपणे झोपतो. सर्व गोष्टी सुरळीत पार पडल्या तर इव्हा बाईसाहेबांची पत्रे माझ्या खिशात घेऊन आपण इथे दोनपर्यंत परत येऊ."

होम्सने व मी सिनेमा बघून घरी परत चालल्यासारखे वाटू, असे कपडे घातले. ऑक्सफर्ड रस्त्याला आम्ही टांगा केला व हँपस्टेड येथील पत्त्यावर चालू पडलो. टांगेवाल्याला पैसे दिले आणि मरणाची थंडी असल्याने, आमचे बटणबंद कोट घालून आम्ही माळरानावरून चालू लागलो. होम्स म्हणाला, "हे काम अगदी नाजूकपणे करायला हवे. त्या माणसाच्या अभ्यासिकेतील तिजोरीत, ती कागदपत्रे आहेत आणि अभ्यासिका त्याच्या झोपायच्या खोलीला लागून आहे. तर दुसरीकडे, इतर सर्व तब्येत चांगली असलेल्या दणकट छोट्या माणसांप्रमाणे, तो ढाराढूर झोपणारा आहे. अगाथा ---- म्हणजे माझी प्रेयसी ---- म्हणते की आम्हा नोकरांमध्ये असा विनोद चालतो की आपल्या मालकाला झोपेतून जागे करणे अशक्य आहे. त्याचा सचिव अगदी त्याला वाहून घेतलेला माणूस आहे आणि तो दिवसभर अभ्यासिकेत जराही आवाज करत नाही. म्हणून आपण रात्री जात आहोत. त्याच्या बागेत एक भयाण

पशुतुल्य कुत्रा फिरत असतो. मी अगाथाला गेले दोन संध्याकाळी उशिरा भेटलो आणि ती त्या जनावराला कोंडून ठेवते व मला यायला सुरक्षित वाट करून देते. हेच ते घर. आजूबाजूला पसरलेल्या जमिनीवरील, हेच ते घर. आता गेटमधून ---- आता हिरव्या, काळसर झुडूपांमधून उजवीकडे जायचे. मला वाटते, आपण आपले मुखवटे आता घालू. तू बघशील की इथे कुठल्याही खिडकीतून प्रकाशाचा काहीही मागमूस नाही आणि सर्व काही उत्तम चाललेले आहे."

आमचे काळे रेशमी मुखवटे घालून आम्ही लंडनमधील जोरदारपणे मारामारीसाठी तयार असलेल्या आकृत्या झालो. अंधारी, शांत घरात आम्ही शिरलो. घराच्या एका बाजूने लांबवर जाणारा, फरशा बसवलेला व्हरांडा होता. त्यात अनेक खिडक्या व दोन दारे होती.

होम्स कुजबुजला, "ही त्याची झोपायची खोली आहे. हे दार सरळ अभ्यासिकेत उघडते. ते आपल्यासाठी चांगले ठरेल. पण त्याला कडीकुलुप आहे. आपण आत जातांना फार आवाज होईल. इकडे ये. इथे हॉलमध्ये उघडणारे हरितगृह (ग्रीन हाऊस) आहे."

ती जागा कुलुपबंद होती. पण होम्सने काचेचा गोल फिरवून, आतून किल्ली फिरवली. क्षणभराने त्याने आमच्यामागील दार लावले. आता आम्ही कायद्याच्या भाषेत गंभीर गुन्हेगार झालो. हरितगृहातील दाट, गरम हवा आणि उग्र, गुदमरवणारा परदेशी वेगळ्या झाडांचा गंध आमच्या घशापर्यंत गेला. मी हळूवारपणे आमच्या चेहऱ्याला घसपटणाऱ्या झुडुपांच्या कडेनी जात राहीलो. होम्सकडे उल्लेखनीय शक्ती होती. अंधारात दिसायचा त्याने काळजीपूर्वक सराव केला होता. माझा हात त्याने त्याच्या एका हातात धरला होता. आणि मला अंदाजाने कळत होते, की आम्ही सिगरेट ओढून फार वेळ न झालेल्या, एका मोठ्या खोलीत शिरत होतो. त्याने फर्निचरमधून वाट काढत, दुसरे दार उघडले व आमच्या मागे लाऊन घेतले. भिंतीवरील अनेक कोट माझ्या पुढे केलेल्या हाताला लागले. मला समजले की मी पॅसेजमध्ये उभा आहे. आम्ही तेथून पुढे गेलो आणि होम्सने हळूच उजवीकडील दार उघडले. आमच्यावर काहीतरी

चालून आले आणि माझ्या काळजाचा ठोका चुकला. पण ते मांजर असल्याचे समजल्यावर मला हसू आले. या नव्या खोलीत शेकोटी जळत होती. आणि खोलीत तंबाखूचा धूर भरून राहीला होता. होम्स चोरपावलांनी आत शिरला, मी येईपर्यंत थांबला. आणि मग आवाज न करता दार लावले. आम्ही आता मिलव्हेर्टनच्या अभ्यासिकेत होतो. पुढील बाजूस असलेल्या दाराच्या पडद्याआड झोपायच्या खोलीत जाण्याचा मार्ग दिसत होता.

शेकोटीच्या उजेडाने खोली प्रकाशित झालेली होती. परावर्तित प्रकाशात दाराजवळ मी वीजेचा बोर्ड पाहीला. तो लावायला सुरक्षित असला तरी त्याची काही गरज नव्हती. शेकोटीच्या एका बाजूला, खाडीचे दृष्य दिसणाऱ्या, आम्ही बाहेरून बघितलेल्या खिडकीवर जाड पडदा होता. तर दुसऱ्या बाजूला व्हरांड्यात उघडणारे दार होते. मध्यभागी एक टेबल होते. त्याजवळ चकाकणारी, लाल चामड्याची, फिरणारी खुर्ची होती. त्यासमोर एक पुस्तकांचे कपाट होते. त्याच्या टपावर अथेन्सच्या देवतेचा संगमरवरी पुतळा होता. पुस्तकाचे कपाट व व भिंत यामधील कोपऱ्यात, उंच, हिरवी तिजोरी होती. त्याच्या ब्रासच्या चकचकीत मुठींवरून शेकोटीचा उजेड परावर्तित होत होता. होम्सने हिंडून तिचे निरीक्षण केले. मग तो झोपायच्या खोलीकडे रांगत गेला व तिथे डोके वाकवून लक्षपूर्वक ऐकत उभा राहीला. आतून काही आवाज येत नव्हता. मध्यंतरीच्या काळात माझ्या असे लक्षात आले, की आमचे तेथे बाहेरील दाराने जाणे जास्त सुरक्षित ठरले असते, म्हणून मी त्याची तपासणी केली. आणि आश्चर्य म्हणजे त्याला कडीकुलुप काही नव्हते. मी होम्सच्या खांद्याला हलवले, तेव्हा त्याने त्याचा मुखवटा घातलेला चेहरा वळवला. त्याने देखील ते पाहील्यावर माझ्यासारखाच तोही आश्चर्यचकित झाला.

माझ्या कानांजवळ त्याचे ओठ आणून तो कुजबुजला, “मला हे आवडले नाही. हे असे कसे काय आहे, मला कळत नाही. तसेही आपल्याकडे फुकट घालवायला वेळ नाही.”

“मी काही करू शकतो का?”

"हो. दाराशी उभा रहा. जर तुला कोणी येताना चाहूल लागली, तर ते आतून लावून घे. आणि आपण आलो तसेच निसटू शकतो. जर ते दुसऱ्या मार्गाने आले आणि आपले काम झाले असेल, तर आपण दारातून निसटू शकतो. काम झाले नसेल, तर आपण खिडकीच्या पडद्यामागे लपू शकतो. समजले का?"

मी मान हलवली आणि दाराशी उभा राहीलो. माझी पहीली भीती गेली. कायद्याचे रक्षक असण्याऐवजी भक्षक असतानाच्या, खूप दमदारपणाने व उत्साहाने मी रोमांचित झालो होतो. आमच्या मोहिमेचे उद्दिष्ट, निःस्वार्थी व उदार सद्सदविवेकबुध्दी, आमच्या शत्रूचा खलनायकीपणा, या सर्वामुळे आमच्या साहसाला खेळीमेळीच्या रुचीपूर्णतेची जोड मिळाली. अपराधीपणाच्या भावनेपासून आम्ही लांब होतो. या धोक्यात मला आनंद वाटत होता. एखादा शल्यविशारद ज्या शांतपणे व शास्त्रीय नेमकेपणे नाजूक शस्त्रक्रिया पार पाडेल, तसेच होम्स त्याची अवजारे चालवत होता. त्याचे कौतुक वाटून, मी त्याच्याकडे बघत होतो. मला माहिती होते की तिजोरी उघडणे हा त्याचा छंद होता. एखादा ड्रॅगन ज्याप्रमाणे त्याच्या तोंडात धरलेल्या सुंदर स्त्रियांचे किर्तीहरण करतो, त्याप्रमाणे या हिरवट राक्षसी सोनेरी तिजोरीशी झटापट करतांना होम्सला आनंद होत असल्याचे मला जाणवत होते. त्याच्या कोटाचे हात वर दुमडून ---- वरचा जाड कोट त्याने खुर्चीवर ठेवला होता ---- होम्सने दोन भोके पाडली. एक बारचा जोर लाऊन उघडण्यासाठी लहानसे आणि दुसरे मोठे कुठलेही कुलूप उघडणाऱ्या किल्लीचे. मी माझी नजर चौकसपणे इकडेतिकडे टाकत, कुठल्याही आणीबाणीच्या तयारीत, मधल्या दाराशी उभा होतो. जर आमच्यामध्ये काही अडथळा आलाच, तर मी नेमके काय करणार, याबाबत माझे बेत खरे तर तसे डळमळीतच होते. अर्धा तास होम्स लक्ष एकवटून काम करत होता. तो एक अवजार खाली ठेवे, दुसरे हातात घेई. यंत्रे हाताळणाऱ्या प्रशिक्षित कामगारासारखा पूर्ण ताकदीनिशी, तरीही नाजूकपणे त्याचे काम चालले होते. शेवटी मला एक खट् असा आवाज आला व तिजोरीचे दार उघडले. आत त्यावर काही लिहिलेली, अनेक कागदांची घट्ट बांधून सील केलेली भेंडोळी मला दिसली. होम्सने त्यातील एक बाहेर काढले.

पण त्यावरील अक्षरे वाचण्यासाठी शेकोटीचा मिणमिणता उजेड पुरेसा नव्हता. त्याने त्याचा कंदील बाहेर काढला. मिलव्हेर्टन पुढच्या खोलीत झोपलेला असतांना विजेचा दिवा लावणे फार धोकादायक होते. अचानक मी त्याला कान देऊन ऐकताना पाहीले. नंतर क्षणार्धात त्याने तिजोरीचे दार लोटले. कोट घेतला, हत्यारे गोळा करून खिशात ठेवली व खिडकीच्या पडद्यामागे लपला. मलाही तसे करण्यासाठी खूण केली.

मी तिथे त्याच्या शेजारी जाऊन उभा राहिलो, तेव्हा त्याच्या झटपट जाणीवेला कसला आवाज आला, ते मला समजले. घरात काहीतरी आवाज येत होता. काही अंतरावर एक दार धाडकन लावले गेले. मग एक गोंधळलेली, हलकी कुजबुज ऐकू आली. काही पडल्याचा आवाज आला व दाणदाण पाऊलांचा आवाज जवळ येऊ लागला. खोलीबाहेरील पॅसेजमध्ये ते आले. दरवाज्याशी थांबले. दार उघडले. खट् असा आवाज येऊन दिवा लागला. दार लागले. नाकाला सिगरेटचा उग्र दर्प आला. मग आमच्यापासून काही फुटांवर पुढेमागे पाऊले वाजत राहीली. खुर्चीचा आवाज आला व पाऊले थांबली. मग कुलुपात किल्ली घातली गेली आणि कागदांचा खुसखुस आवाज आला.

आतापर्यंत मी बाहेर डोकावण्याचे धाडस केले नव्हते. पण आता मी पडद्याच्या फटीतून बाहेर डोकावलो. होम्सने माझ्या खांद्यावर दिलेल्या जोराने, मला समजले की तो देखील तसेच करत आहे. आमच्या समोर अगदी जवळ मिलव्हेर्टनची मोठी गोल पाठ होती. हे नक्की होते, की त्याने आम्हाला पाहीले नव्हते. तो झोपायच्या खोलीत गेला नाही. पण सिगरेट ओढायच्या किंवा बिलीयर्ड खेळायच्या खोलीत जाऊन बसला असावा. त्या घराच्या पुढच्या बाजूला होत्या व त्यांच्या खिडक्या आम्ही पाहील्या नव्हत्या. त्याचे करड्या केसांचे मोठे डोके, मध्येच चकाकणारे टक्कल हे आमच्या नजरेपासून जवळच होते. चामड्याच्या लाल खुर्चीत तो मागे रेलून बसला होता. पाय ताणले होते. तोंडात मोठी काळी सिगरेट होती. त्याने अंगात मिलिट्रीसारखे जांभळट लाल रंगाचे, काळी कॉलर असलेले जाकीट घातले होते. त्याच्या

हातात असलेले काही कायदेशीर कागद तो ओठातून धुम्रवलये सोडत, बेफिकीरीने वाचत होता. त्याच्या आरामशीर बसण्यावरून, तो तिथून लवकर उठेल, असे काही वाटत नव्हते.

होम्सचा माझ्या हातातील हात, मला समजूत काढल्यासारखा हलतांना जाणवत होता. जणू तो सांगत होता, की परिस्थिती त्याच्या हातात आहे आणि तो स्वस्थचित्त आहे. मला जे दिसत होते, ते त्याला दिसत होते की नाही, याबद्दल मला खात्री नव्हती. तिजोरीचे दार नीट बंद केलेले नव्हते. मिलव्हेर्टनला कुठल्याही क्षणी ते दिसू शकले असते. त्याच्या थंड नजरेवरुन, मला माझ्या मनाशी खात्रीने असे वाटत होते की, त्याला ते दिसले आहे. मी कुठल्याही क्षणी, त्याच्यावर झडप घालून माझ्या कोटाने त्याचे डोके झाकीन, त्याला अडकवून ठेवीन आणि बाकीचे होम्सच्या हातात सोपविन, असा विचार करत होतो. पण मिलव्हेर्टनने वर पाहीलेच नाही. तो सावकाशीने त्याच्या हातातील कागदांच्या वाचनात दंग होता. वकीलाचा युक्तिवाद ऐकत, तो पानांवर पाने उलटत होता. शेवटी, मी विचार केला, त्याचे वाचून झाले व सिगारेट संपली की तो झोपायला जाईल. पण त्यातील एकही गोष्ट संपण्यापूर्वीच तिथे अशी एक गोष्ट घडली, की ज्यामुळे आमचे विचार दुसरीकडे वळले.

मिलव्हेर्टनला मी खूप वेळा घड्याळाकडे बघतांना पाहीले. एकदा तो अधीरपणे उठला व परत बसला. अशा अवेळी तो कुणाची वाट बघत असेल, तर ते विचित्र होते. व्हरांड्यातून एक हळू आवाज मला ऐकू आला. मिलव्हेर्टनने त्याच्या हातातील कागद बाजूला टाकले व त्याच्या खुर्चीत ताठ बसला. परत तो आवाज आला. आणि मग दारावर हलकी थाप पडली. मिलव्हेर्टन उठला व दार उघडले.

तो बोलला, "कर्टल, तुला अर्धा तास उशीर झाला.

हे दार कुलूपबंद नसल्याचे व मिलव्हेर्टन अवेळी जागा असल्याचे, स्पष्टीकरण होते. एका बाईच्या वस्त्रांची सळसळ झाली. मिलव्हेर्टनचे तोंड आमच्या दिशेने वळल्याने, मी पडदयामधील फट बंद केली. पण अगदी सावधपणे परत उघडली. तो त्याच्या जागेवर बसला.

अजूनही त्याच्या ओठात सिगारेट होती. त्याच्यासमोर दिव्याच्या झगमगत्या प्रकाशात, तोंड झाकलेली व बुरखा घेतलेली उंच, बारीक, काळसर बाई उभी होती. तिचा श्वासोच्छवास जोरजोरात चालू होता. तिच्या डौलदार शरीराचा इंचनइंच भावनातिरेकाने थरथरत होता.

मिलव्हेर्टन बोलला, "ठीक आहे. कर्टल, तू माझी रात्रीची झोप उडवलीस, मला वाटते तू त्याला न्याय देशील. तुला दुसऱ्या कुठल्या वेळी येता येत नव्हते का?

त्या बाईने मान हलवली.

"ठीक आहे. नाही तर नाही."

पण काय ग, तू इतकी का थरथरते आहेस? भानावर ये. आता आपण कामाचे बोलू. त्याच्या टेबलाच्या खणातून त्याने एक वही काढली. तू म्हणतेस की डी अल्बर्ट बाईसाहेबांची पाच पत्रे तुझ्याकडे आहेत. तुला ती विकायची आहेत. मला ती विकत घ्यायची आहेत. तर असे आहे. आता फक्त भाव ठरवायचा राहिला. अर्थात, मला ती पत्रे तपासावी लागतील. जर ती खरोखरच चांगले नमुने असतील, तर मग फारच छान!

त्या बाईने एकही शब्द न बोलता तोंडावरचे अवगुंठन काढले आणि बुरखाही काढला. एक काळसर, सुंदर, उघडा चेहरा मिलव्हेर्टनच्या वाकड्या नाकाच्या, गडद भुवयांकडे व रोखलेल्या चमकदार डोळ्यांकडे, सरळ पातळ ओठांकडे व धोकादायक हास्याकडे बघत होता.

ती बोलली, "जिचे आयुष्य तू उध्वस्त केलेस, तीच बाई मी आहे."

मिलव्हेर्टन हसला. पण त्याच्या आवाजातून भीती डोकावत होती. तो म्हणाला,

"तू इतकी हट्टी होतीस. तू मला इतक्या टोकाला का जायला लावलेस? मी तुला खात्रीने सांगतो, की मी माझ्या मर्जीने माशीलाही दुखवत नाही , पण प्रत्येकाला शेवटी त्याचा व्यवसाय आहेच. त्यामुळे मी काय करणार? मी तुझ्या मर्यादेत किंमत ठेवली होती. तू ती दिली नाहीस."

“म्हणून तू माझ्या नवऱ्याला ती पत्रे पाठवलीस? आणि तो सभ्य, उदार माणूस -- ज्याच्या बुटांचे बंद बांधायची देखील माझी लायकी नव्हती -- त्याचे हृदय शतशः विदीर्ण झाले व तो मेला. तुला ती शेवटची रात्र आठवत असेल, जेव्हा मी त्या दाराने आले व तुझ्याकडे दयेची भीक मागून, प्रार्थना केली. तू आता हसतो आहेस, तसाच माझ्या तोंडावर हसलास. फक्त तुझे भित्रे हृदय तुला हसण्यापासून परावृत्त करू शकत नव्हते. हो. मी इथे कधी येईन, असा विचारही तू केला नसशील. पण त्या रात्रीने मला तुला समोरासमोर एकटीने भेटायला शिकवले. तर मग चार्ल्स मिलव्हेर्टन, काय म्हणतोस?

खुर्चीतून उठत तो बोलला, “तू माझ्यावर वर्चस्व गाजवशील, असे समजू नकोस. मला आवाज चढवून माझ्या नोकरांना बोलवायचेच बाकी आहे, ते लगेच तुला पकडतील. पण तुझ्या नैसर्गिक रागाला मी माफ करतो. आलीस तशी चालती हो. अजून काही मी बोलत नाही.”

ती बाई तिच्या छातीवर हात ठेऊन, तिच्या पातळ ओठांवर क्रूर हास्य आणत तिथेच उभी राहीली.

“तू माझे आयुष्य नासवलेस, तसे अजून कोणाचे नासवणार नाहीस. तू माझे हृदय पिळवटलेस, तसे अजून कोणाचे पिळवटणार नाहीस. जगाला मी विषारी बनण्यापासून वाचवेन. अरे कुत्तरड्या, माझे शब्द लिहून ठेव -- लिहून ठेव -- लिहून ठेव.”

तिने चकाकणारे पिस्तुल बाहेर काढले आणि आणि गोळीमागून गोळी मिलव्हेर्टनच्या दोन पायांमधील शरीरावर, छातीवर मारत सुटली. तो भेलकांडून भयानक रित्या खोकत, टेबलावरील कागदांच्या पसाऱ्यात पडला. तो धडपडत त्याच्या पायांवर उभा राहीला, तोच दुसरी गोळी लागून जमिनीवर कोसळला. तो ओरडला, “तू मला ठार केलेस.” आणि निःचेष्ट पडला. त्या बाईने त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहीले आणि त्याच्या वर वळलेल्या चेहऱ्यावर, तिची टाच रोवली. तिने परत पाहीले. पण काही आवाज आला नाही, की हालचालही झाली नाही. मी गरम खोलीत रात्रीच्या हवेच्या झोताचा आवाज ऐकला. ती खुनी बाई निघून गेली.

आम्ही मध्ये पडलो असतो, तरी त्या माणसाला त्याचे नशीब वाचवू शकले नसते. पण ती बाई मिलव्हेर्टनच्या शरीरात गोळ्यांवर गोळ्या मारत सुटली, तेव्हा मी अगदी उडी मारणार होतो. पण मला होम्सचा थंड हात माझ्या मनगटावर पडलेला जाणवला. मला रोकणाऱ्या त्या घट्ट पकडीचा अर्थ मला समजला -- की हे आमचे काम नव्हते. त्या खलनायकाला न्याय दिला गेला. आम्हाला आमची उद्दीष्टे व कर्तव्ये होती. त्यापासून ढळून चालणार नव्हते. पण ती बाई खोलीबाहेर पडते न पडते, तोच होम्स हलक्या पाऊलांनी दुसऱ्या दाराशी गेला. त्याने किल्ली कुलुपात घातली. त्याच वेळी आम्हाला घरातून आवाज व पदरवदेखील ऐकू येऊ लागला.

पिस्तुलाच्या आवाजांनी घर जागे झाले. शांतपणे होम्स तिजोरीकडे गेला त्याचे दोन्ही हात भरून कागद घेतले व ते शेकोटीत टाकले. सर्व कागद संपेपर्यंत तो असे करत राहीला. बाहेरून कोणीतरी दरवाज्याची मूठ फिरवली. होम्सने लगबगीने चौफेर बघितले. मिलव्हेर्टनच्या मृत्युला आमंत्रण देणारे पत्र त्याच्या रक्ताने माखून टेबलावर पडले होते. होम्सने ते इतर पत्रांमधून उचलले. मग त्याने बाहेरील दाराची किल्ली काढली माझ्यामागून आला व ते दार बाहेरून बंद केले. तो म्हणाला, “इकडून ये, वॉटसन. आपण येथून बागेची भिंत चढून जाऊ.”

माझा विश्वास बसत नव्हता, की इतक्या लवकर बातमी पसरेल. मागे बघता प्रचंड घर म्हणजे पेटलेला आगडोंब दिसत होता. पुढचे दार उघडे होते. आणि तिथे गर्दी जमली होती. सबंध बाग माणसांनी भरून गेली होती. आम्ही गुपचूप व्हरांड्यात अवतीर्ण झालो तेव्हा एकाने आम्हाला हॅलो केले. होम्सला घराचा नकाशा पूर्णपणे माहिती होता. त्याने लहान झाडांमधून वाट काढली. मी चोरपावलांनी त्याच्या मागोमाग गेलो. आणि आमचा पाठलाग करणारा, आमच्या मागे धापा टाकत आला. आमच्या वाटेत सहा फूट उंच भिंत होती. पण तो त्यावरून उडी मारून गेला. मी पण तसेच केले. माझ्या मागील माणसाने माझा घोटा पकडला. पण मी लाथ मारून, सुटका करून घेतली. आणि गवतातून मार्ग काढला. मी झुडूपांमध्ये तोंडावर

पडलो. पण होम्सने क्षणार्धात मला माझ्या पायांवर उभे केले. आम्ही दोघे मिळून, हँपस्टेडच्या विस्तीर्ण माळरानावर धावून ते पार केले. मला वाटते, आम्ही दोन मैल पळालो असू. शेवटी होम्स थांबला व लक्षपूर्वक ऐकू लागला. आमच्या मागे सर्व शांत होते. आम्ही आमचा पाठलाग करणाऱ्याला चकवून सुरक्षित जागी आलो होतो.

आम्ही न्याहारी करून सिगरेट ओढत होतो. जेव्हा स्कॉटलंड यार्डचा, ज्याची छाप पडेल असा, गंभीर लेस्ट्रेड आमच्या खोलीत अवतरला, तेव्हा तो उल्लेखनीय प्रसंग मी नोंदवला होता.

तो म्हणाला, "शुभ सकाळ, मिस्टर होम्स. तुम्ही आता कामात आहात का?"

"तू बोल. इतका काही व्यग्र नाही."

"जर सध्या तुमच्याकडे काही काम नसेल, तर मला वाटले कदाचित आम्हाला, काल रात्रीच हँपस्टेडमध्ये घडलेल्या एका वेगळ्याच केसमध्ये मदत करायला, तुम्हाला आवडेल."

"ती केस काय होती?'

"एक खून – मोठा नाटकी आणि उल्लेखनीय खून. असल्या गोष्टींमध्ये तुम्हाला किती रस असतो, ते मला माहिती आहे. तुम्ही जर अपेलडोर टॉवर्समध्ये आलात व आम्हाला या केसबाबत, सल्ला दिलात तर चांगले होईल. आम्ही काही काळ या मिलव्हेर्टनवर नजर ठेऊन होतो. आणि आपल्या आपल्यात सांगतो, तो थोडा खलनायकी स्वरूपाचा मनुष्य होता. त्याच्याकडे तो ब्लॅकमेलींगसाठी वापरत असणारी कागदपत्रे असत. त्याचा खून करणाऱ्याने ती सर्व कागदपत्रे जाळून टाकली. काहीही मूल्यवान वस्तूंची चोरी झालेली नाही. खुनी हुशार असणार व अशी शक्यता आहे की त्यांचा हेतू असा असावा की त्या कागदपत्रांचा समाजात बोभाटा होण्यापासून रोकणे."

"एकापेक्षा जास्त गुन्हेगार होते का?"

“हो. दोघेजण होते. त्याना जवळजवळ पकडण्यात आले होते. आमच्याकडे त्याच्या पायाचे ठसे आहेत. त्यांचे वर्णनही आहे. आम्ही दहा ते एक त्यांचा पाठलाग केला. पहीला मनुष्य जास्त चपळ होता. दुसऱ्या माणसाला माळ्याच्या हाताखालच्या माणसाने पकडले व नंतर तो निसटला. तो मध्यम आकाराचा, चौकोनी जबड्याचा, जाड मानेचा, मिशाळ, डोळ्यांवर बुरखा असलेला व तब्येतीने बऱ्यापैकी असलेला मनुष्य होता.

शेरलॉक होम्स म्हणाला, “हे जरा स्पष्ट वाटत नाही. बापरे हे वॉटसनचे वर्णन असू शकेल!”

इन्स्पेक्टर मनोरंजन झाल्यासारखे म्हणाला, “ते खरे आहे. ते वॉटसनचे वर्णन असू शकेल.”

“लेस्ट्रेड, मला भीती वाटते, मी तुला मदत करू शकत नाही. त्याचे असे आहे, मला हा मिलव्हेर्टन माहिती आहे. तो लंडनमधील सर्वात धोकादायक मनुष्य आहे. आणि असे काही गुन्हे आहेत, की ज्यांना कायदा हातात घेऊ शकत नाही. आणि त्यामुळे ते काही प्रमाणात, खासगी सूड घेण्यास योग्य ठरतात. नाही. वाद घालून काही फायदा नाही. मी हे मनाशी ठरवले आहे. बळीपेक्षा माझी सहानुभूती गुन्हेगाराच्या बाजूने आहे. आणि मी या केसमध्ये काम करणार नाही.”

आम्ही जी दुःखद गोष्ट पाहीली, त्यासंबंधी होम्स एकही शब्द बोलला नाही. पण सकाळभर मी तो विचारमग्न असल्याचे पाहीले. त्याच्या रिकाम्या डोळ्यातून व हरवलेपणाच्या वागण्यातून त्याने मला असे भासवले, की तो काहीतरी आठवण्याचा आटापिटा करतो आहे. आम्ही दुपारचे जेवण घेत होतो. तेव्हा तो अचानक ताडकन उठला व ओरडला, “देवा रे, वॉटसन, मला ते सापडले. तुझी टोपी घेऊन माझ्याबरोबर ये. तो जोराने बेकर रस्त्यावर गेला. मग ऑक्सफर्ड रस्त्याने आम्ही रिजंट सर्कसला पोचलो. इथे डाव्या बाजूला प्रसिद्ध माणसांच्या फोटोंनी व सौदर्यवतींनी भरलेली दुकानाची एक शोकेस आहे. होम्स तिथे बघत राहीला. आणि

त्याच्या नजरेच्या अनुषंगाने मला राजघराण्यातील उच्चभ्रू बाईसाहेबांचा दरबारच्या पोषाखातील फोटो दिसला. तिच्या डोक्यावर हिरा बसवलेली पट्टी होती. मी त्या नाजूकपणे वळलेल्या नाकाकडे, कमानदार भुवयांकडे, सरळ तोंडाकडे व छोट्याशा ठाम ह्नुवटीकडे पाहीले. मी जेव्हा किताबासकट व सनावळीसकट त्या महान उमरावाचे नाव वाचले व ती त्याची बायको असल्याचे माझ्या लक्षात आले, तेव्हा माझा श्वास रोधला गेला. होम्सने व मी एकमेकांकडे पाहीले, तेव्हा त्याने त्याच्या ओठांवर बोट ठेवले. आम्ही तिथून लांब निघून गेलो.

## The Adventure Of The Creeping Man

## हळूच चालणाऱ्या माणसाचे साहस



शेरलॉक होम्सचे नेहमीच असे म्हणणे असे, की प्राध्यापक प्रेसबरी यांच्याशी निगडीत अशा विचित्र गोष्टी मी प्रसिद्ध कराव्यात. जेणेकरून वीस वर्षांपूर्वी विद्यापीठात पसरलेल्या व लंडनमधील सुशिक्षित लोकांमध्ये त्याची लागण झालेल्या, त्यांच्यासंबंधी उठलेल्या वाईटसाईट अफवा एकदाच्या नाहीशा होतील. पण त्यामध्ये काही अडथळे होते. त्यामुळे या वेधक केसची खरी हकीगत डब्यात पडून राहिली. त्यात माझ्या मित्राची अनेक साहसे दडलेली होती. शेवटी आम्हाला ती प्रसिद्ध करण्याची परवानगी मिळाली. होम्स निवृत्त होण्यापूर्वी त्याने हाताळलेल्या

काही केसेसपैकी ही एक होती. अजूनही काही खासगी माहिती हातची राखूनच लोकांपुढे ती गोष्ट आणायची होती.

१९०३ सालातील सप्टेंबरच्या सुरवातीच्या रविवारची ती संध्याकाळ होती. तेव्हा मला होम्सचा थोडक्यात लिहिलेला असा निरोप मिळालाः

‘सोयीस्कर असल्यास ताबडतोब येणे -- सोयीस्कर नसले तरीही येणे शे. हो.’

त्या नंतरच्या दिवसांमधील आमचे नाते विशेष प्रकारचे होते. तो लहानसहान व नेमक्या सवयींचा मनुष्य होता. आणि मी त्यापैकी एक होतो. एखाद्या संस्थेसारखा, मी व्हायोलीन, सुटी तंबाखू, जुना काळा पाईप, त्याचे माहितीचे बाड आणि इतर अजून काही माफ करण्याजोग्या गोष्टी, या सर्वांबरोबर होतो. जेव्हा खूप काम असे व ज्याच्यावर विश्वास टाकू शकू, अशा एका मित्राची गरज भासे, तेव्हा माझी भूमिका स्पष्ट होती. पण याशिवायही माझे उपयोग होते. मी त्याच्या मनाला धार लावणारा दगड होतो. मी त्याला चालना देत असे. माझ्यासमोर त्याला मोठ्याने विचार करायला आवडे. त्याचे बरेचसे ताशेरे मला उद्देशून असत असे नाही. ते त्याच्या पलंगाला उद्देशून देखील असू शकत होते. पण तरीही सवयीने काही प्रमाणात त्याला, माझी मदत होत असे. मी त्याच्या म्हणण्याची नोंद घेत असे किंवा त्यात अडथळाही आणत असे. जर माझ्या पद्धतशीर मानसिक मंदपणामुळे मी त्याला चिरडीला आणले, तर त्याचा उपयोग, त्याची ज्वाळेसारखी अंतःप्रेरणा व समज जास्त जोमाने व झटकन पेटून उठण्यासाठी होत असे. आमच्या साहचर्यामध्ये माझी भूमिका अशी होती.

मी जेव्हा बेकर रस्त्याला आलो, तेव्हा मी त्याला त्याच्या खुर्चीत गुडघे वर घेऊन खिळून बसलेले पाहिले. त्याच्या तोंडात पाईप होता व भुवया विचारमग्नतेत ताणल्या गेल्या होत्या. नक्कीच तो कुठल्यातरी त्रासिक समस्येत, पूर्णपणे बुडालेला होता. त्याने हात उंचावून माझ्या जुन्या खुर्चीकडे निर्देश केला. पण नंतर अर्धा तास मी तिथे असल्याची दखलही त्याने घेतली

नाही. त्यानंतर त्याने समाधीतून जागे झाल्यासारखे खेळकरपणे हसत, मला अभिवादन केले. तेव्हा मला परत घरच्यासारखे वाटले.

तो म्हणाला, “माझ्या प्रिय वॉटसन, मी जरा विचारात हरवलो होतो, त्याबद्दल तू मला माफ करशील. गेल्या चोवीस तासांत माझ्याकडे, काही चौकस गोष्टींनी हजेरी लावली. त्यामुळे मी काहीशा साधारण स्वरूपाच्या चिंतनात बुडालो होतो. गुप्तहेराला कुत्र्याचा उपयोग या विषयावर, मी एक पुस्तिका लिहायचा गंभीरपणे विचार करतो आहे.

मी म्हणालो, “होम्स, पण नक्कीच या विषयावर, आधीच लिहिले गेलेले आहे. तीक्ष्ण घ्राणेंन्द्रिय असलेला भला दांडगा कुत्रा -- शोधक कुत्रा –-”

“नाही. नाही. वॉटसन, त्यांच्याबद्दलची ती बाजू अर्थात अगदी उघड आहे. पण दुसरी एक वर्णन करायला अवघड अशी, नाजूक बाजू आहे. तुला आठवत असेल, की तू तुझ्या भावनामय पद्धतीने लिहिलेल्या कॉपर बीच गोष्टीवरून मी, स्वतःबद्दल खूप अभिमान असणाऱ्या माननीय वडिलांच्या गुन्हेगारी सवयी मुलांच्या दृष्टीकोनातून पाहू शकलो.”

“हो. मला ती गोष्ट चांगलीच आठवते.”

“माझे कुत्र्यांबद्दलचे विचार तुलना करण्यासारखे आहेत. कुत्रा कुटुंबाच्या जीवनावर प्रकाश टाकतो. उदास, घाबरट कुटुंबातील खेळकर कुत्रा किंवा आनंदी कुटुंबातील दुःखी कुत्रा कुणी पाहिला आहे का? भांडखोर लोकांचा कुत्रादेखील भांडखोर असतो. धोकादायक लोकांचा कुत्रा धोकादायक असतो. त्यांची बदलणारी मानसिक स्थिती, कुत्र्यांची मानसिक स्थिती देखील बदलते.”

मी मान हलवत म्हणालो, “होम्स, नक्कीच हे जरा ताणल्यासारखे वाटते आहे.”

त्याने त्याचा पाईप परत भरला आणि माझ्या शेऱ्याकडे लक्ष न देता त्याच्या जागेवर बसला.

मी ज्या समस्येचा तपास करतो आहे, त्याच्याशी याचे व्यावहारिक उपयोजन फार जवळचे आहे. तुला समजले का, की हा दोऱ्याचा सैलसर गुंता आहे. आणि मी त्याचे एक टोक शोधतो आहे. ते टोक या प्रश्नात येते, की प्राध्यापक प्रेसबरीला मोठा शिकारी कुत्रा का चावला?

मी माझ्या खुर्चीत थोड्या निराशेने मागे टेकून बसलो. तो इतका महत्वाचा प्रश्न होता का, की मी माझे काम सोडून धावत यावे? होम्सने माझ्याकडे एक कटाक्ष टाकला.

तो बोलला, "तोच जुना वॉटसन! तू हे कधीच शिकत नाहीस, की गंभीर गोष्टी लहानसहान गोष्टींवर अवलंबून असतात. तू प्राध्यापक प्रेसबरीबद्दल ऐकले असशील. ते एक शांत, वयस्क तत्वज्ञ व प्रसिद्ध वरिष्ठ शरीरशास्त्रज्ञ आहेत. अशा माणसाचा मित्र असलेल्या मोठ्या शिकारी कुत्र्याने त्याच्यावर दोनदा हल्ला करावा, हे विचित्र वाटत नाही का ? तू याबद्दल काय म्हणशील?"

"कुत्रा आजारी आहे."

"ठीक आहे. त्याची दखल घ्यावी लागेल. पण तो इतर कुणावरही हल्ला करत नाही. फक्त काही अगदी खास प्रसंग सोडून, सहसा त्याच्या मालकावरही हल्ला करत नाही. हे फार नवलपूर्ण आहे, वॉटसन -- फारच नवलपूर्ण! पण जर घंटी वाजत असेल, तर मिस्टर बेनेट ठरलेल्या वेळेपेक्षा लवकर आलेले दिसतात. ते येण्यापूर्वी, मला तुझ्याशी बरेच बोलायचे होते."

जिन्यावरून भरभर पायऱ्या चढल्याचा आवाज आला. दारावर जोरात थाप पडली व क्षणार्धात आमचा नवीन अशील आत आला. तो उंच, देखणा, नीटनेटके कपडे केलेला, डौलदार व साधारण तिशीचा तरुण होता. परंतु त्याच्याकडे बघून तो आजच्या जगात आत्मविश्वासाने वावरणारा मनुष्य न वाटता, लाजाळू तरुण वाटत होता. त्याने होम्सबरोबर हस्तांदोलन केले आणि मग आश्चर्याने माझ्याकडे पाहिले. तो म्हणाला, "मिस्टर होम्स, हे प्रकरण जरा नाजूक आहे प्राध्यापक प्रेसबरीबरोबरचे माझे खासगी आणि सामाजिक असे

दोन्ही संबंध लक्षात घेता, मी एखाद्या तिसऱ्या माणसासमोर, माझे म्हणणे नीट मांडू शकणार नाही.”

“मिस्टर बेनेट, काळजी करू नका. डॉ वॉटसन हा माझा अगदी जवळचा मित्र आहे. मला या प्रकरणात, त्याची मदत लागण्याची शक्यता आहे.”

“ठीक आहे, मिस्टर होम्स, मला खात्री आहे की मला हे प्रकरण गुप्त व खासगी ठेवायची इच्छा असल्याचे, तुम्ही समजू शकाल.”

वॉटसन, तुला हे ऐकून त्याची स्तुती करावीशी वाटेल की हा सभ्य गृहस्थ, मिस्टर ट्रेव्होर बेनेट हा त्या मान्यवर शास्त्रज्ञाचा व्यवसायिक सहाय्यक असून, त्यांच्याकडेच रहातो व त्यांच्या मुलीशी त्याचे लग्न ठरले आहे. आपण हे नक्कीच कबूल केले पाहिजे, की तो प्रामाणिक व तळमळीने काम करणारा असल्याबद्दल, प्राध्यापकांना पुरेसा विश्वास आहे. त्यामुळे आपण ही विचित्र केस सोडविणे, उचित ठरेल.”

“मिस्टर होम्स, मी पण तसेच समजतो. ते माझे एक उद्दिष्ट आहे. डॉ वॉटसन यांना परिस्थिती माहिती आहे का?”

“मला त्याला सर्व सांगायला, वेळ झाला नाही.”

“मग मी पुढची प्रगती सांगण्याअगोदर, पूर्वपीठीका सांगितलेली चांगले राहील.”

होम्स म्हणाला, “मला घटनाक्रम बरोबर लक्षात आहे, हे दाखवण्यासाठी, मीच तो सांगतो. वॉटसन, प्राध्यापक हा युरोपियन कीर्तीचा थोर मनुष्य आहे. त्याचे आयुष्य शैक्षणिक स्वरूपाचे आहे. त्याने कधीही काही प्रकरण केलेले नाही. तो विधुर असून, त्याला एक एडिथ नावाची मुलगी आहे. माझ्या समजुतीप्रमाणे तो मोठा कामाचा व धीराचा माणूस असून, सकारात्मक आहे. पण थोडा भांडखोर आहे. तर काही महिन्यांपूर्वीपर्यंत, असे होते. मग त्याच्या आयुष्याचा पट उधळला गेला. तो एकसष्ठ वर्षांचा आहे. पण त्याने तुलनात्मक शरीररचना या

विषयाच्या प्राध्यापक मॉर्फींच्या मुलीशी लग्न ठरवले आहे. मला समजल्याप्रमाणे, ते सारासार विचार करून प्रौढ माणसाने ठरवलेले नव्हे, तर तरुणाच्या अनावर वासनेने ठरवलेले लग्न आहे. तो एकनिष्ठ प्रेमिक असल्याचे, कुणालाच वाटत नव्हते. ती मुलगी, ॲलीस मॉर्फी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सुदृढ अशी मुलगी आहे. त्यामुळे प्राध्यापकाच्या खोलवर पण तात्पुरत्या स्वरूपाच्या वासनेला, काही क्षमा नव्हती. त्यावर कडी म्हणजे त्यांच्या कुटुंबालादेखील ते मान्य नव्हते."

आमचा पाहुणा म्हणाला, "आम्हाला हे जरा अतीच वाटले."

"बरोबर. अतिरेकी, थोड्या आक्रमक स्वरूपाचे व अनैसर्गिक. प्राध्यापक प्रेसबरी श्रीमंत होते. त्या मुलीच्या वडिलांची याला काही हरकत नव्हती. पण मुलीचा दृष्टीकोन वेगळा होता. जरी पैसा व मानमरातब या बाबतीत कमी असले, तरी तिच्याशी लग्न करायला अनेकजण इच्छुक होते आणि ते निदान तिच्या वयाला साजेसे होते. पण प्राध्यापकांच्या विक्षिप्तपणासकट ते तिला आवडत असत. फक्त वयाचाच प्रश्न येत होता.

अशा वेळी काहीसे गूढ, प्राध्यापकांच्या नेहमीच्या आयुष्यात अचानक येऊन ठेपले. त्यानी पूर्वी कधी न केलेले केले. त्यानी घर सोडले व कुठे जात आहे, हे काहीही सांगितले नाही. पंधरा दिवस ते घराबाहेर होते आणि फार दमूनभागून व अवतारात घरी परतले. एरवी ते मोकळेपणे बोलणारे असले तरी, ते कुठे गेले होते, याबद्दल त्यांनी अवाक्षरही उच्चारले नाही. पण आमच्या पाहुण्याला, मिस्टर बेनेट यांना प्रागहून एका विद्यार्थ्याचे पत्र आले. तो जरी त्यांच्याशी बोलू शकला नाही, तरी त्याला त्या तिथे प्राध्यापक प्रेसबरी दिसल्यामुळे आनंद झाला. तर अशा तऱ्हेने घरच्या लोकांना ते कुठे होते, ते कळले.

"आता इथे खरा मुद्दा सुरु होतो. तेव्हापासून प्राध्यापकांमध्ये विचित्र बदल झालेले आढळले. ते लाजाळू व हरवल्यासारखे झाले. त्यांच्या भोवतालच्या लोकांना असे वाटू लागले, की हे ते पूर्वीचे प्राध्यापक नाहीतच. तर त्यांचे सर्व गुण झाकणारी एखादी सावली त्यांच्यावर

पडली आहे. त्यांच्या बुद्धीमत्तेवर काही परिणाम झाला नाही. त्यांची व्याख्याने पूर्वीइतकीच चमकदार असत. पण सतत त्यांच्यात काही नवीन, काही त्रासदायक, पापी स्वरूपाचे व अनपेक्षित असे काही असल्याचे, वाटत राही. त्यांच्यावर प्रेम असलेली त्यांची मुलगी परत परत त्याच्याबरोबर पहिल्यासारखे संबंध प्रस्थापित करू पाही व वडीलांच्या तथाकथित बुरख्याच्या आत दडलेले त्यांचे मूळ रूप बघण्याचा प्रयत्न करे. मला वाटते सर, तुम्हीदेखील तसा प्रयत्न केलात -- पण सर्व प्रयत्न पाण्यात गेले. आणि आता, मिस्टर बेनेट, तुमच्या शब्दात पत्राचा प्रसंग सांगा."

"डॉ वॉटसन, तुम्ही हे समजून घेतले पाहिजे, की प्राध्यापक व मी, आमच्यात गुप्त असे काही नाही. मी त्यांच्या धाकट्या भावासारखा किंवा मुलासारखा आहे. मी त्यांचा विश्वास संपादन केलेला आहे. त्यांचा सचिव म्हणून त्यांच्याकडे येणारा प्रत्येक कागद मी हाताळलेला आहे. मीच सर्व पत्रे फोडतो व त्याची वर्गवारी लावतो. ते परतून आल्यानंतर लवकरच, हे सर्व बदलले. ते मला म्हणाले की त्यांना कदाचित लंडनहून काही पत्रे येतील. त्यावर पोस्टाच्या शिक्क्याखाली फुली मारलेली असेल. ती सर्व बाजूला ठेऊन, न फोडता त्यांच्या ताब्यात द्यावीत. मी सांगू इच्छितो, की अशी भरपूर पत्रे माझ्या हाताखालून गेली. त्यावर E C अशी खूण असे व ती अडाणी हस्ताक्षरात लिहिलेली असत. जर त्या पत्रांना ते उत्तर देत असतील, तर ती निदान माझ्या हाताखालून तरी गेली नाहीत किंवा पत्रपेटीतही पडली नाहीत."

"होम्स म्हणाला, "आणि पत्रपेटी."

"हो. हो. पत्रपेटी. प्राध्यापकांनी प्रवासाहून परत येतांना, एक लाकडी पेटी आणली होती. ती त्यांच्या प्रवासासंबंधी सांगणारी एक वस्तू होती. ती आकर्षकपणे वेगळी, जुनाट, कोरीव काम केलेली व जर्मनीशी काही नाते सांगणारी होती. ती काही किरकोळ उपकरणे असलेल्या कपाटात ते ठेवत. एक दिवस मी काही शोधतांना, ती पेटी काढली. मला आश्चर्यचकीत करत, ते फार रागावले. माझ्यावर ओरडतांना त्यांनी मला नवल वाटेल असे, खूप रानटी शब्द वापरले.

अशी गोष्ट पहिल्यांदाच झाली. मी फार नाराज झालो. मी त्यांना सांगायचा प्रयत्न केला, की केवळ अपघाताने मी त्या पेटीला हात लावला. पण संध्याकाळभर ते माझ्याकडे ती घटना सतत आठवून रागारागाने बघत होते. मिस्टर बेनेटनी त्यांच्या खिशातून एक डायरी काढली. त्यात बघून ते म्हणाले, “ती तारीख २ जुलै होती.”

होम्स म्हणाला, “तुम्ही निश्चितपणे स्तुत्य साक्षीदार आहात. तुम्ही लिहून ठेवलेल्या या तारखांची मला कदाचित गरज भासेल.”

“मी इतर अनेक गोष्टींबरोबर माझ्या गुरुंकडून काही पद्धती शिकलो. जेव्हापासून मी त्यांच्या स्वभावात काही वेगळेपणा पाहिला, तेव्हा मला वाटले की त्यांच्यावर लक्ष ठेवणे, माझे काम आहे. त्या २ जुलैच्याच दिवशी त्यांच्या अभ्यासिकेतून हॉलमध्ये आल्यावर, रॉय कुत्र्याने प्राध्यापकांवर हल्ला केला. परत ११ जुलैला तशाच प्रकारे हल्ला केला. त्यानंतर माझ्या नावे २० जुलैला एक चिठ्ठी आली. त्यानंतर आम्हाला रॉयला तबेल्यात कैद करावे लागले. तो त्यांचा आवडता, प्रेमळ प्राणी होता -- मला भीती वाटते,, की मी तुम्हाला कंटाळा आणतो आहे.”

मिस्टर बेनेट पश्चात्ताप झाल्यासारख्या आवाजात बोलत होते. कारण होम्स ऐकत नव्हता, हे अगदी स्पष्टपणे समजत होते. त्याचा चेहरा कठोर झाला होता व डोळे शून्यपणे आढ्याकडे बघत होते. मोठ्या प्रयत्नाने त्याने स्वतःला सावरले.

तो पुटपुटला, “विचित्र! फारच विचित्र! तुमचे हे सांगणे माझ्यासाठी नवीन आहे. मिस्टर बेनेट. मला वाटते आता आपण बऱ्यापैकी पूर्वपीठीका ऐकली आहे, नाही का? तुम्ही काही नवीन सांगायचे असेल, तर सांगा. आमच्या पाहुण्याचा आल्हादक, मोकळा चेहरा झाकोळला गेला. काही नकोशा गोष्टी आठवल्यामुळे, त्याच्यावर काळी सावली पसरली. तो म्हणाला, “शेवटच्या रात्रीच्या आधी हे घडले. मी रात्री दोन वाजता अंथरुणात जागाच होतो. तेव्हा मला पॅसेजमधून बारीकसा, तुटक आवाज येत असल्यासारखे वाटले. मी दार उघडून बाहेर डोकावून बघितले. मला हे सांगितले पाहिजे, की प्राध्यापक पॅसेजच्या टोकाला झोपतात --“

होम्सने विचारले, “काय तारीख होती?”

आमचा पाहुणा या नसत्या, मध्येच बोलण्याने, चिडलेला स्पष्टपणे दिसले.

“मी म्हणालो सर, शेवटच्या रात्रीच्या आधी, म्हणजे ४ सप्टेंबरला.’

होम्सने मान हलवली व हसला. ती म्हणाला, “कृपया, पुढे चालू ठेवा.”

“ते पॅसेजच्या टोकाला झोपतात आणि माझे दार ओलांडून त्याना जिन्याकडे जावे लागते. मिस्टर होम्स, तो खरोखरच घाबरवून टाकणारा अनुभव होता. मला वाटते, मी माझ्या शेजाऱ्यांइतकाच धीट आहे. पण मी जे पाहिले, त्यामुळे मी हादरून गेलो. पॅसेजमधील साधारण मध्यावर असणाऱ्या एका खिडकीतून येणारा थोडासा प्रकाश सोडला, तर तो पूर्णपणे अंधारी होता. पॅसेजमधून काहीतरी येत होते. काहीतरी काळे व हळू चालणारे. मग ते अचानक उजेडात आले. मी पाहिले की तो तो होता. तो हळूहळू चालत येत होता. मिस्टर होम्स, हळूहळू चालत! तो पूर्णपणे त्याच्या हातांवर व गुडघ्यांवर नव्हता. हातांवर व पायांवर असे म्हणणे बरोबर ठरेल. त्याचा चेहरा हातांमध्ये झाकलेला होता. तरी तो सहजतेने चालत होता. मी त्या दृष्याने इतका गर्भगळीत झालो, की तो माझ्या दाराजवळ पोचेपर्यंत, मी त्याला विचारू शकलो नाही की त्याला काही मदत हवी आहे का. त्याचे उत्तर काही वेगळेच होते. त्याने उडी मारली, काही दुष्ट, मला घाबरवणारे शब्द तोंडातून बाहेर काढले आणि मला ओलांडून पुढे गेला. जिना उतरला. मी तासभर थांबलो. पण तो परत आला नाही. दिवस उजाडल्यावर तो त्याच्या खोलीत होता. तो म्हणजे प्राध्यापक प्रेसबरी होते.”

खूप वेगळा असा नमुना बघणाऱ्या एखाद्या रोगनिदानतज्ञ्याप्रमाणे, होम्सने मला विचारले, “वॉटसन, याचे आता काय करायचे?”

“बहुधा, लुंबॅगो. क्रूर हल्ला करणारा माणूस अशा तऱ्हेने चालतो आणि याहून वेगळे त्याबाबतीत, काही म्हणता येणार नाही.”

“छान, वॉटसन! तू आम्हाला नेहमी आश्चर्यचकित करतोस. पण आपण लुंबॅगो बहुधा मान्य करू शकत नाही. कारण तो एका मिनिटात परत ताठ उभा राहू शकत होता.”

बॅनेट म्हणाला, “त्यांची तब्येत कधीच बरी नव्हती. खरे तर मी अनेक वर्षे त्यांना बळकट पाहिले होते. मिस्टर होम्स, पण आता हे असे होते. या केसमध्ये आपण पोलीसांचा सल्ला घेऊ शकत नाही. तरीही आपण काय करावे, याबद्दल आपली बुद्धीही चालवू शकत नाही. विचित्रपणे असे वाटत रहाते, की आपण काही मोठ्या संकटाच्या दिशेने चाललो आहोत. एडिथ, मिस प्रेसबरी -- तिलाही माझ्याप्रमाणेच वाटते, की आपण काहीही न करता, निश्चलपणे आता राहू शकत नाही.”

“ही नक्कीच मोठी नवलपूर्ण व काही सुचवणारी केस आहे. वॉटसन, तुला काय वाटते?”

मी म्हणालो, “वैद्यकशास्त्रतज्ञ म्हणून पहाता, ही मनोरुग्ण असल्याची केस वाटते. त्या म्हाताऱ्या माणसाच्या मेंदूतील घडामोडी प्रेमप्रकरणामुळे बिघडल्या आहेत. त्याने पंधरा दिवस प्रवास करून, आपली प्रेमवासना जिंकण्याचा प्रयत्न केला त्याची पेटी व पत्रे इतर काही खासगी बाबींशी निगडीत असू शकतील -- कदाचित पेटीत कर्ज किंवा शेअर सर्टिफिकीटे, यांसंबंधीची कागदपत्रे असतील.”

आणि कुत्र्याने केलेला हल्ला, संशयातीतपणे पैशांसंबंधी नसावा. नाही. नाही. वॉटसन, यात अजून काहीतरी असणार. आता मी एवढेच सुचवू शकतो --“

शेरलॉक होम्स जे काही सुचवणार होता, ते कधीच कळणार नाही, कारण त्याच क्षणी दार उघडून एक तरूण स्त्री आत खोलीत आली. ती आल्याबरोबर, तिने पसरलेले हात पकडण्यासाठी मिस्टर बेनेट उडी मारून, हात पसरून किंचाळत, पुढे धावले.

“एडिथ, प्रिये! मला अशी आशा आहे की काही झालेले नाही.”

“मला वाटले, मला ताबडतोब तुझ्याकडे यायला पाहिजे ओहो, जॅक, मी इतकी घाबरले आहे! तिथे एकटीने रहाणे भीतीदायक आहे.”

“मिस्टर होम्स, मी म्हणालो ती, ही तरुणी, माझी प्रेयसी आहे.”

होम्स उत्तरादाखल हसून बोलला, “वॉटसन, आपण हळूहळू त्या निर्णयाकडे येतच होतो, नाही का? मिस प्रेसबरी, मला वाटते या प्रकरणात काही नवीन घडले आहे व ते तुम्ही आम्हाला सांगणार का?”

तेजस्वी, सुंदर अशी पारंपारिक इंग्लिश घराण्यातील दिसणारी, आमची नवीन पाहुणी होम्सकडे बघून हसली व मिस्टर बेनेटशेजारी बसली. ती बोलली, “जेव्हा मला समजले, की मिस्टर बेनेटनी त्यांचे हॉटेल सोडले आहे, तेव्हा मला वाटले की मला ते बहुधा इथे सापडतील. अर्थात त्याने मला तुमचा सल्ला घेणार असल्याचे सांगितले होते. पण मिस्टर होम्स, तुम्ही माझ्या वडिलांसाठी काही करू शकाल का?”

“मला आशा आहे मिस प्रेसबरी. पण ही केस अजून धूसर भासते आहे. कदाचित तुमच्या सांगण्यानंतर, यावर जास्त प्रकाश पडू शकेल.”

“मिस्टर होम्स, काल रात्रीची गोष्ट आहे. माझे वडील दिवसभर फार विचित्र वागत होते. मला वाटते कधी कधी त्यांना, आपण काय करत आहोत, त्याचे भान रहात नाही. ते स्वप्नात असल्यासारखे वावरतात. कालचा दिवस तसा होता. मी ज्यांच्याबरोबर रहाते ते माझे वडील ते नव्हतेच. त्याचे बाह्यरुप तसेच आहे. पण ते ते नाही आहेत.”

“काय झाले ते सांगा.”

“मला रात्री कुत्र्याच्या जोरात ओरडण्याने जाग आली. बिचाऱ्या रॉयला आता तबेल्यात बांधले आहे. मी असे म्हणू शकते, की मी नेहमी दार कुलुपबंद करून झोपते. जॅक -- मिस्टर बेनेट -- तुम्हाला सांगेल की आम्हा सर्वांना, पुढे काहीतरी नको असे होण्याच्या भीतीने ग्रासलेले

आहे. माझी खोली दुसऱ्या मजल्यावर आहे. असे झाले, की माझ्या खोलीच्या खिडकीचा पडदा वर केलेला राहिला. बाहेर चांगला चंद्रप्रकाश पडला होता. मी माझे डोळे प्रकाशित खिडकीच्या चौकोनावर रोखून अंथरुणावर पडले होते. मला बेभानपणे भुंकणाऱ्या कुत्र्याचा आवाज येत होता. माझ्याकडे बघणारा, माझ्या वडिलांचा चेहरा बघून, मी आश्चर्यचकित झाले. मिस्टर होम्स, मी दचकून भीतीने जवळजवळ मरायला टेकले. तो खिडकीच्या काचेवर दाबला गेला होता. आणि एक हात जणू खिडकी वर करण्यासाठी उचललेला होता. जर ती खिडकी उघडी असती, तर मला वाटते, मी वेडी झाले असते. मिस्टर होम्स, तो वेडा भास नव्हता. तसे समजून तुम्ही स्वतःला फसवू नका. मी सांगू शकते की ते वीस सेकंद, मी खिळल्यासारखी होऊन तो चेहरा बघत राहिले होते. मग तो नाहीसा झाला. पण मी अंथरुणातून उठून बाहेर बघू शकत नव्हते. मी रात्रभर गार पडून, थरथरत राहिले. सकाळी न्याहारीच्या वेळी देखील माझे वडील तीक्ष्णपणे भीतीदायक होते. रात्रीच्या प्रकाराबद्दल ते काही बोलले नाहीत. मीही बोलले नाही. पण मी काहीतरी कारण सांगून सटकले व इथे आले.’

मिस प्रेसबरीचे कथन ऐकून होम्स फार आश्चर्यचकित झाला.

“मिस प्रेसबरी, तुम्ही म्हणता की तुमची खोली दुसऱ्या मजल्यावर आहे. बागेत एखादी उंच शिडी आहे का?”

“नाही, मिस्टर होम्स. तोच तर यातील चक्रावून टाकणारा भाग आहे. बागेतून खिडकीशी पोचायचा कुठलाही मार्ग नाही -- आणि तरीही ते तिथे होते.

होम्स म्हणाला. “ती तारीख ५ सप्टेंबर असल्यामुळे ही गोष्ट अजूनच गुंतागुंतीची होत चालली आहे.”

आता नवल वाटण्याची पाळी त्या तरुण स्त्रीची होती. बेनेट म्हणाला, “मिस्टर होम्स, तुम्ही तारखेकडे लक्ष वेधण्याची ही दुसरी वेळ आहे. तारखेचा या केसशी काही संबंध आहे का?”

“असे शक्य आहे -- अगदी शक्य आहे. पण तरीही, मी आता काही सांगू शकत नाही.”

“मला वाटते, तुम्ही चंद्राचा आकार व वेडेपणा, यातील संबंधाचा विचार करत आहात का?”

“नाही. खात्रीने नाही. माझा विचार अगदी वेगळ्या पद्धतीने चालला होता. शक्य असेल, तर तुमची डायरी तुम्ही इथे ठेवून जा. आणि मी तारखांची परत एकदा खात्री करतो. वॉटसन, मला वाटते, आपली कार्यपद्धत निश्चित झालेली आहे. या तरुण स्त्रीने आपल्याला सांगितले आहे -- आणि तिच्या अंतःप्रेरणेवर माझा विश्वास आहे -- ती म्हणाली की तिच्या वडिलांना कधी कधी थोडे आठवते तर कधी काहीच आठवत नाही. हे ठराविक तारखांना होते. त्यांनी आपल्याला भेटायला बोलावल्यासारखे, आपण त्यांना भेटायला जाऊ. त्यांच्या विसरण्यामुळे, ते आपल्याला बोलावल्याचे विसरले, असे समजतील. तर आपण आपल्या मोहिमेची सुरवात त्यांना जवळून बघण्यापासून करू.”

मिस्टर बेनेट म्हणाले, “हे छान राहील. पण मी तुम्हाला ताकीद देतो, की प्राध्यापक वेळोवेळी चिडून आक्रमक होऊ शकतात.”

होम्स हसला. जर माझ्या उपपत्ती बरोबर असतील, तर असे अचानक भेटायला जाण्याचे, खूप तर्कनिष्ठ असे कारण आहे. मिस्टर बेनेट, उद्या आम्ही नक्की ऑक्सफर्डला येतो. मला बरोबर आठवत असेल, तर तिथे एक चेकर्स नावाचे मध्यम प्रतीचे हॉटेल आहे आणि तेथील गालीचा बऱ्यापैकी दर्जाचा आहे. वॉटसन, मला वाटते, पुढचे काही दिवस आपण कमी आरामशीर जागेत असू.”

सोमवारी सकाळी आम्ही त्या प्रसिद्ध विद्यापीठाच्या गावात होतो -- होम्सच्या दृष्टीने हा सोपा प्रयत्न होता.

आजच्या घडीला माझी डॉक्टरकी विशेष जोरात चालू नव्हती. त्यामुळे माझ्या दृष्टीने हे खूप घाईचे व काळजीपूर्वक आखायचे काम होते. तो बोललेल्या ठिकाणी आम्ही आमच्या बॅगा टाकेपर्यंत त्याने केससंबंधी काही विचार केला नाही.

“मला वाटते, वॉटसन, आपण दुपारच्या जेवणापूर्वी प्राध्यापकांना गाठू. त्यांचे व्याख्यान अकरा वाजता असते व दुपारी ते, आपल्याला घरी भेटतील.”

“काय कारण काढून, आपण त्यांना भेटायचे?”

होम्सने त्याच्या वहीकडे नजर टाकली.

“२६ ऑगस्टला खूप उत्सुकता वाढवणारा काळ आहे. आपण असे गृहीत धरु की अशा वेळी तो स्वतः काय करतो आहे, याबद्दल तो थोडासा संदिग्ध असेल. जर आपण त्याला सांगितले की आपली वेळ ठरलेली होती, व त्याप्रमाणे आम्ही आलो आहोत, तर तो आपल्याला प्रतिप्रश्न करू धजणार नाही. तुला असा बेत करायचे धैर्य आहे का?”

“आपण प्रयत्न करू शकतो.”

“छान, वॉटसन! व्यग्रता आणि उत्तमपणा यांचे मिश्रण. आपण प्रयत्न करून बघू -- आपले तसे ब्रीद आहे. येथील कोणी मित्र आपल्याला मदत करेल.”

एका टुमदार टांग्यातून आम्ही जुनी महाविद्यालये मागे टाकून, ओळीने झाडे असलेल्या रस्त्याला लागलो. शेवटी चारी बाजूंना हिरवळ असलेल्या व जांभळया वेलींनी वेढलेल्या, एका मस्त घराच्या दारासमोर जाऊन उभे राहिलो. प्राध्यापक प्रेसबरी नक्कीच फक्त आरामशीर नव्हे, तर चैनबाज घरात रहात असल्याची, चिन्हे दिसत होती. आम्ही घंटी वाजवल्यावर, पुढील खिडकीशी एक करड्या केसांचे डोके दिसू लागले. दाट भुवयांखालील भेदक डोळे आम्ही पाहिले. ते काचेआडून आमचे निरीक्षण करत होते. क्षणार्धात आम्ही त्याच्या पवित्र घरात होतो. त्याच्या अतर्क्य वागणुकीने आम्हाला लंडनपासून इथे आणलेला गूढ शास्त्रज्ञ, आमच्यासमोर

उभा होता. त्यांच्या वागणुकीत किंवा दिसण्यात काहीही विचित्र वाटत नव्हते. कारण प्राध्यापकाला शोभेशी बळकट, थंड, उंच, कोट घातलेली व मोठे नाक डोळे असलेली, अशी ती रुबाबदार व्यक्ती होती. भेदक, उत्तम निरीक्षण करणारे आणि हुशार पण लबाडीची झाक असणारे, असे त्याचे डोळे उल्लेखनीय होते.

त्यानी आमची कार्डे पाहिली. “बसा, सभ्य गृहस्थहो. मी तुमच्यासाठी काय करू शकतो?”

होम्स मित्रत्वाने आल्हादकपणे हसला.

“हेच मी तुम्हाला विचारणार होतो. प्राध्यापकमहाशय.”

मला, सर?”

“बहुधा काही चूक झाली असावी. मी असे ऐकले की ऑक्सफर्डच्या प्राध्यापकांना माझ्या सेवेची गरज आहे.”

त्यांच्या करड्या डोळ्यात, मला खुनशी चमक दिसली. ते उद्गारले, “ओहो, खरे की काय! तुम्ही असे ऐकले, नाही का? ही माहिती तुम्हाला देणाऱ्याचे नाव मी विचारू शकतो का?”

“मला माफ करा, प्राध्यापकमहाशय. पण ही गोष्ट गोपनीय होती. मी काही चूक केली असेल, तर त्यात काही त्रास नाही. मी माझी खंत प्रकट करतो.”

“तसे नाही. मला याबद्दल अजून बोलायला आवडेल. मला याबद्दल औत्सुक्य आहे. तुमचे म्हणणे सिद्ध करायला तुमच्याकडे, काही लिखित पत्र किंवा तार आहे का?”

“नाही. माझ्याकडे नाही.”

“मला वाटते, मी तुमच्याकडे पुरावा मागितला, त्याचे तुम्ही फार काही वाटून घेणार नाही.”

“होम्स म्हणाला, “मी याचे उत्तर देणार नाही.”

कडक शब्दात प्राध्यापक महाशय बोलले, “तरीपण मी त्याचे उत्तर तुमच्या मदतीशिवाय मी फार सहजपणे देऊ शकतो.”

ते खोलीतून फोनसाठी चालत गेले. आमचा लंडनचा मित्र मिस्टर बेनेट यांनी फोनवर उत्तर दिले.

“आत या, मिस्टर बेनेट. हे दोन सभ्य गृहस्थ लंडनहून आले आहेत. त्यांचा असा समज आहे, की त्यांना इथे बोलावले गेले आहे. तुम्ही माझा सर्व पत्रव्यवहार बघता. होम्स नावाच्या माणसाला, आपल्याकडून काही पत्र गेले होते का?”

चेहऱ्यावर लाल रंग आलेले मिस्टर बेनेट बोलले, “नाही, सर.”

माझ्या मित्राकडे रागाने बघत प्राध्यापक बोलले, “तर मग याची तड लागली. सर, आता तुमचे इथे येणे प्रश्नचिन्हांकित झाले आहे.” होम्सने त्याचे खांदे उडवले.

“आम्ही मध्येच आगंतुकपणे आल्याबद्दल माफी मागतो.”

वयस्क माणूस तारस्वरात किंचाळत व चेहऱ्यावर असामान्य वाईट भाव आणत म्हणाला. “पुरे. पुरे. मिस्टर होम्स.” बोलतांना तो आमच्या व दाराच्या मध्ये जाऊन उभा राहिला व आमच्या दिशेने त्याचे दोन्ही हात रागारागाने उचलून बोलला, “तुम्ही इथून सहज बाहेर पडू शकत नाही.” त्यांचा चेहऱ्याचे स्नायू आवळले गेले व ते निष्कारण रागावून मोठ्याने हसले. आम्ही समजून चुकलो की मिस्टर बेनेट मध्ये पडले नसते, तर आम्हाला भांडूनच खोलीतून बाहेर पडावे लागले असते.

बेनेट ओरडला, “प्राध्यापक महाशय, तुमच्या विद्यापीठातील लौकीकाचा व येथील प्रकरणाचा तरी विचार करा. मिस्टर होम्स एक प्रसिद्ध माणूस आहेत. तुम्ही त्याना असे अपमानकारक वागवू शकत नाही.”

पश्चात्तापदग्ध असा आमचा यजमान -- जर मी त्याला तसे म्हणू शकत असेन तर -- त्याने आमची वाट सोडली. घराबाहेर पडून व शांत झाडांच्या रांगेतील रस्त्याला लागून, आम्हाला बरे वाटले. या घटनेने होम्सचे पुरेपूर मनोरंजन झाले.

तो म्हणाला, “आपल्या विद्वान मित्राच्या नसा कहीतरी चमत्कारिक आहेत. कदाचित आपले तेथे घुसणे, थोडे जादापणाचे होते. आणि तरीही मला हवी असलेली व्यक्तिगत जवळीक मला मिळाली. प्रिय वॉटसन, पण तो नक्कीच आपल्या मागावर आहे व आपला पाठलाग करतो आहे.”

आमच्यामागून पदरव येत होता. पण तो मान्यवर प्राध्यापकांचा नसून, त्यांच्या सचिवाचा होता. तो वळण ओलांडून धापा टाकत आमच्याजवळ आला.

“मिस्टर होम्स, मी दिलगीर आहे. मी माफी मागतो.”

“प्रिय सर, त्याची काही जरुरी नाही. हा एक व्यावसायिक अनुभव आम्हाला मिळाला.”

“मी त्यांना इतक्या धोकादायक मनस्थितीत कधीच पाहिले नव्हते. पण ते याहून अधिक बेफाम होऊ शकतात. आता तुम्हाला समजले असेल, की त्यांची मुलगी व मी इतके हवालदिल का झालो आहोत? तरीही त्यांचे मन पूर्णपणे शुद्ध आहे.”

होम्स म्हणाला, “फारच शुद्ध! तो माझा गैरसमज होता. मला वाटले होते, त्यापेक्षा त्यांची स्मरणशक्ती चांगली आहे. तसेही, आम्ही जाण्यापूर्वी, मिस प्रेसबरीची खिडकी बघू शकतो का?

मिस्टर बेनेटनी काही झुडूपांमधून रस्ता काढला आणि आम्हाला ते घर बाजूने दिसू लागले.

"ती बघा, डावीकडून दुसरी."

"पण ती तर, ते तिथे पोचण्यासारखी वाटत नाही. तरीही तुम्हाला तिथे एक झाड व वर पाण्याचा पाईप दिसेल. त्यावर चढून जाता येईल."

मिस्टर बेनेट म्हणाले, "मी तर काही असे चढून, जाऊ शकत नाही."

"कुठल्याही साध्यासुध्या माणसासाठी हे नक्कीच धोकादायक असले, तरी पण चढून जाणे शक्य आहे. ."

"मिस्टर होम्स, मला तुम्हाला अजून एक गोष्ट सांगायची आहे. माझ्याकडे ज्याला प्राध्यापक लिहितात, अशा लंडनमधील एका माणसाचा पत्ता आहे. आज सकाळी त्यांनी लिहिले आहे आणि मला हे नाव त्यांच्या टीपकागदावरून मिळाले. एका विश्वासू सचिवासाठी, हे काही मोठे भूषणावह कृत्य नाही. पण मी दुसरे काय करू शकतो?"

होम्सने त्या कागदावर एक नजर टाकली व तो त्याच्या खिशात ठेऊन दिला.

"डोराक -- एक चौकस नाव. गुलामांच्या काळातले नाव वाटते. पण हा साखळीतील महत्वाचा दुवा आहे. मिस्टर बेनेट, आता आम्ही इथे राहून विशेष काही फायदा होईल, असे वाटत नाही. आम्ही प्राध्यापकांना अटक करू शकत नाही. कारण त्यांनी काही गुन्हा केलेला नाही. आम्ही त्यांना नजरकैदेत देखील ठेऊ शकत नाही. कारण ते वेडे असल्याचे सिद्ध करता येत नाही. अजून तरी त्यांच्याविरुद्ध काही कारवाई करता येणार नाही."

"मग आम्ही करू तरी काय?"

“मिस्टर बेनेट, थोडा धीर धरा. लवकरच गोष्टी मार्गी लागतील. मी चुकत नसेन, तर पुढच्या मंगळवारी त्रासदायक, धोकादायक असे काही घडू शकेल. त्या दिवशी आम्ही नक्की इथे असू. मध्यंतरीच्या काळात, येथील परिस्थिती फारशी बरी असणार नाही आणि जर मिस प्रेसबरी तिची भेट लांबवू शकली तर बरे.”

ते सोपे आहे.”

“मग सर्व संकट संपले असल्याची ग्वाही आमच्याकडून तिला मिळेपर्यंत, तिला तिथे राहू दे. प्राध्यापकांना काय हवे ते करू दे. त्यांना प्रतिप्रश्न करू नका. जोपर्यंत ते चांगल्या अवस्थेत आहेत, तोपर्यंत सर्व काही ठीक आहे.”

एकदम चमकून कुजबुजत्या आवाजात बेनेट बोलला, “ते बघा, ते तिकडे आहेत.”

फांद्यांमधून आम्ही हॉलच्या दारातून येणारी उंच सरळसोट आकृती पाहिली. ते इकडेतिकडे बघत होते. ते पुढे झुकून उभे राहिले. त्याचे हात हलत होते. त्यांची मान इकडून तिकडे हलत होती. सचिव झाडांच्या गर्दीत नाहीसा झाला आणि आम्ही त्याला त्याच्या प्राध्यापकांना भेटताना व सजगपणे काही उत्सुकतेने बोलत बोलत एकत्रितपणे घरात शिरतांना आम्ही पाहिले.

आम्ही हॉटेलच्या दिशेने चालतांना होम्स म्हणाला, “तो वयस्क माणूस आपल्याबद्दल काही अंदाज करत बसला असावा. मी त्याला जे काही थोडेफ़ार बघितले, त्यावरून मला वाटते, की त्याच्याकडे विशेष असा सुस्पष्ट व तर्कशुद्ध मेंदू आहे. तो चिडका आहे, यात काही शंका नाही. पण त्याच्या दृष्टीकोनातून पाहिले, तर त्याच्या मागे गुप्तहेर लाऊन दिल्यास, तो चिडणारच. त्यातून त्याच्या घरच्यानीच हा उद्योग केला असेल, तर मग बघायलाच नको. माझ्या तर्काप्रमाणे बेनेट या घरात, अस्वस्थ वेळी आला आहे.”

होम्स वाटेत पोस्टाच्या कार्यालयाशी थांबला व त्याने एक तार पाठवली. त्या संध्याकाळी आम्हाला त्याचे उत्तर मिळाले. त्याने ते माझ्याकडे फेकले.

बाजाराच्या रस्त्यावर आम्ही डोराकला भेटलो. तो छान, आत्मविश्वासपूर्ण माणूस वाटला. तो बोहेमियन असून वयाने मोठा होता. तो मर्सर नावाचे सामान्य वस्तूंचे मोठे दुकान चालवत असे.

होम्स म्हणाला, "मर्सर हे दुकान खूप जुने आहे. तो नेहमीच्या उद्योगाकडे बघणारा, माझ्या साधारण उपयोगी पडेल, असा माणूस आहे. ज्याच्याशी प्राध्यापक एवढ्या गुप्तपणे काही व्यवहार करत होता, असा माणूस आहे. त्या माणसाबद्दल आपल्याला माहिती असणे, महत्वाचे आहे. प्रागच्या भेटीशी त्याच्या राष्ट्रीयत्वाचा संबंध येतो."

मी म्हणालो, "बरे झाले की कशाचा तरी संबंध कशाशी तरी जुळतो आहे. सध्या आपण एकामागून एक ज्यांचा एकमेकाशी काही संबंध नाही, अशा स्पष्ट करता न येणाऱ्या घटनांना, तोंड देतो आहोत. उदाहरणार्थ, बोहेमियाला भेट देणे व रागावलेला शिकारी कुत्रा, यांच्यात काय संबंध आहे? पॅसेजमधून रात्री हळूच चालणाऱ्या माणसाचा या दोन्ही गोष्टींशी काय संबंध आहे? किंवा सर्वात मोठ्या गोंधळाचा भाग म्हणजे तुझ्या त्या तारखा, त्या तर सर्वात गूढ वाटतात."

होम्सने हसून, त्याचे हात चोळले. मी असे म्हणू शकतो, की होम्स ज्याबद्दल म्हणाला होता, ती प्रसिद्ध वाईनची बाटली आमच्यामध्ये ठेऊन, एका प्राचीन हॉटेलच्या जुन्या खोलीत आम्ही बसलो होतो.

त्याची बोटे जुळलेली होती. एखाद्या वर्गात शिकवणाऱ्या शिक्षकाच्या थाटात तो म्हणाला, "ठीक आहे. प्रथम तारखा विचारात घेऊ. या हुशार तरुण मनुष्याची डायरी असे दाखवते, की २ जुलैला काही त्रास झाला. आणि तिथपासून पुढे नऊ दिवसाच्या अंतराने हे होत गेले. मला

आठवते आहे त्याप्रमाणे, फक्त एकदाच असे झाले नाही. शेवटचे वेडेपणाचे कृत्य ३ सप्टेंबरला झाले. तेदेखील याच ओळीत बसते. तसेच त्याच्या आधीचे २६ ऑगस्टचे. ही गोष्ट काही योगायोगाने झालेली नाही."

मला कबूल करावेच लागले.

"तर मग आता आपण तात्पुरती उपपत्ती तयार करुया, की प्रत्येक नवव्या दिवशी प्राध्यापक, काही तात्पुरता विषारी परिणाम होणारा कडक ड्रग घेत असावा. त्याचा निसर्गदत्त आक्रमक स्वभाव त्यामुळे वाढत असावा. तो प्रागमध्ये असतांना हा ड्रग घ्यायला शिकला आणि आता तो त्याला पुरवण्याचे काम लंडनमधील तो बोहेमियन माणूस करत असावा. वॉटसन, हे सर्व जुळल्यासारखे वाटते आहे."

"पण कुत्रा, खिडकीतील चेहरा व पॅसेजमधून रात्री हळूच चालणारा माणूस, यांचे काय?"

"ठीक आहे. ठीक आहे. आता कुठे आपण सुरवात केली आहे. मला पुढच्या मंगळवारपर्यंत काही नवीन घडणे अपेक्षित नाही. मधल्या वेळात आपण आपला मित्र बेनेट याच्याशी संपर्कात राहू शकतो व तोपर्यंत या शहरातील सुखसोयीचा उपभोग घेऊ शकतो.

सकाळी मिस्टर बेनेट आम्हाला ताजा अहवाल देण्यासाठी आले. होम्सच्या अटकळीप्रमाणे, त्याच्या बाबतीत वेळ काही बरोबर नव्हती. आमच्या तेथील उपस्थितीबद्दल पत्यक्ष त्याला दोष न देता, प्राध्यापक त्यांच्या बोलण्यात फार उद्धट व शिव्याशाप देणारे झाले होते. मधूनमधून त्यांना आपण वाईट वागून चूक केल्याचे जाणवे. आज सकाळी ते स्वतःमध्येच गुंग होते. त्यांनी गर्दीच्या वर्गात त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने चमकदार व्याख्यान दिले. बेनेट म्हणाला, "मला आठवते त्याप्रमाणे, त्यांच्या नेहमीच्या विचित्र वागण्यापेक्षा, त्याच्याकडे जास्त उत्साह आणि जोम होता. त्यांचा मेंदूदेखील पूर्णपणे कार्यक्षम होता. पण ते ते नव्हते -- आम्हाला माहिती असलेला माणूस तो नव्हता."

होम्स उत्तरला, “मला वाटते, तुम्हाला निदान आठवडाभर तरी घाबरायचे काही कारण नाही. मी एक व्यग्र मनुष्य आहे आणि डॉ वॉटसनला त्याच्या रुग्णांकडे बघायचे आहे. आपण असे ठरवू, की पुढच्या मंगळवारी यावेळेस आपण इथेच भेटू. आम्ही जाण्यापूर्वी तुम्हाला परत यावे लागले तर मला नवल वाटेल. आता आम्ही काही स्पष्टीकरण देऊ शकत नाही व तुमचा त्रास कधी संपेल, हे देखील सांगू शकत नाही. मध्यंतरीच्या काळात काही झाले, तर आम्हाला कळवत रहा,”

पुढचे काही दिवस मी माझ्या मित्राला काही करतांना पाहिले नाही. पण सोमवारी संध्याकाळी मला एक लहानशी चिठ्ठी मिळाली. त्यात असे लिहिले होते की मी त्याला दुसऱ्या दिवशी गाडीवर भेटावे. ऑक्सफर्डला जाईपर्यंत, तिथे सर्व काही ठीक होते. प्राध्यापकांचे घर शांत होते. त्यांची स्वतःची वागणूक अगदी नेहमीसारखी सामान्य होती. चेकर्स हॉटेलात आम्हाला त्या संध्याकाळी बेनेटने दिलेला अहवालही ठीक होता. “त्यांना आज त्यांच्या लंडनच्या माणसाकडून काही कळले. एक लहानसे पाकीट व एक पत्र आले होते. त्याच्या शिक्क्याखाली फुली होती. त्यामुळे मी त्याला हात लावला नाही. अजून काही नाही.”

होम्स गंभीरपणे म्हणाला, “मिस्टर बेनेट, आता मला वाटते, आपण आज रात्री काही अनुमान काढू शकू. जर माझा तर्क बरोबर असेल, तर आपल्याला काय चालले आहे, याचा काही बोध होईल. असे होण्यासाठी प्राध्यापकांना निरीक्षणाखाली ठेवावे लागेल. मी असे सुचवेन, की त्यासाठी तुम्ही जागे रहा आणि निरीक्षण करत रहा. जर तुमच्या दारावरून त्यांना जातांना पहिले, तर त्याना काही अडथळा करू नका. पण गुपचूप त्यांचा पाठलाग करा. मी व डॉ वॉटसन तुमच्यापासून फार लांब नसू. तुम्ही ज्याबद्दल पूर्वी बोललात, त्या त्यांच्या कपाटातील पेटीची किल्ली कुठे आहे?”

“त्यांच्या घड्याळाच्या पट्ट्यावर.”

“मला वाटते आपले संशोधन, त्या दिशेने जायला पाहिजे. नाईलाज झाला तर पेटीचे कुलूप फार मजबूत नसेल. तुमच्याकडे अजून कोणी धट्टाकट्टा माणूस या ठिकाणी उपलब्ध आहे का?”

“टांगेवाला मॅकफेल आहे.”

“तो कुठे झोपतो?’

“तबेल्यावर.”

आपल्याला कदाचित तो लागेल. आता गोष्टी कशाकशा घडतात, त्यावरून आपली कार्यपद्धत ठरेल. अच्छा. मी सकाळपूर्वी तुम्हाला भेटण्याची अपेक्षा करतो.”

मध्यरात्रीपूर्वी आम्ही हॉलच्या दारासमोरील झुडूपांमध्ये दडून बसलो. ती छान पण थंड रात्र होती. आम्ही आमच्या मोठ्या कोटांमुळे उबदार होतो. आकाशात अर्धा चंद्र होता व ढग फिरत होते. वाऱ्याची झुळूक वहात होती. ती काही अपेक्षेची व उत्सुकतेची पण उदासवाणी वेळ होती. आम्ही भारावल्यासारखे झालो होतो. माझ्या मित्राच्या अंदाजाप्रमाणे, आम्ही या विचित्र घटनासाखळीच्या टोकाला पोचलो होतो व सर्व बाजूंना लक्ष ठेऊन होतो.

होम्स म्हणाला, “जर नऊ दिवसांचे चक्र बरोबर ठरले, तर आज रात्री प्राध्यापक त्यांच्या सर्वात वाईट अवस्थेत असतील. प्रागला गेल्यापासून त्या विचित्र घटना सुरु झाल्या. त्यामुळे ते गुप्तपणे त्या बोहेमियन माणसाच्या संपर्कात असल्याचे कळत होते. तो माणूस तेथील कुठल्यातरी टोळीशी संबंधित असावा. आज त्यांना त्याच्याकडून पाकीट मिळाले असणार. सर्व गोष्टी एकमेकांशी जुळत होत्या. ते त्याच्याकडून काय व कशाला घेत होते, ते अजून स्पष्ट झाले नव्हते. पण या प्रकरणात प्रागहून काही अनामिक स्त्रोत असणार, हे समजत होते. या नऊ दिवसांच्या शिस्तीत बसणारे काही, नियमाने प्रागहून त्यांच्याकडे येत होते, हा नक्की माझे

लक्ष विचलित करणारा पहिला मुद्दा होता. पण त्यांची लक्षणे सर्वात उल्लेखनीय होती. तू त्यांची बोटे जिथे तळहाताला जोडली जातात, तो भाग बघितलास का?"

मी कबूल केले, की मी तो बघितलेला नाही,

तो जाड शिंगासारखा झाला आहे. मलाही हा प्रकार नवीन आहे. वॉटसन, पहिल्यांदा नेहमी हातांकडे बघावे. मग शर्टाचे कफ, पँटचे गुडघे, आणि बूट. असा सुजल्यासारखा बोटांचा भाग फक्त अशा वेळीच दिसतो. -- " होम्स गप्प झाला व त्याचा हात कपाळावर मारत बोलला, "वॉटसन, वॉटसन, मी किती मूर्ख आहे! यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. पण ते खरे असले पाहिजे. सर्व बाबी एकाच गोष्टीकडे निर्देश करत आहेत. मी कल्पनांचा संबंध जुळवायला कसा विसरलो? तो बोटांचा भाग? आणि कुत्रा! आणि युरेशियन हिरवेगार झाड! माझ्या स्वप्नांच्या छोट्या जगात मी हरवून गेलो. हे बघ, वॉटसन, तो येतो आहे. आपल्याला स्वतःलाच बघायला मिळेल."

हॉलचे दार सावकाश उघडले. दिव्याच्या प्रकाशात आम्ही प्राध्यापक प्रेसबरीची उंच आकृती पाहिली. तो त्याच्या रात्रीच्या गाऊनमध्ये दारात ताठ उभा होता. आपण त्यांना यापूर्वी बघितले, तसे हात पुढे झुकलेले होते.

आता ते पुढे आले. आणि त्यांच्यात असामान्य बदल दिसू लागला. ते गुडघ्यात वाकून व डोके खाली करून धपकन बसले व त्यांचे हात पाय हलवू लागले. जणू त्यांच्यात नवा उत्साह व शक्ती संचारल्यासारखे झुलत राहिले. त्यांनी प्रथम घराकडे व नंतर कोपऱ्यांवर नजर टाकली व चालू लागले. ते नाहीसे झाल्यावर, बेनेट हॉलच्या दारातून हळूच येऊन, त्यांच्यामागे जाऊ लागला.

होम्स ओरडला, "ये. वॉटसन, ये." आम्ही घराची कडेची बाजू दिसू लागेपर्यंत, झुडुपांमधून अगदी हळूवारपणे चालत राहिलो. तिथे अर्धचंद्राचा प्रकाश भरून राहिला होता. युरेशियन हिरव्यागार झाडावर व वेलीने वेढलेल्या भिंतीवर प्राध्यापक हळूच चालत होता.

आम्ही त्यांना बघत असतांना, ते अचानक विश्वास ठेवण्यास कठीण अशा सहजतेने, पटापट वर चढू लागले. फांद्याफांद्यांमधून ते उड्या मारत होते. प्रत्येक पाऊल जपून टाकत व फांदी घट्ट पकडत, स्वतःमधील शक्तीचा आनंद घेत, ठराविक उद्दिष्ट डोळ्यांसमोर न ठेवता, ते चढत होते. त्यांच्या अंगाच्या दोन्ही बाजूला त्यांचा गाऊन फडकत होता. त्यांच्या स्वतःच्या घराच्या भिंतीवर ते अजस्त्र वटवाघुळासारखे दिसत होते. चंद्रप्रकाशात त्या भिंतीवर अंधाराचा एक मोठा चौकोनी तुकडा दिसत होता. आता ते या मजेला कंटाळले असावेत. आता ते फांद्याफांद्यांवरून खाली येऊ लागले. परत जुन्या मनस्थितीत शिरत, जमिनीवर उतरून,. पूर्वीसारखेच हळूच चालत, तबेल्याकडे जाऊ लागले. शिकारी कुत्रा आता बाहेर आला होता. जोरजोरात भुंकत होता. त्याच्या मालकाला बघून, नेहमीपेक्षा जास्त उद्दीपित झालेला वाटत होता. तो त्याच्या साखळीवर जोर देत होता. आक्रमकतेने व काही खुमखुमीने कापत होता. प्राध्यापकांनी मुद्दाम कुत्र्यापासून दूर बसकण मारली आणि या ना त्या मार्गाने त्याला डिवचू लागले. कुत्र्याच्या तोंडावर दगड मारू लागले. एक काठी उचलून, त्या काठीने त्याला झोडपू लागले. कुत्र्याच्या उघड्या जबड्यापासून, काही इंच अंतरावर त्याला हाताने वाकुल्या दाखवू लागले. हर प्रकारे त्या कुत्र्याला भडकवायचा प्रयत्न करू लागले. शेवटी प्रकरण हाताबाहेर गेले. माझ्या सर्व साहसांमध्ये, मी एवढे विचित्र भावनाशून्य दृष्य कधी पाहिले नव्हते. डौलदार आकृती हळूहळू बेडकासारखी जमिनीवर चालत, रानटी पद्धतीने आधीच वेड्या झालेल्या कुत्र्याला, चिथावणी देत होती. कुत्रा आक्रमकतेने त्याच्यासमोर उड्या मारत होता. सर्व काही मोठ्या हुशारीने व दुष्टपणाचा बेत आखल्यासारखे सुरु होते. आणि मग क्षणार्धात ते घडले. साखळी तुटली नाही, तर साखळी अडकवलेला पट्टा तुटला. कारण तो जाड गळ्याच्या नवीन कुत्र्यासाठी बनवला होता. आम्हाला धातू जमिनीवर घरंगळत गेल्याचा आवाज आला. पुढच्याच क्षणी कुत्रा व माणूस खाली जमिनीवर लोळत होते. एकजण आक्रमकतेने गर्जना करत होता. तर दुसरा विचित्र अशा तारस्वरात भीतीने किंकाळ्या मारत होता. प्राध्यापकाच्या आयुष्यासाठी, हे फार धोकादायक होते. त्या रानटी कुत्र्याने प्राध्यापकाच्या मानेला पकडले

होते. त्याचे तीक्ष्ण सुळे आत घुसले होते. आम्ही त्यांच्याकडे धावत जाण्यापूर्वी, ते बेशुद्ध पडले होते. आम्ही दोघांना एकमेकांपासून दूर केले. आमच्यासाठी ते साधेसुधे काम नव्हते. पण बेनेटच्या आवाजाने व तिथे येण्याने, कुत्रा शांत झाला. तबेल्यावरील खोलीत झोपलेला टांगेवाला, आवाजाने जागा होऊन आश्चर्यचकित होऊन तिथे आला. त्याचे डोके हलवत, तो बोलला, "मला काही नवल वाटले नाही. मी त्याला असे करतांना पूर्वी पण पाहिले आहे. कुत्रा त्याला आज ना उद्या पकडणार, हे मला माहिती होते."

कुत्र्याला बांधण्यात आले आणि आम्ही एकत्रितपणे, प्राध्यापकांना त्यांच्या खोलीपर्यंत नेले. तिथे वैद्यकशास्त्रातील पदवी असलेल्या बेनेटने, त्यांच्या फाटलेला घशावर उपाय करायला मदत केली. कुत्र्याचे तीक्ष्ण दात धोकादायकपणे महत्वाच्या रोहिणीजवळ लागले होते व खूप रक्तपात झाल्याने, त्याची अवस्था गंभीर होती. पण अर्ध्या तासात धोका दूर झाला. मी रुग्णाला गुंगीचे औषध दिले. प्राध्यापक गाढ झोपले. नंतर, आणि नंतरच, आम्ही एकमेकांकडे पाहून परिस्थितीचा आढावा घेतला.

मी म्हणालो, "त्यांना एखाद्या निष्णात सर्जनला दाखवायला पाहिजे."

बेनेट ओरडला, "कृपया नको. आता हे प्रकरण आपल्या घरापुरते आहे व सुरक्षित आहे. जर ते या भिंतींबाहेर गेले, तर ते कधीच थांबणार नाही. त्यांच्या विद्यापीठातील इभ्रतीचा विचार करा, त्यांची युरोपियन जगातील कीर्ती, त्यांच्या मुलीच्या भावना."

होम्स म्हणाला, "बरोबर आहे. मला वाटते, हे सर्व आपल्यापाशीच ठेवणे शक्य आहे. असे परत होऊ नये, म्हणून प्रयत्न करणे देखील आपल्या हातात आहे., मिस्टर बेनेट, मॅकफेल रुग्णाकडे बघेल. आता आपल्याला मोकळीक आहे. घड्याळाच्या पट्ट्यातली किल्ली घेऊन आपण त्या गूढ पेटीत काय आहे, ते बघू.

त्यात विशेष काही नव्हते, पण पुरेसे होते -- एक रिकामी बाटली व एक जवळजवळ भरलेली बाटली, एक सिरींज, वेड्यावाकड्या परदेशी अक्षरात लिहिलेली खूप पत्रे.

पाकीटांवरील खुणा दर्शवत होत्या, की तीच ती सचिवाचे रोजचे काम बिघडवणारी पत्रे होती. त्यावर ‘ए डोराक’ अशी सही पण होती. प्राध्यापकांना नवीन बाटली पाठवली असल्याची, ती छोटी पावती होती. व पैसे मिळाल्याच्या पावत्याही होत्या. तिथे सुशिक्षित हाताने लिहिलेले, अजून एक पाकीट होते. त्यावर ऑस्ट्रीयन शिक्का व प्रागची खूण होती. होम्सने पाकीट फोडले व तो ओरडला, “आपल्याला मुद्देमाल सापडला.”

माननीय मित्रा, (ते पत्र असे होते.)

तुमच्या महत्वाच्या भेटीनंतर, मी तुमच्या केसबद्दल विचार केला. तुमच्या परिस्थितीत उपचारांसाठी काही विशेष कारणे असली, तरी माझ्या निदानाप्रमाणे काही तातडीने करायची गरज नाही व कुठलाही धोका नाही. असे शक्य आहे की रक्त साखळू नये म्हणून एक औषधाचा डोस घेण्याची गरज आहे. मी तुम्हाला स्पष्ट केल्याप्रमाणे, काळ्या तोंडाचे माकड न्यादर्श म्हणून वापरले आहे. कारण ते उपलब्ध होते. लंगूर अर्थात रांगणारे व चढणारे असते. पण सर्व बाबतीत माणसाशी साम्य असणारे असते. पण प्रगत प्राणी सरळ चालतात.. मी तुम्हाला विनंती करतो, की या क्रियेची कुठे वाच्यता करू नका. इंग्लंडमध्ये माझा एक दुसरा अशील आहे आणि डोराक दोन्हीसाठी माझा दलाल आहे. आठवड्याचे अहवाल ते सिद्ध करतील.

तुमचा विश्वासू,

एच लोएन्स्टीन

लोएन्स्टीन! तारुण्य टिकवण्यासाठी जादुई किंवा औषधी डोस शोधून काढायचा प्रयत्न करणाऱ्या एका अनाम शास्त्रज्ञाबद्दल छापून आलेले वर्तमानपत्रातील एक स्फुट मला आठवले. प्रागचा लोएन्स्टीन! आश्चर्यकारक शक्ती प्रदान करणारा, रक्त साखळू नये म्हणून एक औषध देणारा, लोएन्स्टीन! त्याला डॉक्टरी व्यवसायातून हद्दपार केले होते, कारण त्याने ते औषध कसे

तयार केले, ते सांगायला नकार दिला होता. मला काय आठवत होते, ते मी थोडक्या शब्दात सांगितले. मांडणीतून बेनेटने एक प्राणीशास्त्रावरचे पुस्तक काढले. त्याने वाचले, लंगूर, हिमालयाच्या उतारावर सापडणारे मोठे काळ्या तोंडाचे माकड! मोठे, चढणारे व थोडेबहुत माणसासारखे असणारे! अजूनही खूप वर्णन केलेले आहे. ठीक आहे. मिस्टर होम्स, मी तुमचा आभारी आहे. आता हे स्पष्ट आहे, की आपण मुळापर्यंत या समस्येचा शोध घेतलेला आहे."

होम्स म्हणाला, "अर्थात खरा स्त्रोत म्हणजे अवेळी, अकाली केलेले प्रेम! आपला अधीर प्राध्यापक परत तरुण बनायची इच्छा करत होता. पण ती सफल झाली नाही. जेव्हा निसर्गावर विजय मिळवण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा निसर्ग तो बेत हाणून पाडतो. जर नशीबाचा सरळ रस्ता सोडला, तर माणसाची उच्च जात जनावरामध्ये बदलू शकते." थोडा वेळ हातात ती भरलेली बाटली घेऊन, होम्स विचार करत बसला. "जेव्हा मी त्या माणसाला लिहिले, आणि त्याला म्हटले की मी त्याला विषाचा व्यापार केल्याबद्दल गुन्हेगार ठरवू शकतो, तेव्हा आता आपल्याला त्रास होणार नाही. पण ते परत होऊ शकते. त्यात धोका आहे -- मानवतेला खराखुरा धोका आहे. वॉटसन, असे आहे की जगातील ऐहिक, ऐन्द्रीय सुखाच्या मागे लागलेल्या स्खलनशील लोकांचे आयुष्य, ते शुद्ध हरपवणारे द्रावण मातीमोल करून टाकेल. पण अध्यात्मिक विचारांची माणसे त्याच्या नादी लागणार नाहीत. सर्वात कमी सुखलोलुप माणूस तगून राहील. आपले गरीब बिचारे जग जमिनीखालील गटार तर होणार नाही ना?" अचानक विचारवंत होम्स नाहीसा झाला, आणि क्रियाशील होम्स त्याच्या खुर्चीतून उठला. "मिस्टर बेनेट, मला वाटते आता अजून काही बोलायचे राहिले नाही. आता आपल्या या उपपत्तीमध्ये, सर्व घटना चपखलपणे बसतील. इतर कोणाहीपेक्षा प्राध्यापकमहाशयांमधील बदल, सर्वात आधी अर्थात कुत्र्याला समजला. त्याच्या वास घेण्याच्या क्षमतेमुळे, त्याला ते शक्य झाले. रॉयने प्राध्यापकावर नव्हे, तर माकडावर हल्ला केला. कारण रॉयला माकडाने चिडवले, प्राध्यापकाने नव्हे. चढणे हा प्राण्याचा आनंद होता. ती केवळ एक निर्हेतुक क्रिया होती, असे मी समजतो. काहीतरी वेळ घालवायचे साधन म्हणून, मिस प्रेसबरीच्या खिडकीशी जाणे घडले असेल.

वॉटसन, आपल्यासाठी एक लवकरची गाडी आहे. पण मला वाटते, आपण चेकर्स हॉटेल मध्ये चहा घेऊन मग गाडी गाठावी."

## The Adventure Of The Missing Three Quarter

## चुकलेले तीन क्वार्टर



बेकर रस्त्यावर आम्हाला विचित्र तारा मिळायची, चांगली सवय झाली होती. पण मला सात ते आठ वर्षांपूर्वी फेब्रुवारीच्या एका उदास सकाळी आलेली एक विशेष अशी तार आठवते आहे. त्यामुळे शेरलॉक होम्स पाऊण तास बुचकळ्यात पडला होता. ती त्याला आली होती व खालीलप्रमाणे होतीः

कृपया माझी वाट बघा. भयंकर वाईट नशीब. उजव्या बाजूकडील तीन क़्वार्टर हरवला. खूप गरजेचे. उद्या ओव्हरटन.

होम्स परत परत वाचत म्हणाला, “स्ट्रँड पोस्टाचा शिक्का. साडेदहाला पाठवले. हे पाठवले, तेव्हा मिस्टर ओव्हरटन फारच उद्दीपित झाले होते व परिणामस्वरूप, समजणार नाही, अशी भाषा त्यांनी वापरली. ठीक आहे. ठीक आहे. ते इथे येतीलच. तोपर्यंत मी वर्तमानपत्र वाचतो. त्यातून मला त्याबद्दल सारे कळेल. या अलीकडच्या दिवसात, अगदी नगण्य समस्यादेखील पुढे आणल्या जातात.”

खरेच, अलीकडे आमच्याकडच्या गोष्टी फार नीरस आणि रटाळ झाल्या होत्या. मी अशा कंटाळवाण्या काळाला, घाबरू लागलो होतो. मला अनुभवाने माहिती होते, की माझ्या मित्राचे डोके असामान्यपणे काम करायला इतके उत्सुक असे, की त्याला काम न पुरवणे धोकादायक होते. त्याचे उल्लेखनीय व्यावसायिक आयुष्य पणाला लागायची वेळ आली होती, तेव्हापासून वर्षानुवर्षे त्याला मी हळूहळू अंमली पदार्थांच्या विळख्यातून सोडवत होतो. आता मला माहिती झाले, की तो सामान्य स्थितीत या कृत्रिम उत्तेजक पदार्थासाठी अधीर होत नाही. पण ती वाईट सवय पूर्ण गेली नव्हती, तर फक्त दबली गेली होती. मला माहिती होते, हा काम नसलेला आळशीपणाचा काळ होम्सचा ताण वाढवे. त्याचा चेहरा, मनमानी करणारा वाटे व डोळ्यांमधील अनाकलनीय दुःख दृगोचर होई. त्यामुळे या मिस्टर ओव्हरटन नावाच्या कुणा इसमाला, मी धन्यवाद दिले. कारण त्याने काही न समजणारा मजकूर पाठवून, माझ्या मित्राची धोकादायक, शांतपणाची कोंडी फोडली होती. त्याला कुमार्गाला लागायच्या धोक्यापासून वाचवले होते.

आम्ही अपेक्षा करत असल्याप्रमाणे, तारेनंतर ती पाठवणारा स्वतः येऊन हजर झाला. मिस्टर सिरील ओव्हरटन, ट्रिनीटी महाविद्यालय, केंब्रिज. त्याचे कार्ड आधी आले आणि पाठोपाठ तरुण, जाड माणूस त्याच्या रुंद खांद्यांनी दरवाज्याची चौकट भरून टाकत, आमच्याकडे आकर्षक पण काळजीग्रस्त चेहऱ्याने आळीपाळीने बघत, हजर झाला.

“मिस्टर शेरलॉक होम्स?”

माझा मित्र अभिवादनपर, खाली झुकला.

“मिस्टर होम्स, मी स्कॉटलंड यार्डला जाऊन आलो. मी इन्स्पेक्टर स्टॅन्ले हॉपकिन्सला भेटलो. त्याने मला तुमच्याकडे येण्याचा सल्ला दिला. त्याला वाटले त्याप्रमाणे ही केस, पोलीसांपेक्षा तुमच्या योग्यतेची आहे.”

“तुम्ही बसा आणि काय झाले, ते मला सांगा.”

“ते भयानक आहे, मिस्टर होम्स ---- खूपच भयानक! माझे केस कसे करडे झाले नाहीत, नवल आहे. गॉडफ्रे स्टँन्टन. अर्थात, हे नाव तुम्ही ऐकले असेल ना? तो नुसते हं म्हणाला की त्याचा सगळा चमू कार्यान्वित होतो. मी त्यातील दोघांना राखून ठेवतो आणि ओळीतील तीन क्वार्टर ही जागा त्याला देतो. चेंडू दुसऱ्याकडे सरकवायचा असो, वळवायचा असो किंवा टप्पे पाडायचा असो, त्याच्यासारखे हे काम करू कोणीच शकत नाही. तो सगळ्यांना नेतृत्व देऊन, एकत्र ठेऊ शकतो.

“मी काय करणार? मिस्टर होम्स, मी तेच तुम्हाला विचारतो आहे. तिथे मूर हाउस आहे. तो राखीव असून गॉडफ्रेऐवजी खेळू शकतो. पण त्याला ते नीट जमत नाही. कारण तो साखळीमध्ये तो नेहमी उजव्या कडेला असतो. तो चांगला आहे, हे खरे आहे. पण त्याला चेंडूचा तितकासा अंदाज नाही. आणि तो वेगवान उडी मारायचे साहस करू शकत नाही. मॉर्टन व जॉन्सन, ऑक्सफर्डचे जणू उडणारे खेळाडू आहेत. ते खूप ताकदीने खेळू शकतात. स्टीव्हनसन जोरात पळतो. पण तो पंचवीसच्या रेषेपासून स्वतःला मागे खेचू शकत नाही. नाही. नाही, मिस्टर होम्स, तुम्ही आम्हाला गॉडफ्रे स्टँन्टनला शोधायला मदत केल्याशिवाय, आमचे काही खरे नाही.”

हे फार जोमाने व प्रामाणिकपणे केलेले लांबलचक भाषण, माझ्या मित्राने मोठ्या नवलपूर्ण रीतीने, मनोरंजन होत असल्यासारखे ऐकले. मिस्टर ओव्हरटनच्या .पिळदार शरीराचा हात, प्रत्येक नवीन मुद्द्यावर येतांना त्याच्या गुडघ्यावर चापट्या मारत होता.

होम्सने त्याच्या नेहमीच्या माहिती जमवलेल्या बाडातून S अक्षर काढले व गॉडफ्रे स्टँन्टन हे नाव शोधू लागला. ज्याला फाशी द्यायला मी मदत केली, त्या आर्थर एच स्टँन्टन, उदयोन्मुख, तरुण, नोटा छापणाऱ्याचे नाव तिथे होते. हेन्री स्टँन्टन हे नावदेखील होते. पण गॉडफ्रे स्टँन्टन, हे नाव माझ्यासाठी नवीन होते."

आता आश्चर्यचकित होण्याची पाळी आमच्या पाहुण्याची होती.

तो बोलला, "मिस्टर होम्स, मला वाटले, तुम्हाला या गोष्टी माहिती असतील. मला वाटते, जर तुम्हाला गॉडफ्रे स्टँन्टन माहिती नसेल, तर सिरील ओव्हरटनदेखील माहिती नसणार, बरोबर?"

होम्सने चांगल्या विनोदी पद्धतीने, त्याची मान हलवली. तो खेळाडू ओरडला, "महान स्कॉट! वेल्सबरोबर इंग्लंडच्या सामन्यात मी राखीव होतो. आणि विद्यापीठाचा पूर्ण वर्षभर कप्तान होतो. हे काहीच नाही. पण इंग्लंडमध्ये असा एकही माणूस नसेल की ज्याला, केंब्रिज, ब्लॅकहिथ गाजवलेला व पाच आंतरराष्ट्रीय सामने खेळलेला, अफलातून तीन क़्वार्टर, गॉडफ्रे स्टँन्टन माहिती नाही. बापरे! मिस्टर होम्स, तुम्ही कुठे रहाता?"

त्या अपरिपक्व, मूर्ख महाकाय माणसाच्या नवल वाटण्याला, होम्स हसला.

"मिस्टर ओव्हरटन, छान आणि तगड्या ---- अशा माझ्याहून वेगळ्या जगात तुम्ही रहाता. समाजाच्या विविध क्षेत्रात माझी पोच ताणलेली आहे. पण इंग्लंडमध्ये उत्तम आणि प्रसिद्ध असलेल्या क्रीडाक्षेत्रात मी कधीच रस घेतला नाही. तरीही तुमची या सकाळची अनपेक्षित भेट असे दाखवते, की त्या ताज्या हवेच्या छान खेळामध्येसुद्धा मला काम आहे. तर मग आता प्रिय सर, तुम्ही बसून मला शांतपणे व सावकाशीने नेमके काय झाले व कुठल्या बाबतीत तुम्हाला माझी मदत हवी आहे, ते सांगावे."

बुद्धीपेक्षा त्याची ताकद वापरणाऱ्या, तरूण ओव्हरटनच्या चेहऱ्यावर कंटाळलेले भाव दिसले. पण अनेकदा बोललेले तेच तेच शब्द व काही बिन महत्वाच्या गोष्टी असलेले त्याचे विचित्र कथन, गोष्टीच्या स्वरूपात त्याने आमच्यासमोर मांडले.

तो म्हणाला, "त्याचे असे आहे, मिस्टर होम्स, मी म्हणालो तसे, मी केंब्रिजच्या रग्बी संघाचा कप्तान आहे. गॉडफ्रे स्टँन्टन हा माझ्या संघातील माझा उजवा हात आहे. काल आम्ही सर्वजण येऊन बेन्टलेच्या खासगी हॉटेलमध्ये स्थिरस्थावर झालो. कारण ऑक्सफर्डला उद्या आम्हाला खेळायचे आहे. दहा वाजता मी चक्कर मारली तेव्हा सर्वजण पाणथळ जागी पक्षीनिरीक्षणाला गेले होते. माझा कडक प्रशिक्षणावर व भरपूर झोप घेण्यावर विश्वास आहे. त्यामुळे संघ सुदृढ राहून, उत्तम प्रकारे खेळू शकतो. गॉडफ्रे स्टँन्टन आल्यावर, त्याच्याशी माझे दोन शब्द बोलणे झाले. तेव्हा मला तो त्रासलेला व अशक्त वाटला. मी त्याला विचारले, की काय झाले. तो म्हणाला की त्याचे थोडेसे डोके दुखते आहे, पण विशेष काही नाही. मी त्याला शुभ रात्री म्हणून निघालो. अर्ध्या तासाने सामान वहून नेणाऱ्या हमालाने मला सांगितले, की एका दाढीवाल्या ओबडधोबड माणसाने मला चिठ्ठी देऊन, ती गॉडफ्रेला द्यायला सांगितली. गॉडफ्रे झोपायला गेला नव्हता आणि मी त्याच्या खोलीवर चिठ्ठी त्याला नेऊन दिली. गॉडफ्रेने ती वाचली आणि जणू त्याला काठीने फोडून काढल्यासारखा तो खुर्चीत कोसळला. तो हमाल इतका घाबरला, की तो मला आणायला निघाला. पण गॉडफ्रेने त्याला थांबवले. प्यायला पाणी देऊन भानावर आणले. नंतर तो खाली गेला व हॉलमध्ये थांबलेल्या माणसाबरोबर काही शब्द बोलला. मग ते दोघे दूर कुठेतरी गेले. हमालाने त्यांना शेवटचे बघितले, तेव्हा ते रस्त्यावर स्ट्रँडच्या दिशेने जवळजवळ पळत होते. आज सकाळी गॉडफ्रेची खोली रिकामी होती. त्याच्या अंथरुणावर तो झोपल्याचे दिसत नव्हते. त्याच्या सर्व वस्तू रात्रीपूर्वी होत्या तशाच होत्या. कोणा परक्या माणसाबरोबर, तो एका क्षणाच्या सांगण्याने गेला. तेव्हापासून त्याच्याबद्दल काही समजले नाही, मला वाटत नाही, की तो परत येईल. तो उत्तम खेळाडू होता. त्याची शरीरसंपदा चांगली होती. तो त्याचे प्रशिक्षण व्यवस्थित घेत असे आणि तसेच काही अपरिहार्य कारण

असल्याशिवाय, तो कप्तानाला न सांगता असा जाणाऱ्यांपैकी नव्हता. मला असे वाटते, की तो काही चांगल्या कारणाने गेला आहे आणि परत येणार नाही.”

या विचित्र कथनाकडे होम्सचे पूर्ण लक्ष होते.

त्याने विचारले, “मग तुम्ही काय केले?”

“मी केंब्रिजला तार करून विचारले, की त्याने तेथे काही कळवले आहे का. त्याला कोणीच बघितले नव्हते. मला नकारार्थी उत्तर मिळाले.”

“तो केंब्रिजला परत गेला असेल का?”

“हो, रात्री पावणेबारा वाजता एक गाडी आहे.”

“पण तुमच्या म्हणण्याप्रमाणे, त्याने ती घेतली नाही.”

“नाही तो तिथे दिसला नाही.”

“नंतर तुम्ही काय केले?”

“मी उमराव माउंट जेम्सना तार केली.”

“त्यांना का केली?”

“गॉडफ्रे अनाथ आहे आणि उमराव माउंट जेम्स त्याचे त्यातल्या त्यात जवळचे नातेवाईक आहेत ---- मला वाटते काका.”

“खरेच का? यामुळे या प्रकरणावर नवीन प्रकाश पडला आहे. उमराव माउंट जेम्स हे इंग्लंडमधील अती श्रीमंत माणसांपैकी एक आहेत.”

“मी गॉडफ्रेला असे म्हणतांना ऐकले आहे.”

“तुमचा मित्र त्यांचा जवळचा नातेवाईक होता?

“हो, तो त्यांचा वारस आहे. त्याचे काका ऐंशीच्या जवळपास आहेत. त्यांना मोठ्या प्रमाणात गाउट झालेला आहे. ते म्हणतात, की ते बिलीअर्डची काठी बोटांच्या मुळांनी हलवतात. त्यांनी गॉडफ्रेला आयुष्यात कधी एक शिलिंगसुद्धा दिला नाही. कारण ते फार चिक्कू आहेत. पण शेवटी ते सर्व त्याला मिळणार आहे.”

“तुम्ही उमराव माउंट जेम्सकडून काही ऐकले का?”

“नाही.”

“उमराव माउंट जेम्सकडे जाण्यात, तुमच्या मित्राचा काय उद्देश असू शकेल?’

“आदल्या रात्री, त्याला कसली तरी काळजी वाटत होती. ती पैशांसंबंधी असेल, तर तो ज्यांच्याकडे इतका पैसा आहे अशा त्याच्या नातेवाईकांकडे जाणे शक्य आहे. पण मी ऐकल्याप्रमाणे त्याला त्यांच्याकडून काही मिळण्याची शक्यता कमीच होती. गॉडफ्रेला त्या म्हाताऱ्याचा लळा नव्हता. शक्य असते, तर तो तिथे गेलाच नसता.”

“आपण लवकरच ते शोधून काढू. जर तुमचा मित्र उमराव माउंट जेम्सकडे गेला असेल, तर रात्री उशिरा आलेल्या त्या दाढीवाल्या ओबडधोबड माणसाबद्दल व तो आल्यामुळे गॉडफ्रेवर झालेल्या परिणामांबद्दल, तुम्ही स्पष्टीकरण मिळविले पाहिजे.”

सिरील ओव्हरटनने त्याचे हात डोक्यावर दाबून म्हटले, “मी काही करू शकत नाही.”

होम्स बोलला, “ठीक आहे. ठीक आहे. मला आज काही काम नाही आहे. मी यात आनंदाने लक्ष घालतो. मी तुम्हाला असा सल्ला देईन, की या माणसाशिवाय खेळायची तुम्ही तयारी ठेवा. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे, काही तातडी असल्यामुळे तो असा एकाएकी निघून गेला असेल आणि त्यामुळेच तो अजून येऊ शकला नसेल. आपण हॉटेलभोवती एक चक्कर मारू व त्या हमालाला काही नवीन समजले आहे का, ते बघू.”

शेरलॉक होम्स त्याच्या साक्षीदारांना ताण न घेऊ देता, सहज वावरत ठेवण्याच्या कलेत पारंगत होता. लवकरच त्याने गॉडफ्रेच्या रिकाम्या पडलेल्या खासगी खोलीतून, हमालाने म्हटलेले सर्व काही शोधून काढले. आदल्या रात्रीचा दाढीवाला ओबडधोबड माणूस, सभ्य गृहस्थ वाटत नव्हता. हमालाने वर्णन केल्याप्रमाणे तो मध्यमवयीन इसम होता. पन्नाशीचा, करड्या दाढीचा, फिकट चेहऱ्याचा व साधे कपडे घातलेला होता. तो रागावलेला वाटत होता. त्याने चिठ्ठी धरलेला हात थरथरत असल्याचे हमाल म्हणाला होता. गॉडफ्रे स्टँन्टनने चिठ्ठी चुरगळून त्याच्या खिशात ठेवली. हॉलमधील माणसाबरोबर गॉडफ्रेने हस्तांदोलन केले नव्हते. त्यांच्यात काही वाक्यांची देवाणघेवाण झाली. त्यातील फक्त एकच शब्द हमालाला कळला. तो म्हणजे 'वेळ'. नंतर ते दोघे निघून गेले. तेव्हा हॉलमधील घड्याळात साडेदहा वाजले होते.

गॉडफ्रेच्या अंथरुणावर बसून होम्स म्हणाला, "मला बघू दे. तू दिवसा काम करणारा हमाल आहेस ना?"

"हो सर, माझे काम रात्री अकरा वाजता संपते."

"मला वाटते, रात्रीच्या हमालाने काही पाहिले नाही.'

"नाही, सर. रात्री एक रंगमंच कंपू आला तेवढाच. आणखी कुणी नाही."

"काल दिवसभर तू कामावर होतास का?"

"हो, सर."

"तू मिस्टर गॉडफ्रे स्टँन्टनचे काही निरोप घेतलेस का?"

"हो, सर. एक तार."

"हे उत्कंठावर्धक आहे. तार किती वाजता आली?'

"साधारण सहा वाजता."

“तार आली, तेव्हा मिस्टर गॉडफ्रे स्टँन्टन कुठे होते?”

“इथे. त्यांच्या खोलीत.”

“त्यांनी ती उघडली, तेव्हा तू तिथे हजर होतास?”

“हो, सर. काही उत्तर आहे का, हे बघण्यासाठी मी थांबलो होतो.”

“मग ते मिळाले का?”

“हो, सर. त्यांनी उत्तर लिहिले.”

“ते तू घेतलेस का?”

“नाही. त्यांनी स्वतःच ते नेऊन दिले.”

“पण त्यांनी ते तू तिथे असतांना लिहिले.”

“हो, सर. मी दाराशी उभा होतो. आणि ते माझ्याकडे पाठ करून टेबलाशी होते. जेव्हा त्यांनी ते लिहून संपवले, तेव्हा ते म्हणाले, “ठीक आहे. तू जा. मी स्वतःच ते नेऊन देतो.”

“त्यांनी ते कशानी लिहिले?”

“पेनाने, सर.”

“टेबलावर असलेल्या तारेसारखी ती होती का?”

“हो, सर. सर्वात वरील.’

होम्स उठला. त्याने ते कागद घेतले व खिडकीजवळ गेला. वरचा कागद काळजीपूर्वक तपासला.

नाराज होऊन ते कागद टेबलावर परत ठेवत, तो बोलला, “त्याने पेन्सिलीने लिहिले नाही, हे दयनीय आहे. वॉटसन, सहसा अक्षर खाली उमटते ---- अशी गोष्ट, ज्यामुळे अनेक

आनंदी लग्ने मोडली आहेत. तरीही, मला इथे काही मागमूस सापडत नाही. पण त्याने रुंद टोकाच्या पिसाच्या पेनाने ते लिहिले म्हणून मला आनंद होतो आहे. मला खात्री नाही, पण कदाचित खालील शाई टिपण्याच्या पुठ्ठ्यावर काही अक्षरे उमटली असतील. हो, नक्कीच काहीतरी दिसते आहे."

त्याने तो पुठ्ठा फाडला आणि खालीलप्रमाणे चित्रलिपी असलेला भाग आमच्यासमोर धरलाः

सिरील ओव्हरटन खूपच उद्दीपित होऊन म्हणाला, "ते काचेवर धरा."

होम्स बोलला, "त्याची गरज आहे. कागद पातळ आहे. मागील बाजूवरुन आपल्याला काही पत्ता लागेल. ते असे आहे." त्याने ते उलटले व आम्ही असे वाचलेः 'देवासाठी तरी आमच्या बाजूने उभे रहा!'

म्हणजे गॉडफ्रे स्टँन्टनने तो अदृष्य होण्याअगोदर काही तास पाठवलेल्या तारेचा, शेवटचा भाग असा होता. काही शब्द तर कळत नाहीत. पण निदान सहा शब्द तरी दिसत आहेत ---- यावरून असे सिद्ध होते आहे, की या तरुण माणसाला, काही भयानक धोका त्याच्यावर चालून आलेला दिसला असावा. आणि त्यापासून कोणीतरी, त्याचा बचाव करणारे असावे. आमच्या शब्द असे सुचवतो आहे, की अजून कोणीतरी त्यात सामील आहे. कोण असेल? तो स्वतःच उदास मनस्थितीत दिसणारा, फिकट चेहऱ्याचा दाढीवाला? मग गॉडफ्रे स्टँन्टन व तो दाढीवाला यांच्यात काय संबंध असेल? त्या धोक्याशी सामना करण्यासाठी ते तिसऱ्या कोणाची मदत मागत आहेत? आपली चौकशी आता एवढ्यापुरती सीमित झाली म्हणायची."

मी सुचवले, "कोणाला ती तार पाठवली, ते आपल्याला शोधून काढावे लागेल."

“माझ्या प्रिय वॉटसन, तेच तर. तुझा विचार बरोबर असला, तरी तो माझ्या डोक्यात आधीच येऊन गेलेला आहे. पण तुझ्या हे लक्षात आले का, की दुसऱ्या माणसाच्या तारेची पावती बघून ती कुणाला पाठवली, हे आपल्याला सांगायला संबंधित लोकांचा कायद्याने विरोध असू शकेल. यात बराच लाल फितीचा कारभार असतो. तरीही मला या बाबतीत काही संशय नाही, की थोड्या नाजूकपणे व युक्तीने हे करता येईल. मध्यंतरीच्या काळात, तू इथे हजर असलेले मला आवडेल. मी टेबलावर ठेवलेले कागदपत्र मिस्टर ओव्हरटनना बघायला सांग.”

तिथे असलेली बरीच पत्रे, बिले व वह्या होम्सने चाळल्या आणि घाईने, मलूल बोटांनी व भेदक, रोखलेल्या डोळ्यांनी तपासल्या. शेवटी तो बोलला, “यात काही नाही. तसेही मला वाटते, तुमचा मित्र तरुण व सुदृढ होता. त्याच्याबरोबर काय वाईट होणार?”

“एकदम बरोबर.”

“तो कधी आजारी असल्याचे, तुम्ही ऐकले होते का?”

“एक दिवसदेखील नाही. तो कुठलेही गुद्दे झेलत असायचा. एकदा त्याची गुडघ्याची पट्टी सरकली होती पण ते काहीच नाही.”

“कदाचित तुम्हाला वाटते, तितका बळकट तो नसावा. त्याला काही छुपा त्रास असावा. तुमच्या परवानगीने मी यातील एकदोन कागद माझ्या खिशात ठेवतो. भविष्यात काही चौकशीसाठी मला ते लागू शकतील.”

एक तक्रारखोर आवाज आला, “एक मिनिट ---- एक मिनिट! आम्ही वर बघितले, तर एक विचित्र म्हातारा माणूस दारात थरथरत उभा होता. त्याने तांबूस काळ्या रंगाचे कपडे घातले होते. रुंद काठाची टोपी व सैलसर पांढरा टाय घातला होता. तो चर्चमधील धर्मगुरुसारखा नाहीतर प्रेतांची विल्हेवाट लावणाऱ्यांसारखा, दिसत होता. त्याचा वेष

अस्ताव्यस्त व दिसणे विचित्र असले तरी, त्याचा आवाज धारदार पण तुटक होता. लक्ष वेधून घेईल अशी वागण्याची पद्धत, भारदस्त होती.

त्याने विचारले, “तुम्ही कोण आहात आणि कुठल्या अधिकाराने या सभ्य माणसाच्या कागदपत्रांना हात लावत आहात?”

“मी गुप्तहेर आहे व या माणसाच्या नाहीसे होण्याचा छडा लावत आहे.”

“ओहो, असे आहे होय? आणि तुम्हाला हे करायला कुणी सांगितले?’

“या मिस्टर स्टँन्टनच्या मित्राने. त्याला तसे स्कॉटलंड यार्डमधून सांगण्यात आले.”

“सर, तुम्ही कोण आहात?’

“मी सिरील ओव्हरटन आहे.’

“तर मग मला तार पाठवणारे, तुम्हीच आहात तर. माझे नाव उमराव माउंट जेम्स. मी बेसवॉटर बसने शक्य तितक्या लवकर आलो. तुम्ही हा गुप्तहेर नेमला आहे तर?”

“हो, सर.’

“तुम्ही त्याची फी द्यायला तयार आहात?”

“मला खात्री आहे की माझा मित्र गॉडफ्रे जेव्हा सापडेल, तेव्हा तो आनंदाने ती देईल.”

“पण तो कधी सापडलाच नाही, तर? याचे उत्तर द्या.’

“तसे झाले तर त्याचे कुटुंब ---- ”

तो छोटा माणूस ओरडला, ““सर, तसे काही नाही आहे. माझ्याकडून एक पेनीही मिळणार नाही ---- एक पेनीही नाही! मिस्टर गुप्तहेर, तुम्हाला हे समजले का? मीच त्याचे कुटुंब आहे आणि मी ही जबाबदारी घेणार नाही. मी कधी पैसे उधळत नाही आणि आता तसे

करायचाही, माझा विचार नाही. त्याची काही अपेक्षा असली, तर ती यामुळेच असेल. तुम्ही इतक्या मोकळेपणे हे कागदपत्र हाताळता आहात. पण मी तुम्हाला सांगतो की त्यात काही महत्वाचे असेल, तर त्याबद्दल तुम्हाला संशयातीतपणे दोषी ठरवले जाईल.”

शेरलॉक होम्स बोलला, “फार छान, सर. मध्यंतरीच्या काळात, तुम्हाला या माणसाच्या नाहीसे होण्याबद्दल, काही सांगायचे आहे का?”

“नाही, सर. मला काही सांगायचे नाही. स्वतःची काळजी घ्यायला, तो चांगला जाणता व मोठा आहे. तो हरवण्याइतका मूर्ख असेल, तर मी त्याला शोधायची काहीही जबाबदारी घेणार नाही.”

डोळ्यात खट्याळपणा आणून, होम्स म्हणाला, “मला तुमची बाजू समजू शकते. पण कदाचित तुम्हाला माझी बाजू समजू शकत नाही. गॉडफ्रे स्टँन्टन हा गरीब माणूस वाटतो. जर त्याला पळवले गेले असेल, तर त्याच्याकडे घबाड आहे म्हणून नव्हे. तुमच्या संपत्तीची किर्ती परदेशीही पोचली आहे आणि असे अगदी शक्य आहे की चोरांच्या टोळीने तुमच्या घराची, तुमच्या सवयींची व तुमच्या संपत्तीची माहिती मिळवण्यासाठी त्याला ताब्यात घेतलेले असू शकेल.”

त्या खडूस छोट्याशा पाहुण्याचा चेहरा त्याच्या टायइतकाच पांढरा फटक पडला.

“बापरे, सर, काय कल्पना आहे! अशा खलनायकगिरीबद्दल, मी विचारदेखील करू शकत नाही. जगात किती अमानुष लोक भरले आहेत! पण गॉडफ्रे चांगला मुलगा आहे ---- प्रामाणिक आहे. त्याच्या वयस्क काकांचे नुकसान होईल, अशा कुठल्याही मोहाला तो बळी पडणार नाही. मला माझ्या बँकांना आजच सक्त सूचना द्यायला हव्यात. मिस्टर गुप्तहेर, या मध्यंतरीच्या काळात तुमचा तपास चालू ठेवा. त्याला सुखरूप परत आणण्यासाठी, इकडचे जग तिकडे करा. पैशांबद्दल म्हणाल तर, पाच दहा पौंडांच्या नोटांची काही काळजी करू नका. त्यासाठी मी आहेच,”

हट्टीपणा भरलेल्या दुर्दैवी मनाच्या त्या महाचिक्कू माणसाने, आम्हाला मदत होऊ शकेल अशी काहीही माहिती दिली नाही. कारण त्याला त्याच्या पुतण्याच्या खासगी आयुष्याबद्दल फारच कमी माहिती होती. फक्त त्या अर्धवट तारेवरच आम्ही पुराव्यासाठी अवलंबून होतो. ती हातात घेऊन, होम्स त्या साखळीतील दुसरा दुवा शोधण्यासाठी सिद्ध झाला. आम्ही उमराव माउंट जेम्सला हादरवून सोडले होते. या त्यांच्यावर कोसळलेल्या संकटातून मार्ग काढण्यासंबंधी, ओव्हरटन त्याच्या संघातील खेळाडूंचा, सल्ला घ्यायला गेला. हॉटेलपासून जवळच तार कार्यालय होते. आम्ही तिथे बाहेर थांबलो.

होम्स म्हणाला, “वॉटसन, हे आजमावून बघायला हरकत नाही. वॉरंटची मागणी करून, आपण ते कागदपत्र बघू शकतो. पण आपण अजून त्या पायरीपर्यंत आलो नाही. मला असे वाटत नाही, की एवढ्या गर्दीच्या ठिकाणी ते चेहरे लक्षात ठेवत असतील. आपण प्रयत्न करून तर बघू.”

तो निरागसपणे कार्यालयातील खिडकीमागील बाईला म्हणाला, “तुम्हाला मी त्रास देतो आहे. त्याबद्दल माफ करा. मी काल पाठवलेल्या तारेत थोडी चूक झाली आहे. मला अजून उत्तर आले नाही. मला वाटते, मी माझे नाव लिहायला बहुतेक विसरलो. ते तसेच झाले आहे का, हे तुम्ही मला सांगू शकाल का?”

त्या स्त्रीने पावत्यांचा गठ्ठा घेऊन पाने उलटली

तिने विचारले, “किती वाजता?”

“सहानंतर थोड्या वेळाने.”

“कुणाला पाठवली होती?”

होम्सने त्याचे बोट ओठांवर ठेवले व माझ्याकडे बघितले. “त्यातील पहिला शब्द ‘देवासाठी’ असा होता. मला उत्तर न आल्यामुळे, मी काळजीत पडलो आहे.” तो गुप्तपणे कुजबुजला.

त्या बाईने एक कागद वेगळा केला. “हाच तो आहे. त्यावर नाव नाही.” तिने तो पुढे करत म्हटले.

तो कागद घेत, होम्स म्हणाला, “मला उत्तर न येण्याचे, तेच कारण दिसते आहे. मी किती मूर्ख आहे! मिस, शुभ सकाळ आणि माझी समस्या दूर केल्याबद्दल धन्यवाद. आम्ही रस्त्यावर आल्यावर तो गालातल्या गालात हसला व हात एकमेकांवर चोळले.

मी विचारले, “मग?’

“माझ्या प्रिय वॉटसन, आपली सरशी झाली. आपण जिंकलो. माझ्याकडे सात वेगवेगळे बेत होते. पण पहिल्याच फटक्यात आपण जिंकू असे वाटले नव्हते.”

“आणि तुला काय समजले?’

आपल्या तपासासाठी करायची सुरवात कुठून करायची ते समजले. त्याने एक टांगा थांबवला. तो बोलला, “किंग क्रॉस स्टेशन.”

“आपण प्रवासाला निघालो, तर?”

“हो. मला वाटते आपण झटपट केंब्रिजला पोचले पाहिजे. मला सर्व इशारे त्या बाजूकडून मिळत आहेत.”

आम्ही ग्रेज खानावळीचा रस्ता पार करतांना, मी विचारले, “मला सांग, त्याच्या पलायनाबद्दल तुला कोणाचा संशय येतो आहे? मला वाटते की आपल्या आतापर्यंतच्या केसेसमध्ये, गुन्ह्याचा उद्देश न कळता तपास सुरु करायची ही पहिलीच वेळ असावी. त्याच्या

श्रीमंत काकांबद्दल माहिती देण्यासाठी त्याचे अपहरण केले गेले असेल, याची तू नक्कीच कल्पना करू शकत नसशील, नाही का?”

“माझ्या प्रिय वॉटसन, मी कबूल करतो की हे फार चांगले स्पष्टीकरण आहे, असे मला वाटत नाही. पण त्या खडूस वयस्क माणसाला वठणीवर आणण्यासाठी, ते एक बरे स्पष्टीकरण आहे, हे माझ्या सुपीक डोक्यात आले.”

“ते झाले. पण तुझे दुसरे स्पष्टीकरण काय होते?”

“मी खूप सारी देऊ शकतो. ही घटना महत्वाच्या सामन्याच्या आदल्या संध्याकाळीच व्हावी व जिंकण्यासाठी गरज असणाऱ्या माणसाबाबतच हे व्हावे, हे थोडे नवल वाटणारे व काही सुचवणारे आहे. कदाचित तो योगायोगही असेल. पण हे उत्कंठापूर्ण आहे. पैसे न लावता खेळलेल्या खेळात पैज लावणे नसते. पण बाहेरील लोकांमध्ये अशा पैजा चालू असतात. आक्रमक, गुन्हेगार रेसच्या घोड्यावर जशा पैजा लावतात, तशी या खेळाडूवर एखाद्याने लावली नसेल ना? हे एक स्पष्टीकरण आहे. दुसरे अगदी सहज सुचणारे आहे. ते असे आहे, की हा तरुण आता कितीही नम्रतेचा आव आणत असला तरी, तो खरेच मोठ्या संपत्तीचा वारस आहे आणि त्याचे अपहरण करून मोठ्या रक्कमेची मागणी करून ती मिळवण्याचा घाट घालणे काही अशक्य नाही.”

“पण या बेतांचा तारेशी काही संबंध नाही.”

“खरे आहे, वॉटसन. आपल्या हातात प्रत्यक्ष पुरावा, म्हणजे एवढी तारच आहे. आपले लक्ष त्यापासून लांब भरकटायला नको. ही तार पाठवायचा उद्देश काय, हे शोधून काढण्यासाठीच आपण केंब्रिजला चाललो आहोत. आपल्या तपासाची वाट अजून तरी नक्की नाही. पण माझ्या मते संध्याकाळपूर्वी, ती स्पष्ट होईल किंवा आपण त्या दिशेने प्रगती करू.”

आम्ही त्या जुन्या विद्यापीठाला पोचलो, तेव्हा आधीच अंधार झाला होता. स्टेशनपासून आम्ही टांगा केला व टांगेवाल्याला डॉ लेस्ली आर्मस्ट्रॉंग यांच्या घरी नेण्यास सांगितले. काही मिनिटात आम्ही गर्दीच्या ठिकाणी एका मोठ्या इमारतीपाशी आलो. आम्हाला रस्ता दाखवण्यात आला आणि शेवटी बरीच वाट बघून आम्हाला आत सोडण्यात आले. तिथे टेबलापलीकडे डॉक्टर बसलेले होते.

मी डॉक्टरकी सोडून बराच काळ गेलेला असल्याने, मी डॉ लेस्ली आर्मस्ट्रॉंग यांना ओळखत नव्हतो. ते विद्यापीठातील वैद्यकीय शाखेचे मुख्यच नव्हे, तर इतर वैद्यकीय शाखांमध्येदेखील थोर विचारवंत म्हणून युरोपभर प्रसिद्ध आहेत. त्यांच्या हुशारीची ख्याती माहिती नसणारा सुद्धा, त्यांच्याकडे एक कटाक्ष टाकूनच भारावून जाईल, असे ते दिसत होते. चौकोनी, भरीव चेहरा, दाट भुवयांखालील डोळ्यांमधील खोल उदासी आणि घट्ट मिटलेला जबडा, असे त्यांचे वर्णन करता येईल. निर्मळ चारित्र्याचे, सजग मनाचे, थंड, स्वयंशिस्त पाळणारे, समाधानी व दुसऱ्यावर छाप पाडणारे असे ते असल्याचे मला जाणवले. त्यांनी माझ्या मित्राचे कार्ड त्यांच्या हातात धरले व माझ्या काळसर दरारा वाटणाऱ्या मित्राकडे, फारशा आल्हादक नसलेल्या नजरेने पाहिले.

"मिस्टर शेरलॉक होम्स, मी तुमचे नाव ऐकले आहे. तुमचा व्यवसाय काय आहे, हे मी जाणतो. पण मी त्याची मुळीच भलावण करत नाही."

माझा मित्र शांतपणे म्हणाला, "तसे असेल तर, देशातील प्रत्येक गुन्हेगाराशी तुम्ही सहमत आहात."

"गुन्हा रोखण्यासाठीचे तुमचे प्रयत्न, समाजातील सुजाण नागरिकाने पाठींबा देण्यासारखे आहेत. तरी मला याबद्दल संशय नाही, की कायद्याने नेमले गेलेले स्कॉटलंड यार्ड, त्यासाठी पुरेसे आहे. लोकांच्या खासगी आयुष्यातील गुपिते व झाकलेल्या बऱ्या अशा कौटुंबिक गोष्टी, तुम्ही उघड्या करता व तुमच्यापेक्षा कामात व्यग्र असणाऱ्या लोकांचा मूल्यवान वेळ

फुकट घालवता, तेव्हा ते काम टीका करण्यायोग्य असते. उदाहरणार्थ तुमच्याशी बोलण्यापेक्षा, माझ्या विषयावरचे काम करणे मी पसंत करेन.

“यात काही संशय नाही, डॉक्टर. पण तुमच्या कामाहून आपले संभाषण जास्त महत्वाचे ठरायची शक्यता आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो की तुम्ही आता ज्याबद्दल दोष दिलात, त्याच्या उलट तुम्ही करत आहात आणि आम्ही, खासगी गोष्टी समाजात प्रसृत होण्यापासून वाचवायचा प्रयत्न करतो आहोत. ही केस व्यवसायिक पोलीसांच्या हातात पडण्यापूर्वीच आम्ही ती सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत. तुम्ही माझ्याकडे, नेमलेल्या गुप्तहेरांच्या व पोलिसांच्याही पुढे जाणारा स्वयंप्रेरित गुप्तहेर म्हणून बघू शकता. मी गॉडफ्रे स्टँन्टनबद्दल चौकशी करण्यासाठी आलो आहे.”

“त्याचे काय?”

“तुम्ही त्याला ओळखता, की नाही?”

“तो माझा जवळचा मित्र आहे.”

“तो नाहीसा झाला आहे, हे तुम्हाला माहिती आहे का?”

“ओहो, खरे की काय?” डॉक्टराच्या निश्चल चेहऱ्यावरील हावभाव जराही बदलले नाहीत.

“त्याने त्याचे हॉटेल काल रात्री सोडले ---- तेव्हापासून त्याच्याबद्दल कुणाला काही माहिती नाही.”

“तो नक्की परतेल.”

“उद्या विद्यापीठाचा फूटबॉलचा सामना आहे.”

मला त्या पोरकट खेळाबद्दल काही आत्मीयता नाही. पण मी त्याला ओळखतो व तो मला आवडतो, म्हणून मला त्याच्या भविष्यकाळाबद्दल खूप रुची आहे. फूटबॉलचा सामना माझ्या खिजगणतीत येत नाही.”

“गॉडफ्रे स्टँन्टनच्या भविष्यकाळाबद्दलच माझा तपास सुरु आहे. त्यामुळे त्याबाबतीतील तुमची सहानुभूती मी समजू शकतो. तो कुठे आहे, हे तुम्हाला माहिती आहे का?”

“खात्रीने नाही.’

“तुम्ही कालपासून त्याला पाहिलेले नाही?”

“नाही.”

“मिस्टर स्टँन्टनची तब्येत चांगली होती का?’

“अगदी चांगली होती.”

“तो कधी आजारी पडल्याचे तुम्हाला माहिती होते का?’

“कधीच नाही.’

होम्सने एक कागद डॉक्टराच्या डोळ्यापुढे फडकवला. मग तुम्ही केंब्रिजच्या डॉ लेस्ली आर्मस्ट्रॉंग यांच्या मिस्टर गॉडफ्रे स्टँन्टनच्या नावाच्या, गेल्या महिन्यातील या तेरा गिनीच्या बिलाचे, काय स्पष्टीकरण द्याल? हे मला त्याच्या टेबलाच्या खणात मिळाले.”

डॉक्टर रागाने लाल झाले.

“मिस्टर होम्स, मी तुम्हाला स्पष्टीकरण देण्याचे काही कारण, मला दिसत नाही.”

होम्सने बिल परत त्याच्या वहीत ठेवले. तो म्हणाला, “तुम्हाला चार लोकांसमोर स्पष्टीकरण द्यायचे असेल, तर मी आज ना उद्या येतोच. मी तुम्हाला आधीच म्हटले आहे, की

मी शक्यतो माझ्या अशीलांच्या बाबतीतील गोष्टी जाहीर करत नाही. तुम्ही मला विश्वासात घेणे शहाणपणाचे ठरेल.”

“मला त्याबद्दल काही माहिती नाही.”

“तुम्हाला मिस्टर स्टँन्टनबद्दल, लंडनहून काही कळले आहे का?”

“खात्रीने सांगतो, की नाही.”

दमून सुस्कारा टाकत होम्स म्हणाला, “अरेरे! आता पुन्हा पोस्टाचे कार्यालय! तुम्हाला गॉडफ्रे स्टँन्टनने लंडनहून एक तातडीची तार काल सव्वा सहा वाजता पाठवली होती ---- ती नक्कीच त्याच्या नाहीसे होण्याशी संबंधित असणार ---- आणि तरीही तुम्हाला ती मिळाली नाही, हे संशयास्पद वाटते. मी पोस्टात जाऊन तक्रार नोंदवणार आहे.”

डॉ लेस्ली आर्मस्ट्राँग त्यांच्या टेबलामागे उभे राहिले. त्यांचा चेहरा रागाने लालजांभळा झाला. ते म्हणाले, “सर, तुम्ही माझ्या घराबाहेर जाण्याचे कष्ट घ्याल का? तुम्ही तुम्हाला हे काम करायला सांगणाऱ्या उमराव माउंट जेम्स यांना सांगा, की मी कुठल्याही प्रकारे त्यांना किंवा त्यांच्या चमच्यांना मदत करू इच्छित नाही. नाही, सर. याउप्पर एकही शब्द नको.” त्यांनी रागरागाने जोरात घंटी वाजवली. “जॉन, यांना बाहेरचा रस्ता दाखव.” एका भंपक स्वयंपाक्याने आम्हाला ढकलत दारापर्यंत नेले आणि आम्ही रस्त्यावर आलो. होम्स हसत सुटला.

तो बोलला, “डॉ लेस्ली आर्मस्ट्राँग हे नक्कीच चारित्र्यवान व कामाचा माणूस आहेत. त्यांनी त्यांची हुशारी वेगळ्या प्रकारे वापरली, तर प्रसिद्ध मोरीआर्टीची जागा भरून काढायला, तो अगदी योग्य माणूस आहे. माझ्या बिचाऱ्या वॉटसन, आपण या स्वागतोत्सुक नसलेल्या शहरात एकटे, मित्रांशिवाय उभे आहोत. आपण ही केस सोडूही शकत नाही. ही आर्मस्ट्राँगच्या घरासमोरील हॉटेल आपल्या गरजा भागवायला बरे दिसते आहे. जर तू समोरच्या बाजूकडील

खोली मिळवलीस व रात्रीसाठी आवश्यक ते सामान आणलेस, तर मी काही चौकशा करायचे काम करू शकेन."

परंतु होम्सच्या कल्पनेपेक्षा या काही चौकशा फारच लांबलचक निघाल्यामुळे, तो नऊ वाजेपर्यंत हॉटेलात परत आला नाही. तो अशक्त व उदास दिसत होता. धुळीने माखला होता. भुकेने व दमून बेजार झाला होता. टेबलावर गार जेवण तयार होते. जेवण झाल्यावर त्याने पाईप पेटवला व त्याच्या अर्धविनोदी व तत्वज्ञान्याच्या पद्धतीने, न झालेल्या अपेक्षित कामांबद्दल विचार करू लागला. टांग्याच्या चाकांच्या आवाजाने तो उठून खिडकीत गेला. डॉक्टरांच्या दारासमोर गॅसबत्तीच्या उजेडात दोन घोड्यांची एक बग्गी उभी राहिली.

होम्स म्हणाला, "ती साडेसहापासून गेले तीन तास बाहेर होती व आता आली आहे. त्यामुळे ती दहा बारा मैल फिरून आलेली आहे. आणि ती असे दिवसातून एकदा किंवा दोनदा करते."

"एका काम करणाऱ्या डॉक्टरसाठी, हे काही नवीन नाही."

"पण आर्मस्ट्राँग हा काही खरी डॉक्टरकी करणारा नाही. तो सल्लागार व प्राध्यापक आहे. तो सर्वसाधारण अशी डॉक्टरकी करत नाही. कारण मग त्याला त्याचे लिखाणाचे, वाचनाचे काम करता येत नाही. तर मग तो एवढा वेळ, जातो तरी कुठे? हे असे जाणे, त्याला त्रासदायक ठरत असणार. तो कुणाला भेटायला जातो?"

"त्याचा टांगेवाला ---- "

"माझ्या प्रिय वॉटसन, तुला असा संशय येऊ शकतो का, की मी त्याच्यावर हा प्रयोग केला नसेल? त्याच्या मालकाने पढवल्यामुळे, की त्याच्या दुष्ट अनीतीमान असण्यामुळे, पण त्याने उद्धटपणे माझ्या अंगावर कुत्रा सोडला. त्या माणसाला व कुत्र्यालाही माझ्या हातातील काठी आवडली नसावी. तर अशा तऱ्हेने तो प्रयत्न फसला. त्यानंतर संबंध ताणले गेले व पुढील

चौकशी अशक्य झाली. आपल्या हॉटेलच्या परिसरातील एका भल्या माणसाकडून मला डॉक्टरांच्या काही सवयी व रोजचा प्रवास, याबद्दल माहिती मिळाली. त्याच क्षणी, त्याच्या म्हणण्याप्रमाणे, टांगा दारात येऊन थांबला.”

“तू त्याच्यामागे गेला नाहीस का?”

“छान वॉटसन! तू आज संध्याकाळी फार चमकतो आहेस. ही कल्पना माझ्याही मनात आली. आपल्या हॉटेलच्या पुढे असलेले सायकलींचे दुकान तू पाहिले असशील. त्यात मी घुसलो. एक सायकल घेतली आणि टांगा माझ्या नजरेच्या टप्प्यातून अदृष्य व्हायच्या आत, मी त्याच्या मागे जाऊ लागलो. मी वेग वाढवला. मग कुणाच्या लक्षात येणार नाही इतके अंतर ठेवत, साधारण शंभर यार्डाचे अंतर तोडले. गावाबाहेर पोचेपर्यंत मी टांग्याच्या दिव्यांमागे गेलो. आता आम्ही एका लहानशा रस्त्यावर पोचलो, तेव्हा काहीशी लाजीरवाणी घटना घडली. टांगा थांबला. डॉक्टर उतरले व सावकाशीने चालत मागे आले. मी तिथेच सायकल थांबवली होती. ते मला छान, फसव्या आवाजात म्हणाले, की रस्ता लहान असल्यामुळे त्यांना अशी भीती वाटते आहे की टांगा व सायकल दोन्ही तिथून जाऊ शकणार नाही. ते त्यांनी फारच स्तुत्य पद्धतीने सांगितले. मी लगेच सायकलवर टांग मारली व टांगा ओलांडून पुढे गेलो. काही मैल गेल्यावर सोयीस्कर ठिकाणी मी टांगा गेला का, ते बघायला थांबलो. तिथे टांग्याचा काही पत्ता नव्हता. याचा अर्थ, तो मला न दिसलेल्या कुठल्यातरी आडव्या गल्लीत गेला. मी मागे फिरलो. पण टांगा कुठे दिसेना. आणि आता तू बघतो आहेस, त्याप्रमाणे ती इथे येऊन ठेपलेलो आहे. अर्थात, मला गॉडफ्रे स्टँन्टनच्या नाहीसे होण्याशी, याचा संबंध जोडायचे काही कारण नव्हते. फक्त डॉ आर्मस्ट्राँग यांच्या हालचालींवर नजर ठेवणे, एवढाच उद्देश होता. पण आता माझ्या लक्षात आले, की त्यांचा पाठलाग करणाऱ्यांवर त्यांचे बारीक लक्ष असते. हे प्रकरण त्यामुळे जास्त रोचक होत चालले आहे. याचा छडा लावेपर्यंत मी गप्प बसणार नाही.”

“आपण उद्या त्यांचा पाठलाग करू शकतो.”

“आपण करू शकतो का? तुला वाटते तितके, ते सोपे नाही. तुला केंब्रिजच्या उपनगरीय भागाची विशेष माहिती नाही. तिथे लपायच्या नैसर्गिक जागा नाहीत. मी काल रात्री फिरलो, तो सर्व भाग तुझ्या तळहातासारखा सपाट व मोकळा आहे. आणि आपण ज्याचा पाठलाग करणार तो माणूस, त्याने मला जसे बनवले त्यावरून असे वाटते, की तो काही मूर्ख नाही. मी ओव्हरटनला तार पाठवून लंडनमधील ताज्या घडामोडींबद्दल विचारले आहे. मधल्या वेळात आपण आपले लक्ष डॉ आर्मस्ट्राँगवर एकत्रित करू शकतो. मी शपथेवर सांगू शकतो, की त्याला गॉडफ्रे कुठे आहे, ते माहिती आहे. तरीही जर आपल्याला ते माहिती झाले नाही, तर ती आपली चूक असेल. आता तरी पत्त्यांचा डाव त्याच्या हातात आहे. पण वॉटसन, तू जाणतोस, की खेळ असा अर्धवट सोडायची माझी सवय नाही.”

तरीही दुसरा दिवसदेखील, गूढ सोडवण्याच्या जराही जवळ न पोचण्यात गेला. न्याहारीनंतर आम्हाला एक चिट्ठी मिळाली. होम्सने हसतहसत ती मला वाचायला दिली. ती अशी होतीः

सर,

तुम्ही माझ्यावर लक्ष ठेवण्यात तुमचा वेळ फुकट घालवत आहात. तुम्हाला काल रात्री शोध लागला, त्याप्रमाणे माझ्या टांग्याला मागे एक खिडकी आहे. तुमची इच्छा असेल, तर येथून वीस मैलांवर असलेल्या त्या ठिकाणापर्यंत तुम्हाला माझा पाठलाग करावा लागेल. मध्यंतरीच्या काळात मी तुम्हाला सांगतो, की माझ्यावर हेरगिरी करून, गॉडफ्रे स्टँन्टनला शोधण्याच्या दृष्टीने काहीही हाती गवसणार नाही. त्यापेक्षा तुम्ही लंडनला परतून तुम्हाला या कामगिरीवर नेमणाऱ्याला सांगावे, की तुम्हाला गॉडफ्रेचा माग काढणे शक्य नाही. केंब्रिजला राहून तुमचा वेळ नक्कीच फुकट जाणार आहे. तुमचा विश्वासू, लेस्ली आर्मस्ट्राँग.

होम्स म्हणाला, “तो डॉक्टर मोकळेपणे बोलणारा, प्रामाणिक पण भांडखोर आहे. तो माझी उत्सुकता वाढवतो आहे. इथून जाण्यापूर्वी मला याचा छडा लावला पाहिजे.”

मी म्हटले, “त्याचा टांगा आता त्याच्या दारात उभा आहे. तो त्यात चढतो आहे. त्याला आपल्या खिडकीकडे कटाक्ष टाकतांना मी पाहिले. समजा मी सायकलवर माझे नशीब आजमावून बघितले तर?”

“नाही. नाही. प्रिय वॉटसन, तुझ्या चपळपणाच्या सर्व नैसर्गिक गुणांना मान देऊनही, तू डॉक्टरांच्या तोडीस तोड निघशील, असे मला वाटत नाही. माझा मी स्वतंत्रपणे काही युक्ती शोधून काढतो. आपण दोघे चौकस व्यक्ती, त्या खेडेगावाच्या झोपाळू सुनसान रस्त्यावर गेलो, तर तिथे उगीच नको त्या गावगप्पांना उत येईल. तू इथे तुझा वेळ चांगला घालवण्यासाठी, काहीतरी नक्की शोधून काढशील. संध्याकाळपूर्वी मी तुला चांगला अहवाल देऊ शकेन, अशी आशा करतो.”

अजून एकदा माझ्या मित्राने, मार खाऊन यायचे ठरवले असावे. तो रात्री दमून व अयशस्वी होऊन परत आला.

“वॉटसन, माझा दिवस फुकट गेला. डॉक्टरांच्या टांग्याच्या दिशेने जाऊन, मी केंब्रिजच्या आसपासच्या त्या भागातील लोकांशी दिवसभर बोललो. तेथील वार्ताहरांशी व वर्तमानपत्र छापणाऱ्यांशी, त्या तारेबद्दल बोललो. हिस्टन, चेस्टरटन, वॉटरबीच, ओकिंग्टन इ. भाग पिंजून काढला. पण हाती काही लागले नाही. मात्र टांग्याकडे, त्या मरगळलेल्या वेळी दुर्लक्ष झाले. परत डॉक्टरांचा विजय झाला. माझ्यासाठी तारेचा कागद आहे का?”

“हो. हा बघ.”

“ट्रिनिटी महाविद्यालयातील जेरेमी डिक्सनला, कुत्र्याबद्दल विचार.

“मला समजले नाही.”

“ओहो, हे अगदी सरळ आहे. हे आपला मित्र ओव्हरटन याच्याकडून, माझ्या प्रश्नाला उत्तर म्हणून आले आहे. मी मिस्टर जेरेमी डिक्सनला चिठ्ठी पाठवतो. त्यानंतर नक्की आपले नशीब बदलेल. तसेही सामन्याबद्दल काही बातमी आहे का?”

“हो. स्थानिक संध्याकाळच्या वर्तमानपत्रात त्याबद्दल विस्तृत माहिती आलेली आहे. ऑक्सफर्ड एका गोलाने व दोन डावांनी जिंकले. त्यातील शेवटचे वाक्य आहेः

‘ओव्हरटन कप्तान असलेल्या संघाचा पराभव बहुधा चतुरस्त्र आंतरराष्ट्रीय खेळाडू गॉडफ्रे स्टँन्टन याच्या दुर्दैवी गैरहजेरीमुळे झाला असावा. त्याची अनुपस्थिती, खेळाच्या प्रत्येक बाबतीत जाणवत होती. तीन क्वार्टर ओळीचा मिलाफ नसल्याने, त्यांचे चढाईतील व संरक्षणातील दौर्बल्य संघाच्या दमदार खेळापुढे वरचढ ठरले.’

होम्स बोलला, “मग आपला मित्र ओव्हरटन याचे, असे काही वाईट होणार असल्याचे वक्तव्य, बरोबर ठरले. वैयक्तिक रीत्या मी डॉ आर्मस्ट्रॉंग, यांच्या मताशी सहमत आहे. फुटबॉल माझ्या कार्यक्षेत्रात येत नाही. वॉटसन, आज रात्री लवकर झोपावे. कारण मला वाटते उद्याचा दिवस घटनांनी भरलेला असणार आहे.”

दुसऱ्या दिवशी सकाळी होम्सच्या पहिल्या दर्शनाने मी घाबरलो. कारण तो शेकोटीशेजारी त्याची लहानशी त्वचेत द्यायची सिरींज घेऊन बसला होता. त्याच्या स्वभावातील एकमेव त्रुटीबरोबर, त्याच्या व्यसनीपणाबद्दल, मी त्याचे संधान जोडले. त्यामुळे त्याच्या हातात ते चकाकतांना पाहून मला भीती वाटली. माझा काळजीचा चेहरा बघून, तो हसू लागला व त्याने ती टेबलावर ठेवली.

“नाही. नाही. माझ्या प्रिय मित्रा, घाबरायचे काही कारण नाही. या प्रसंगी हे काही त्रास देणारे साधन नसून, ती आपले गूढ उकलायची किल्ली आहे. या सिरींजवर माझ्या सर्व आशा एकवटल्या आहेत. मी आताच शत्रूची बित्तमबातमी काढायच्या एका मोहिमेवरून परत आलो आहे. सर्व काही आपल्याला हवे तसे घडते आहे. छान न्याहारी कर. वॉटसन, मी आज डॉ

आर्मस्ट्राँगच्या मागावर जायचे ठरवतो आहे. आणि एकदा ते सुरु झाले की मी त्याच्या बिळात शिरेपर्यंत, विश्रांती घ्यायला किंवा खायला थांबणार नाही."

मी म्हणालो, "असे असेल तर, आपण आपली न्याहारी बरोबर घेऊ. कारण तो लवकर निघतो आहे. त्याचा टांगा दारात उभा आहे."

"त्याची काळजी नको. त्याला जाऊ दे. मी त्याचा पाठलाग करू शकणार नाही अशा ठिकाणी तो गेला, तर मी त्याला हुशार समजेन. तुझे झाले, की माझ्याबरोबर खाली ये. मी तुझी ओळख नवीन निष्णात गुप्तहेराशी करून देतो. आपण जे काम करू इच्छितो, त्यात तो माहीर आहे."

आम्ही खाली उतरल्यावर मी होम्सच्या मागे तबेल्याच्या मोकळ्या जागी गेलो. तिथे त्याने एका सैल पेटीचे कुलूप उघडले. त्याने त्यातून एक मुटकुळे करून बसवलेले, उभ्या कानांचे, पांढऱ्या तांबड्या रंगाचे कुत्रे बाहेर काढले. ते कोल्ह्यांची शिकार करणाऱ्या जातीचे कुत्रे होते.

मला तुझी पॅम्पेशी ओळख करून देऊ दे. तो स्थानिक जातीवंत कुत्रा असून शानदार आहे. त्याच्या शरीरावरून कळेल, की तो जास्त उडया मारणारा नाही, पण वासाने माग काढण्यात, फार हुशार आहे. ठीक आहे. पॅम्पे, तू फार जोरात धावणारा नसलास, तरी तू लंडनच्या मध्यमवयीन बऱ्याच लोकांपेक्षा जोरात पळणारा असशील, अशी मी अपेक्षा करतो. तेव्हा मी हा चामड्याचा तुकडा तुझ्या गळ्यातील पट्ट्याला बांधतो. आता चल. तू काय करू शकतोस, ते आम्हाला दाखव. त्याने त्या कुत्र्याला डॉक्टरांच्या दारात सोडले. कुत्र्याने क्षणभर वास घेतला आणि उद्दीपित होऊन, एक आरोळी ठोकून, तो रस्त्यावरून पळत सुटला. त्याच्या मागून धावतांना, आम्ही गावाबाहेर आलो आणि खेडेगावाच्या रस्त्याने जाऊ लागलो.

मी विचारले, "होम्स, तू काय केलेस?"

“मी डॉक्टरांच्या अंगणात चालून आलो. या प्रसंगाला बरोबर उपयोगी असे, शहाणपणाचे साधन, मी वापरणार आहे. मी टांग्याच्या मागील चाकाला उग्र दर्प असलेली बडीशेपांच्या अर्काने भरलेली सिरींज टोचली. आता हा कुत्रा त्याचा वास घेत घेत, इथून जॉन ओ ग्रोट्सपर्यंत जाईल. आपला मित्र आर्मस्ट्राँगला कुत्र्याला हाकलणे शक्य होणार नाही. त्याला त्याच्या मार्गाने जात रहावे लागेल. तो लबाड, हलकट! मला हुलकावणी देतो काय!” कुत्रा टांग्यामागे जात जात, अचानक मुख्य रस्त्यापासून एका गवताळ गल्लीत वळला. अर्धा मैल पुढे एक मोठा रस्ता लागला. मग तो मोठे वळण घेऊन, गावाच्या दिशेने गेला. तिथून तो गावाच्या दक्षिणेला गेला. तिथून सरळ जात राहिला. आम्हीही तसेच कुत्र्याच्या मागे मागे गेलो.

हा लांबलचक वळणाचा रस्ता पूर्णपणे आमच्या फायद्याचा होता. होम्स बोलला, “आता काय? मी गावकऱ्यांकडे केलेल्या चौकशा फुकट गेल्या, यात काही नवल नाही. डॉक्टर नक्की आपल्याला चकवत होता. अशा फसवणुकीचे कारण आपल्याला शोधून काढले पाहिजे. आपल्या उजवीकडे हे ट्रमपिंग्टन गाव दिसते आहे. आणि देवा रे! कोपऱ्यावरून टांगा येतो आहे. तो बहुधा परत चालला आहे. वॉटसन, घाई कर ---- पटपट. नाहीतर आपण गाळात जाऊ!”

त्याने गेटमधून शेतात उडी मारली. त्याच्यामागून पँम्पे ओढल्यासारखा गेला. आम्ही कुंपणाच्या आसऱ्यापाशी पोचतो न पोचतो, तोच टांगा तिथून निघून गेला. मला आत डॉ आर्मस्ट्राँग दिसला. त्याचे खांदे झुकलेले होते. डोके हातांमध्ये बुडालेले होते. तीच चिंताजनक आकृती. माझ्या मित्राच्या थंड चेहऱ्याकडे बघून मला समजले, की त्याने पण डॉ आर्मस्ट्राँगला पाहिले.

तो म्हणाला, “मला भीती वाटते की आपल्या या कृत्याचा शेवट वाईट रीत्या व्हायला नको. लवकरच आपल्याला कळेल. पॅम्पे, ये. शेतात ही बंगलीवजा झोपडी दिसते आहे.”

आता काही संशय नव्हता, की आम्ही आमच्या लक्ष्यापर्यंत पोचलो होतो. पॅम्पे उद्दीपित होऊन गेटच्या बाहेर धावत होता व ओरडत होता. तिथे टांग्याच्या चाकांच्या खुणा अजूनही दिसत होत्या. त्या सुनसान झोपडीकडे पायवाट गेली होती. होम्सने कुत्र्याला कुंपणाला बांधले. आम्ही पुढे गेलो. माझ्या मित्राने गंजलेले लहानसे दार वाजवले. पुन्हा वाजवले, पण काही उत्तर मिळाले नाही. तरीही झोपडी काही रिकामी नव्हती. आमच्या कानांवर बारीक आवाज पडत होता ---- काही अस्वस्थ असा बारीक दुःखी आणि निर्हेतुकपणे उदास असा आवाज येत होता. काय करावे हे न कळून, होम्स थांबला. त्याने मागे वळून आम्ही आलेल्या रस्त्याकडे पाहिले. त्यावरून टांगा येत होता. तेच करडे घोडे होते.

होम्स ओरडला, “अरे देवा! डॉक्टर परत इकडे येतो आहे. तो थांबला. तो येण्यापूर्वी, आपण हे काय प्रकरण आहे ते बघितले पाहिजे.”

त्याने झोपडीचे दार उघडले व आम्ही आत हॉलमध्ये शिरलो. आता तो आवाज, अधिक जोराने येऊ लागला. शेवटी एक मोठी करूण किंकाळी मारून, तो थांबला. तो वरून येत होता. होम्स वर घुसला. मी त्याच्या पाठोपाठ गेलो. एक अर्धवट लावलेले दार त्याने उघडले. आम्ही आतील दृष्य बघून जागच्या जागी खिळून गेलो.

एक तरुण, सुंदर बाई अंथरुणावर मरून पडली होती. तिचा चेहरा फिकट, शांत दिसत होता. मालवलेले सताड उघडे निळे डोळे, विस्कटलेल्या सोनेरी केसांमधून वर लागले होते. पलंगाच्या पायाशी अर्धवट बसलेला, अर्धवट गुडघ्यात वाकलेला, त्याचा चेहरा कपड्यात लपवलेला एक तरुण मनुष्य बसला होता. त्याची आकृती हुंदक्यांमध्ये धूसर झालेली दिसत होती. तो त्याच्या दुःखात इतका चूर होता, की होम्सचा हात त्याच्या खांद्यावर पडेपर्यंत, त्याने वर पाहिलेदेखील नाही.

“तुम्ही मिस्टर गॉडफ्रे स्टॅँन्टन आहात का?”

“हो. हो. मी तोच आहे. पण तुम्ही यायला फार उशीर केलात. ती मरण पावली आहे.”

तो मनुष्य इतका दिग्मूढ झाला होता की त्याला वाटत होते, आम्ही म्हणजे त्याने मदतीला बोलावलेले डॉक्टरच आहोत. होम्स काही सांत्वनपर शब्द बोलणार होता व त्याच्या अचानक नाहीसे होण्याने त्याच्या मित्रांना कसा धक्का बसला, ते सांगणार होता. तेव्हाच जिन्यात पदरव आला. पाठोपाठ डॉ आर्मस्ट्राँगचा जाड, गंभीर व प्रश्नार्थक चेहरा दारात अवतीर्ण झाला.

"तर, सभ्य गृहस्थहो, तुम्ही शेवटी तुमच्या शोधातील ती नाजूक घडी गाठ्लीत. मी मृत व्यक्तीसमोर काही बोलणार नाही. पण मी तुम्हाला सांगून ठेवतो, की मी तरुण असतो, तर तुमचे हे राक्षसी कृत्य तुम्हाला काही इजा न करता खपवून घेतले नसते."

माझा मित्र नम्रतेने म्हणाला, "डॉ आर्मस्ट्राँग, आम्हाला माफ करा. मला वाटते, आम्ही थोडे चुकीच्या वेळी आलो आहोत. जर तुम्ही आमच्याबरोबर खाली आलात, तर आम्ही या असमाधानकारक प्रकरणावर काही उजेड पाडू शकू."

एका मिनिटाने, तो थंड डॉक्टर व आम्ही खालच्या हॉलमध्ये होतो.

ते म्हणाले, "बोला, सर."

"माझी इच्छा आहे, तुम्ही पहिल्या प्रथम समजून घ्यावे की मला उमराव माउंट जेम्स यांनी नेमलेले नाही. या प्रकरणात त्यांना, माझी सहानुभूती मुळीच नाही. एखादा मनुष्य हरवतो, तेव्हा त्याचे नशीब काय आहे, हे बघणे माझे कर्तव्य आहे. आता ते केल्यावर, माझे काम संपले आहे. जोपर्यंत यात काही गुन्हा नाही, तोपर्यंत असली प्रकरणे जनतेत जाहीर होणे, मला आवडत नाही. मी कल्पना करतो त्याप्रमाणे, यात कायद्याचे उल्लंघन नसेल, तर तर निःशंकपणे गोष्टी खासगी ठेवल्या जातील व वर्तमानपत्रांपासून लांब रहातील, याबद्दल तुम्ही खात्री बाळगा."

डॉ आर्मस्ट्राँग पटकन पुढे आले व होम्सशी हातमिळवणी केली.

ते बोलले, "तुम्ही सद्गृहस्थ आहात. मी तुम्हाला नीट ओळखले नाही. मी देवाचे आभार मानतो की बिचाऱ्या स्टँन्टनला एकटे ठेवण्यातली माझी नैतिक बोच वा अपराधी वाटणे, यामुळे मी माझा टांगा इथे परत आणला. त्यामुळे, तुमची ओळख होण्यापासून वंचित होता होता बचावलो. तुम्हाला जेवढे माहिती आहे, तेवढेच मला माहिती असल्याने, परिस्थिती सहज स्पष्ट करता येईल. एक वर्षापूर्वी गॉडफ्रे स्टँन्टन लंडनमध्ये रहात होता. आणि त्याच्या घरमालकिणीच्या मुलीकडे ओढल्यासारखा आकर्षित झाला. तिच्याबरोबर त्याने लग्न केले. ती सुंदर होती, तितकीच बुद्धिमान व चांगली होती. कोणाही माणसाला, अशा बायकोची लाज वाटली नसती. पण गॉडफ्रे त्या हलकट म्हाताऱ्या उमरावाचा वारस होता. आणि हे नक्की होते, की या लग्नामुळे तो वारसाहक्क, संपुष्टात आला असता. मला तो मुलगा चांगला माहिती आहे. त्याच्या अनेक गुणांमुळे तो माझा लाडका होता. गोष्टी सरळ ठेवण्यासाठी माझ्याकडून होईल, तितकी मदत मी केली. आम्ही गोष्टी जगजाहीर होऊ नयेत म्हणून, खूप प्रयत्न केले. कारण अशा गोष्टी एकदा फुटल्या, की त्या वेगाने सर्वदूर पसरतात. या ओसाड भागातील घराचे, मी आभार मानतो. त्यामुळे गॉडफ्रे अजूनपर्यंत बचावलेला आहे. त्याचे गुपित मी व एक चांगला नोकर सोडून, कुणालाच माहिती नव्हते. तो नोकर आता मदत मिळवण्यासाठी, ट्रमपिंग्टनला गेलेला आहे. पण शेवटी गॉडफ्रेच्या बायकोच्या धोकादायक आजारपणाचा मोठा धक्का त्याला बसला. तो फार भयानक आजार होता. तो बिचारा मुलगा दुःखाने गांजून गेला. तरीही त्याला लंडनला जाऊन, सामना खेळायचा होता. कारण स्पष्टीकरण दिल्याशिवाय, न खेळायचे कारण सांगता आले नसते व मग त्याचे गुपित फुटले असते. मी तारेने त्याला धीर द्यायचा प्रयत्न केला. त्याने मला उत्तरादाखल एक तार पाठवली व मला जमेल तेवढी मदत करायला सांगितले. हीच ती तार, जी कशी काय माहिती नाही, पण तुम्हाला वाचायला मिळाली. मी त्याला हे सांगितले नाही, की त्याच्या बायकोचे किती थोडे जगणे उरल्याचा धोका आहे. कारण तो त्या बाबतीत काही करू शकत नव्हता. पण मी खरी गोष्ट त्या मुलीच्या वडिलांना सांगितली. त्यानी ती वेड्यासारखी गॉडफ्रेला सांगितली. त्यामुळे तो अनावर दुःखाने सरळ निघून आला व सतत

तिच्या उशापायथ्याशी बसून राहिला. तिच्या अंथरुणाच्या कोपऱ्यात गुडघे पोटाशी घेऊन शोक करत राहिला. शेवटी आज सकाळी तिच्या यातना देवाने संपवल्या. मिस्टर होम्स, असे हे सर्व झाले. मी तुमच्या आणि तुमच्या मित्राच्या वचनभंग न करण्याच्या शब्दावर अवलंबून आहे."

होम्सने डॉक्टरांचा हात घट्ट दाबला.

तो म्हणाला, "चल, वॉटसन." आणि आम्ही हिवाळ्यातील त्या मावळत्या सूर्यप्रकाशात, त्या दुःखी घरातून बाहेर पडलो.

## The Adventure Of Six Napoleons

## सहा नेपोलीयन्सचे साहस



स्कॉटलंड यार्डच्या मिस्टर लेस्ट्रेडसाठी, आम्हाला एखाद्या संध्याकाळी भेट देणे, ही काही नेहमीपेक्षा वेगळी गोष्ट नव्हती. शेरलॉक होम्स त्याचे स्वागत करे.

कारण त्यामुळे त्याला पोलिसांचे सध्या काय चालले आहे, हे समजत असे. लेस्ट्रेड

जी बातमी सांगत असे त्याबद्दल, तो सध्या काम करत असलेल्या केसबद्दल, ऐकायला होम्सला नेहमीच आवडत असे. जरी केसमध्ये प्रत्यक्ष लुडबूड केली नाही, तरी त्याच्या प्रदीर्घ ज्ञान व अनुभवातून तो लेस्ट्रेडला प्रसंगापरत्वे काही सूचना किंवा प्रस्ताव देत असे.

आजच्या विशेष संध्याकाळी, लेस्ट्रेड हवापाण्याबद्दल व वर्तमानपत्राबद्दल बोलत होता. विचारपूर्वक सिगरेटचा धूर सोडत, मग तो गप्प झाला. होम्सने त्याच्याकडे उत्सुकतेने पाहीले व विचारले,

"सध्या तुझ्या हातात काही उल्लेखनीय काम आहे का?"

"नाही, मिस्टर होम्स ---- विशेष असे काही नाही."

"पण मला त्याबद्दल सांग."

लेस्ट्रेड हसला.

"असे बघा, मिस्टर होम्स, माझ्या मनात काही आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. तरीही ती तशी अप्रस्तुत गोष्ट आहे. मला कळत नाही, की ती तुम्हाला सांगावी की नाही. ती तशी फालतू असली तरीही विचित्र असल्याने, ती सांगून तुम्हाला त्रास द्यावा की नाही, ते मला समजत नाही. पण अशा वेगळ्या विचित्र गोष्टींबद्दल, तुम्हाला आत्मीयता असल्याचे, मला माहिती आहे. पण माझ्या मते, ती आपल्यापेक्षा जास्त डॉ वॉटसनच्या, अखत्यारीत येते."

मी म्हणालो, "एखादा रोग?'

"वेडेपणा. विचित्र वेडेपणा. आजच्या काळात नेपोलिअनबद्दल इतका पराकोटीचा द्वेष असण्याची, कल्पना करता येत नाही. त्याची प्रतिमा कुठेही पाहिल्यास, तो ती मोडून टाकतो."

होम्स मागे होऊन, त्याच्या खुर्चीत बुडाला.

तो बोलला, "हे काही माझे काम नाही."

"बरोबर. मी तेच म्हणतो. पण जेव्हा तो माणूस, त्याचे नसलेले नेपोलिअनचे फोटो व चित्रे तोडण्यासाठी चोरी करतो, तेव्हा त्याला डॉक्टरपेक्षा पोलिसांकडे सोपवण्याची वेळ येते."

होम्स ताठ बसला.

“चोरी! हे जास्त रुचीपूर्ण आहे. मला त्याबद्दल अजून ऐकायला आवडेल.”

लेस्ट्रेडने त्याची कामाची डायरी बाहेर काढली आणि पाने उलटून त्या केसबद्दल आठवू लागला.

तो म्हणाला, “पहीली केस चार दिवसापूर्वी दाखल झाली. केनिंग्टन रस्त्यावरील चित्रे व पुतळे विकणाऱ्या दुकानाचा मालक मोर्स हडसन, याने ती केली होती. त्याचा मदतनीस क्षणभर दुकानाबाहेर गेला होता. तेव्हा त्याला काही फुटल्याचा आवाज आल्यामुळे, तो परत आला आणि बघतो तर, काऊंटरवरील अनेक कलाकुसरीच्या वस्तूंबरोबर ठेवलेल्या नेपोलिअनच्या अर्धपुतळयाचे फुटून तुकडेतुकडे झाले होते. तो रस्त्यावर धावला. तेव्हा बऱ्याच लोकांनी सांगितले, की त्यांना एक माणूस पळत, दुकानातून बाहेर पडतांना पाहिल्यासारखे वाटले. पण त्या हलकटाला कोणी नीट पाहीले नाही व कोणी त्याला आता ओळखूदेखील शकणार नाही. तरुण निर्ढावलेल्या दंगलखोरांकडून सतत होणाऱ्या कृत्यांपैकीच ते एक असावे. त्यावेळी तिथे कर्तव्य बजावणाऱ्या कॉन्स्टेबलच्या कानावर ते घातले गेले. तो प्लॅस्टरचा पुतळा काही शिलिंगचा असल्यामुळे, तो एक पोरखेळ समजून, सोडून देण्यात आला.

पण दुसरी केस जास्त गंभीर होती. आणि विचित्रही होती. ती काल रात्रीच झाली.

केनिंग्टन रस्त्यावरील मोर्स हडसनच्या दुकानापासून काही शे यार्डांवर, एक प्रसिद्ध डॉक्टर बार्निकोट रहातो. थेम्सच्या दक्षिणेकडे त्याचा दवाखाना जोरात चालतो. त्याचे घर व सल्ला देण्याचा मुख्य दवाखाना केनिंग्टन रस्त्यावर आहे. तिथून दोन मैलांवर ब्रिक्स्टन रस्त्याच्या खालील बाजूस, त्याची शस्त्रक्रिया करण्याची शाखा व अजून एक दवाखाना आहे. हा डॉक्टर बार्निकोट नेपोलिअनचा फारच चाहता असून, त्याचे घर त्या फ्रेंच सम्राटाच्या पुस्तकांनी, चित्रांनी व त्याच्याविषयीच्या आठवणींच्या वस्तूंनी खचाखच भरलेले आहे. काही काळापूर्वी त्याने मोर्स हडसनकडून एका फ्रेंच शिल्पकाराने बनवलेले, नेपोलीअनचे दोन सुंदर अर्धपुतळे खरेदी केले. त्यातील एक त्याने केनिंग्टन रस्त्यावरील घराच्या हॉलमध्ये ठेवला आणि

दुसरा ब्रिक्स्टन रस्त्यावरील शस्त्रक्रिया करण्याच्या ठिकाणच्या शेकोटीवरील कट्ट्यावर ठेवला. जेव्हा आज सकाळी डॉक्टर बार्निकोट घरी आले, तेव्हा त्यांना घरात रात्री चोरी झाल्याचे आढळून आले. पण हॉलमधील नेपोलिअनचा पुतळा सोडून, काहीही चोरीला गेलेले आढळले नाही. तो पुतळा बाहेर काढून बागेच्या भिंतीवर आपटून रानटीपणे फोडण्यात आला होता. खाली त्याचे तुकडे विखुरलेले आढळले.

होम्सने त्याचे हात चोळले.

तो म्हणाला, “हे नक्कीच काही आगळेवेगळे आहे.”

“मला वाटलेच, की हे ऐकून तुम्ही खूष व्हाल. पण अजून मी शेवटाकडे आलो नाही. डॉक्टर बार्निकोट जेव्हा दुपारी बारा वाजता ब्रिक्स्टन रस्त्यावरील शस्त्रक्रिया करण्याच्या ठिकाणी आले, तेव्हा रात्री खिडकी उघडी असून दुसऱ्या पुतळ्याचे तुकडे खोलीभर विखुरलेले दिसले. त्याचा पार भुगाच करण्यात आला होता. दोन्ही केसेसमध्ये पुरावा म्हणून गुन्हेगाराच्या किंवा खोडी काढलेल्या वेड्याच्या काही खुणा सापडल्या नाहीत. मिस्टर होम्स, कायकाय झाले ते तुम्हाला कळले का?”

होम्स बोलला, “हा विनोद वाटत नाही. काही विचित्र प्रकार वाटतो. जे दोन पुतळे तोडले गेले, ते मोर्स हडसनच्या दुकानातील पुतळ्यांची हुबेहूब प्रतिकृती असलेले होते का?”

“ते एकाच साच्यातून बनवले गेले होते.”

“ही बाब हे स्पष्ट करते, की ही तोडफोड करणारा माणूस नेपोलिअन विषयीच्या द्वेषाने प्रभावित झालेला आहे. लंडनमध्ये या थोर सम्राटाचे कितीतरी पुतळे असतील. परंतु या तीन पुतळ्यांची तोडफोड योगायोगाने न होता, या सर्व पुतळ्यांचा नाश करण्याची सुरवात म्हणून त्या मूर्तीभंजकाने केली असेल, असे समजणे जरा जास्तच होईल.”

लेस्ट्रेड म्हणाला, “मलाही तुमच्यासारखेच वाटते. तर दुसरीकडे असे वाटते, की मोर्स हडसन हा लंडनमधील पुतळ्यांचा विक्रेता आहे आणि हे तीन पुतळे त्याच्या दुकानात खूप वर्षांपासून होते. आणि जरी तुम्ही म्हणता, तसे शेकडो पुतळे लंडनमध्ये असले, तरी हे शक्य आहे, की एवढे तीनच पुतळे या भागात होते. त्यामुळे स्थानिक वेड्याने त्यापासून सुरवात केली असेल. डॉ वॉटसन, तुम्हाला काय वाटते?”

मी उत्तरलो, “अशा एकारलेल्या वर्तनाला काही मर्यादा नाहीत. आधुनिक फ्रेंच मानसशास्त्रज्ञांनी याला IDEE FIXE असे नाव दिले आहे. हे लोक थोडे अशातशा चारित्र्याचे असतात. आणि इतर सर्व बाबतीत, अगदी शुद्ध व साधे असतात. ज्याने खोलात जाऊन नेपोलिअनबद्दल वाचले आहे किंवा ज्यांना पूर्वजांकडून वारशाने युद्धातील काही जखमा मिळाल्या आहेत, त्यांना IDEE FIXE प्रकारचा रोग होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या वेडाचा अशा प्रकारे उद्रेक होऊ शकतो.”

होम्स मान हलवत म्हणाला, “वॉटसन, असे चालणार नाही. IDEE FIXE मुळे, एकारलेल्या वेडेपणामुळे असले पुतळे कुठे आहेत, हे समजणार नाही.”

“मग तू याचे स्पष्टीकरण कसे देतोस?”

“मी तसा प्रयत्न करत नाही. मी फक्त त्या माणसाच्या बाबतीत, अशाअशा पद्धतींचे विचित्र वर्तनबदल आढळून येत असल्याचे, सांगतो आहे. उदाहरणार्थ, डॉक्टर बार्निकोट यांच्या हॉलमध्ये आवाजाने कुटुंबातील लोक जागे होतील, म्हणून वस्तू आधी अखंड बाहेर नेली व मग फोडली, असे असू शकेल. तर ब्रिक्स्टन रस्त्यावर, जिथे जास्त आरडाओरडा होण्याची शक्यता नाही, तो तिथेच फोडला गेला. हे प्रकरण असंबद्धपणे नगण्य वाटते. तरीही काहीच नगण्य नसते, असे मी म्हणू शकतो, कारण माझ्या काही अद्वितीय केसेसची सुरवात, अशाच पद्धतीने झालेली होती. वॉटसन, तुला आठवत असेल की ॲबेर्नट्टी कुटुंबातील भयानक गोष्टीची सुरवात एका गरम दिवशी, पार्स्ले लोण्यात पडल्याच्या साध्या प्रकाराने कशी झाली.

त्यामुळे तीन पुतळे मोडल्याची घटना, मी हसण्यावारी नेऊ शकत नाही. लेस्ट्रेड, अशा विचित्र घटनांनंतर या प्रकरणात काय घडले, हे तू माझ्या कानावर घातलेस, तर बरे होईल.

माझ्या मित्राने विचारलेला प्रकार, त्याने कल्पना केली नसेल इतक्या दुःखद पद्धतीने व फार लवकर सामोरा आला. दुसऱ्या दिवशी सकाळी मी अजून माझ्या झोपायच्या खोलीत कपडे करत होतो, तेव्हा दारावर टकटक झाली. त्याच्या हातात एक तार घेऊन, होम्स आला. त्याने ती मोठ्याने वाचलीः

ताबडतोब या, १३१, पिट्ट रस्ता, केनिंग्टन.

"लेस्ट्रेड"

मी विचारले, "मग आता काय?"

"माहिती नाही ---- काहीही असेल. मला वाटते पुतळ्याच्या गोष्टीत, पुढे काही घडले असावे. तसे असेल तर आपल्या मूर्तीभंजक मित्राने, लंडनच्या दुसऱ्या भागात त्याची कारवाई सुरु केलेली दिसते. वॉटसन, टेबलावर कॉफी आहे आणि दाराशी टांगा उभा आहे."

अर्ध्या तासात आम्ही पिट्ट रस्त्यावर होतो. लंडनमधील, शेजारी एक लहानसे तळे असलेला वाहत्या, गजबजलेला रस्त्यावरील एका गल्लीत, १३१ नंबरचे रोमांचक वाटत नसलेले बुटकेसे घर होते. आम्ही पुढे गेल्यावर, त्या घरासमोर बऱ्याच उत्सुक लोकांची गर्दी दिसली. होम्सने शिट्टी वाजवली.

"अरे देवा! इथे निदान खून करायचा प्रयत्न झालेला दिसतो. लंडनच्या बातम्या देणाऱ्या मुलाला खिळवून ठेवेल, असे काही झालेले दिसते आहे. त्या माणसाच्या गोल खांद्यांवरून व बाहेर आलेल्या मानेवरून काही रक्तपाती कृत्य झाल्याचे वाटते आहे. वॉटसन, हे काय आहे? वरच्या पायऱ्या ओल्या आहेत व बाकीच्या कोरड्या आहेत. अरेच्चा, पुढच्या खिडकीशी लेस्ट्रेड दिसतो आहे. काय झाले, ते लवकरच आपल्याला कळेल.

तेथील पोलीसांनी आम्हाला बघून, हॉलमध्ये नेले. तिथे रागावलेला, खूप गबाळा, वयस्क, फ्लॅनेलचा गाऊन घातलेला मनुष्य, वरखाली करत होता. घराचा मालक म्हणून मध्यवर्ती सिंडीकेट प्रेसचा मिस्टर होरास हर्कर, याची आमच्याशी ओळख करून देण्यात आली.

लेस्ट्रेड म्हणाला, "पुन्हा नेपोलिअनबद्दल. मिस्टर होम्स, काल रात्री तुम्ही त्या बाबतीत रस दाखवलात, त्यामुळे तुम्ही इथे हजर असलेले बरे, म्हणून मी तुम्हाला बोलावून घेतले. हे प्रकरण आता धारदार वळण घेऊ लागले आहे."

"काय घडले आहे?"

"खून. मिस्टर हर्कर, काय झाले, ते तुम्ही या सद्गृहस्थांना सांगाल का?" उतरलेल्या चेहऱ्याने तो गाऊन घातलेला माणूस, आमच्याकडे वळला.

तो बोलला, "हे चमत्कारिकच झाले. आयुष्यभर मी दुसऱ्या लोकांकडून बातम्या गोळा केल्या. पण आज माझ्याकडेच बातमी आहे. मी इतका गोंधळून जाऊन त्रासलो आहे, की मला धड काही बोलता येत नाही आहे. मी इथे पत्रकार म्हणून आलेलो असतो, तर मी माझी मुलाखत घेतली असती आणि संध्याकाळच्या प्रत्येक वर्तमानपत्रात दोन स्तंभ लिहिले गेले असते. पण आता मी निरनिराळ्या लोकांना पुन्हापुन्हा, माझी मूल्यवान गोष्ट सांगतो आहे. तरीही मिस्टर शेरलॉक होम्स, मी तुमचे नाव ऐकले आहे आणि तुम्ही हा विचित्र उद्योग जरा स्पष्ट केलात, तर मग मी माझी गोष्ट सांगायचा जो त्रास घेतो आहे, तो वसूल होईल."

होम्स खाली बसून, ऐकू लागला.

"सुमारे चार महिन्यांपूर्वी मी या खोलीसाठी आणलेल्या नेपोलीअनच्या पुतळ्याभोवती, हे सर्व फिरते. हाय स्टेशन रस्त्यापासून जवळच असलेल्या हार्डिंग ब्रदर्स यांच्याकडून, मी तो स्वस्तात आणला. मी पत्रकार म्हणून बरेच काम रात्री करत असतो आणि पहाटेपर्यंत लिहित असतो. तर आजच्या दिवशी घराच्या वरील बाजूस, मागे असलेल्या माझ्या खोलीत बसून, मी

साधारण तीन वाजता खाली काही आवाज ऐकले. ते आवाज परत न आल्याने, मी ते बाहेरून ऐकल्याची खात्री केली. नंतर अचानक पाच मिनिटांनी, मला मोठी किंकाळी ऐकू आली ---- मिस्टर होम्स, तो मोठा भयानक आवाज होता. मी जिवंत असेपर्यंत तो माझ्या कानात घुमत राहील. मी दोन मिनिटे भीतीने गोठून गेलो. नंतर मी धातूची काठी हातात घेऊन, खाली गेलो. जेव्हा मी या खोलीत शिरलो, तेव्हा खिडकी सताड उघडी होती. आणि ताबडतोब मला दिसले, की शेकोटीच्या कट्ट्यावरील नेपोलिअनचा पुतळा नाहीसा झालेला आहे. एखाद्या चोराने अशी वस्तू का चोरावी, हे मला कळण्यापलीकडील होते. कारण ती तर फक्त प्लॅस्टरची होती आणि फार किंमती नव्हती.

तुमच्या लक्षात येईल, की उघड्या खिडकीतून बाहेर जाणारा कुणीही मोठी फेरी मारून पुढच्या दाराशी येऊ शकतो. तेच त्या चोराने केले. त्यामुळे मी फेरी मारून दार उघडले. काळोखात बाहेर पाऊल ठेऊन, तिथे आडव्या पसरलेल्या एका मृत माणसावर मी जवळजवळ पडलो. मी उजेडासाठी मागे फिरलो आणि तिथे तो बिचारा माणूस होता. त्याच्या घशाशी मोठी जखम होती आणि जिकडेतिकडे रक्तच रक्त पसरले होते. तो पाठीवर उताणा पडला होता. गुडघे वर होते आणि तोंड भयानक रीत्या आ वासलेले होते. मला तो स्वप्नातही दिसतो. मला जेमतेम पोलिसांसाठी शिट्टी वाजवायला वेळ मिळाला आणि मग मी बहुधा चक्कर येऊन पडलो. कारण नंतर हॉलमध्ये माझ्याशेजारी, पोलीस उभा असलेला मी पाहीला."

होम्सने विचारले, "खून झालेला माणूस कोण होता?"

लेस्ट्रेड म्हणाला, "तो कोण होता, ते कळायला काही मार्ग नव्हता. तुम्हाला शवागारात प्रेत बघता येईल. अजून आम्ही त्याचे काही केले नाही. तो उंच, सूर्याने भाजल्याच्या खुणा असलेला, शक्तीमान व तिशीच्या आतीला इसम आहे. त्याचे कपडे गरीबीचे आहेत. पण तो कामगार वाटत नाही. त्याच्याशेजारील रक्ताच्या थारोळ्यात, शिंगाची पकड असलेला सुरा

पडला होता. खून ज्याने केला गेला, ते ते शस्त्र होते की तो मेलेल्या माणसाचा होता, ते माहिती नाही. त्याच्या कपड्यांवर नाव नव्हते. खिशात एक सफरचंद, काही दोरे, एक शिलिंगचा लंडनचा नकाशा व एक फोटो होता. हा बघा तो फोटो."

तो नक्की एखाद्या लहानशा कॅमेऱ्याने घेतला गेला असावा. तो एका चलाख, ठळक नाकडोळे असलेला, माकडासारखा माणूस वाटत होता. त्याच्या भुवया जाड होत्या आणि जबड्याचा खालील भाग, एखाद्या बबूनसारखा पुढे आलेला होता.

त्या फोटोचे नीट निरीक्षण केल्यावर, होम्सने विचारले, "पुतळ्याचे काय झाले?

"तुम्ही येण्यापूर्वीच आम्हाला असे समजले, की कॅँप्डेन घर रस्त्यावरील रिकाम्या घरापुढील बागेत फोडून तुकडे केलेला पुतळा सापडला. मी आता तिथे जातो आहे. तुम्हाला यायचे असेल तर चला."

"नक्कीच. मलाही तिथे एक चक्कर मारली पाहीजे." होम्सने खिडकी व गालीच्याची तपासणी केली. तो म्हणाला, "त्या माणसाचे पाय खूप लांब असले पाहिजेत किंवा तो फार चपळ असला पाहीजे. भिंतीतील अरुंद जागेतून खिडकीशी जाणे व ती उघडणे सोपे नाही. तुलनात्मक दृष्ट्या, परत येणे सोपे आहे. मिस्टर हर्कर, तुम्ही पुतळ्याचे अवशेष बघण्यासाठी, आमच्याबरोबर येत आहात का?"

तो दुःखी पत्रकार एका लिहिण्याच्या टेबलापाशी बसला होता.

तो बोलला, "जरी साद्यंत बातमी देणारा संध्याकाळच्या वर्तमानपत्राचा अंक आधीच निघाला असेल, तरी मला त्या तुकड्यांचे काही करायचा प्रयत्न केला पाहीजे. हे माझ्या नशीबासारखे आहे. मी डोनकॅस्टरला पडलो, ते तुम्हाला आठवते का? मी त्या घटनेबद्दल लिहायला, फारच घाबरलो होतो. त्यामुळे फक्त माझ्याच वर्तमानपत्रात, त्याबद्दलची बातमी

नव्हती. आणि आता लिहायचे म्हणजे माझ्या दाराशी खून झाल्याला, फार उशीर झालेला आहे.”

आम्ही खोली सोडली, तेव्हा त्याची लेखणी कागदावर झरझर चालत होती.

जिथे पुतळ्याचा चुरा करण्यात आला, ती जागा इथून फक्त काही शे यार्ड अंतरावर होती. कुणा अज्ञाताच्या मनात त्या थोर सम्राटाबद्दल इतके पराकोटीचे नुकसान करणारा वेडा द्वेष असल्याचे पुरावे, आम्ही आमच्या डोळ्यांनी प्रथमच पहात होतो. तो पुतळा गवतावर बारीक तुकडे होऊन मोडून पडला होता. होम्सने त्यातील बरेचसे उचलले व काळजीपूर्वक तपासले. त्याच्या हेतूपूर्ण चेहऱ्यावरून व पद्धतीवरून माझी खात्री झाली, की त्याला काही सुगावा सापडला आहे.

लेस्ट्रेडने विचारले, “कसे काय?’

होम्सने खांदे उडवले.

तो म्हणाला, “अजून आपल्याला खूप प्रयत्न करावे लागतील. आणि तरीही ---- तरीही ---- ठीक आहे. काही बाबी आपल्याला, कृती करण्यासाठी सुचवत आहेत. या विचित्र गुन्हेगाराच्या दृष्टीने, या क्षुल्लक पुतळ्याची किंमत मानवाच्या आयुष्याच्या किमतीपेक्षा जास्त होती. हा एक मुद्दा. नंतर एक विचित्र बाब अशी, की जर तो फोडणे हे त्याचे एकमेव उद्दिष्ट होते, तरी त्याने तो घरात किंवा घराबाहेर लगेच फोडला नाही.”

“तो या दुसऱ्या माणसाला भेटून फारच चिडला. तो काय करतो आहे, याची काही जाणीव त्याला उरली नाही.”

“हो. असे झाले असेल. पण मला विशेष करून तुमचे लक्ष, या ज्याच्या बागेत पुतळा फोडला गेला, त्या घराच्या जागेकडे वळवायचे आहे.”

“हो, पण ते रिकामे घर होते. त्यामुळे बागेत त्याची दखल घेणारे कोणी नसेल, अशी त्याची खात्री होती.”

“पण या रस्त्यावर थोडे पुढे अजून एक रिकामे घर आहे. इथे येण्यापूर्वी तो नक्की त्या घरावरून आला असणार. मग त्याने तो तिथे नेऊन का फोडला नाही? त्यावरून हे नक्की आहे की प्रत्येक यार्डावर, त्याला कुणीतरी बघण्याचा धोका वाढला असता का?”

लेस्ट्रेड म्हणाला, “मी तर हात टेकले.”

“होम्सने आमच्या डोक्यावरील रस्त्यावरील दिव्याकडे, निर्देश केला.

“तो काय करत आहे, हे त्याला इथे नीट दिसले असते. तिथे नाही. तेच कारण असावे.”

“अरे देवा, ते खरे आहे. आता मी असा विचार करू शकतो आहे, की डॉक्टर बार्निकोट यांच्याकडील पुतळा, लाल दिव्यापासून जवळच फोडला गेला. मिस्टर होम्स, याबाबतीत आपण काय करू शकतो?”

“ते लक्षात रहाण्यासाठी ---- आपल्या यादीत घालायला हवे. पुढे आपल्याला जे काही आढळून येईल, त्याचा या गोष्टीशी संबंध असू शकेल. लेस्ट्रेड, आता तू कसेकसे पुढे जायचे ठरवले आहेस?”

माझ्या मते पुढे जाण्याचा सर्वात व्यवहार्य मार्ग, म्हणजे मृत मनुष्याची ओळख पटवणे. त्यात काही अडचण नसावी. तो कोण आहे व त्याचे साथीदार कोण आहेत हे एकदा समजले, की तो काल रात्री पिट्ट रस्त्यावर काय करत होता, त्याला कोण भेटले व कोणी त्याला मिस्टर होरास हर्करच्या दारात मारले, या सर्वाचा छडा लागेल. असे तुम्हाला वाटत नाही का?”

“असे करावे यात काही संशय नाही. पण माझा या केसकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे.”

“तुम्ही काय कराल?’

“ओहो, तुझ्या विचारांवर माझा प्रभाव पाडायला लाऊ नकोस. मी असे सुचवेन, की तू तुझ्या मार्गाने जा व मी माझ्या. आपण आपले मुद्दे नंतर चर्चेला आणू शकतो. त्यामुळे दोघांचाही फायदा होईल.”

लेस्ट्रेड बोलला, “ठीक आहे.”

“जर तू पिट्ट रस्त्यावर परत जात असशील, तर तुला कदाचित मिस्टर होरास हर्कर भेटतील. माझ्यासाठी त्यांना असे सांग, की मी ठामपणे असे ठरवले आहे की नेपोलिअनबद्दल कमालीचा द्वेष असणारा कुणी धोकादायक वेडा, काल त्यांच्या घरात शिरला होता. ते त्यांच्या लेखनाला उपयोगी पडेल.”

लेस्ट्रेडने निरखून पाहीले.

“तुम्हाला गंभीरपणे तसे वाटत नाही का?”

होम्स हसला.

“मला वाटत नाही? असे बघ, कदाचित नाही. पण माझी खात्री आहे, की त्यामुळे मिस्टर होरास हर्कर यांची व ते काम करत असलेल्या वर्तमानपत्र वाचणाऱ्यांची रुची वाढेल. वॉटसन, आता मला वाटते आपल्यासमोर दिवसभराचे गुंतागुंतीचे काम पडले आहे. लेस्ट्रेड, तू आम्हाला बेकर रस्त्याला संध्याकाळी सहा वाजता भेटलास, तर बरे होईल. तोपर्यंत हा मृत माणसाच्या खिशात सापडलेला फोटो, मी माझ्याजवळ ठेवतो. जर माझी तर्कसाखळी बरोबर ठरली, तर आज रात्रीच्या माझ्या एका लहानशा मोहीमेत कदाचित मी तुला, मला मदत करण्यासाठी सांगेन. तोपर्यंत अच्छा.”

शेरलॉक होम्स व मी बरोबर हाय रस्त्याला गेलो. जिथून पुतळा खरेदी केला गेला होता, त्या हार्डींग बंधूंच्या दुकानाशी आम्ही थांबलो. एका तरुण मदतनीसाने आम्हाला सांगितले की

मिस्टर हार्डींग दुपारपर्यंत येणार नाहीत. तो नवीन असल्याने, आम्हला अजून काही सांगू शकला नाही. होम्सच्या चेहऱ्यावर त्याची निराशा व राग दिसत होता.

शेवटी तो म्हणाला, "ठीक आहे. वॉटसन, सर्व गोष्ट आपल्या मनाप्रमाणे होतील, असे नाही. आपण दुपारी परत आले पाहीजे. त्या पुतळ्याच्या उल्लेखनीय नशीबासाठी, नक्की काय घडले त्याचा आपण मुळापासून शोध घ्यावा, असे मला वाटते. हे तुला समजले असेल, अशी मला आशा आहे. आता आपण केनिंग्टन रस्त्यावर मिस्टर मोर्स हडसन यांना भेटू व ते या प्रकरणावर काही उजेड पाडू शकतात का, ते बघू."

एक तासाच्या टांग्याचा प्रवासाने आम्हाला ते चित्रे व पुतळे विकणाऱ्याच्या दुकानाकडे आणले. तो एक लाल चेहऱ्याचा दणकट, बुटका व तिखट प्रवृत्तीचा इसम होता.

तो बोलला, "माझ्या कॉउंटरवर या. कोणीही धटिंगण आत शिरून सरळ मालाची वाट लावतो, तर मग आम्ही कर कशासाठी भरतो बरं? हो सर, मीच डॉक्टर बार्निकोटना ते दोन पुतळे विकले. मला तर इतका धक्का बसला आहे, की झालेला प्रकार खराच वाटत नाही. नीतीमत्तेची चाड नसलेले कृत्य ---- असेच मला वाटते. गुंड सोडून कोणीच असले पुतळे फोडायचे काम करू धजणार नाही. लाल क्मुनिस्ट लोक ---- असेच मी त्यांना म्हणतो. मी कुणाकडून ते घेतले? मला कळत नाही, त्याचा यात काय संबंध आहे? पण जर खरेच तुम्हाला ते हवे असेल, तर चर्च रस्त्यावरील गेल्डर आणि कंपनीकडून. गेले वीस वर्षे ते व्यापारातील उत्तम नाव आहे. मी किती आणले? तीन. दोन डॉक्टर बार्निकोटना विकले आणि एक माझ्या काउंटरवर दिवसाढवळया फोडला गेला. फोटोतील व्यक्ती मला माहिती आहे का? नाही. पण एक मिनिट, बरोबर. हा बेप्पो आहे. तो इटालियन पद्धतीचे काम करणारा कारागीर होता. तो माझ्या दुकानासाठी उपयोगी होता. तो थोडेफार कोरीवकाम करू शके, फोटोची चौकट तयार करे आणि इतर काही कामे करे. तो मागील आठवड्यात, मला भेटला होता. आणि त्यानंतर मात्र नाही. तो कुठून आला व कुठे गेला, ते काहीच मला माहिती नाही. तो इथे काम

करे, तेव्हा माझी त्याच्याबद्दल काही तक्रार नव्हती. तो पुतळा फोडला जाण्यापूर्वी, दोन दिवस आधी तो गेला.”

आम्ही दुकानातून बाहेर पडताना होम्स म्हणाला, “तर मोर्स हडसनकडून एवढीच अपेक्षा होती. बेप्पो हा केनिंग्टन व केन्सिग्टन दोन्हीकडे दिसतो आहे. ते अंतर दहा मैल आहे. वॉटसन, आता आपण चर्च रस्त्यावरील पुतळे विकणाऱ्या मूळ गेल्डर आणि कंपनीकडे जाऊ. तिथे आपल्याला काही उपयुक्त माहिती मिळाली, तर मला नवल वाटणार नाही. आम्ही लंडनच्या चमकदार फॅशनेबल भागातून जलद गतीने गेलो. ते हॉटेलांचे, सिनेमागृहाचे, व्यापाराचे, साहित्याचे व शेवटी चैनीचे लंडन होते. आम्ही तिथून दाटीवाटीच्या, उग्र दर्प असलेल्या, नदीकिनारी वसलेल्या घरांच्या भागात आलो. तो युरोपचा त्याज्य भाग होता. एके काळी शहरातील श्रीमंत व्यापाऱ्याचे घर असलेल्या भागातून, मोठी वाट गेली होती. तिथे आम्हाला आम्ही शोधत असलेले, पुतळे बनवायचे काम चाललेले दिसले. बाहेरील बाजूला मोकळ्या मैदानात महत्वाचे अर्धवट केलेले काम पडले होते. आतील मोठ्या खोलीत पन्नास शिल्पकार, कोरीवकाम वा साच्याचे काम करत बसले होते. मोठा सोनेरी केसांचा जर्मन माणूस, व्यवस्थापक होता. त्याने आमचे स्वागत केले व होम्सच्या सर्व प्रश्नांना नीट उत्तरे दिली. त्याच्या पुस्तकांमधील संदर्भावरून असे समजले की नेपोलिअनच्या सुंदर संगमरवरी डोक्यांचे शेकडो साचे बनवले गेले. पण एका वर्षात मोर्स हडसनला विकले गेलेले तीन पुतळे हे सहाच्या गठ्ठ्यातील तीन होते. त्यातले इतर तीन केन्सिग्टनच्या हार्डिंग ब्रदर्स यांच्याकडे पाठवले गेले. हे सहा पुतळे इतर सर्व पुतळ्यांपेक्षा वेगळे असायचे काही कारण नव्हते. हे पुतळे फोडायचे काय कारण असेल, याचा काही अंदाज तो करू शकला नाही. खरे तर तो अशा प्रश्नाला हसला. त्यांची होलसेलची किंमत सहा शिलिंग होती पण किरकोळीने विकणाऱ्या दुकानदाराला बारा किंवा त्याहून जास्त मिळाले असतील. चेहऱ्याच्या अर्ध्या भागाचा एक, असे दोन साचे असल्यामुळे, प्लॅस्टर ऑफ पॅरीसचे दोन भाग बनवून मग ते जोडले जात व अशा तऱ्हेने एक अर्धपुतळा बने. हे काम सहसा इटालिअन लोकांकडून, आम्ही ज्या खोलीत होतो, तिथे केले

जात असे. काम पूर्ण झाले की ते पुतळे पॅसेजमध्ये एका टेबलावर ठेवले जात. आणि मग साठवले जात. एवढे तो आम्हाला सांगू शकला.

पण फोटो दाखवल्यामुळे, त्या व्यवस्थापकावर बराच परिणाम झाला. त्याच्या चेहऱ्यावर राग दिसू लागला. त्याच्या निळ्या जर्मन डोळ्यांवरील भुवया आक्रसल्या.

तो ओरडला, "तो हलकट! हो. मी त्याला चांगलेच ओळखतो. ही सभ्य लोकांची वस्ती आहे. केवळ याच्यामुळे, इथे कधी नाही ते पोलीस आले. हे आजपासून एक वर्षापूर्वी घडले. त्याने एका दुसऱ्या इटालीयनला रस्त्यात भोसकले. पोलीस त्याच्या मागावर असतांना, तो कामावर आला. इथेच त्याला पोलीसांनी पकडले. त्याचे नाव बेप्पो होते ---- त्याचे दुसरे नाव असले, तर मला माहिती नाही. अशा माणसाला कामावर ठेवणारा मी, मूर्खच होतो. पण तो काम चांगले नव्हे, तर उत्कृष्ट करे."

त्याला किती शिक्षा झाली?"

"त्याने भोसकलेला माणूस जगला. त्यामुळे बेप्पो एक वर्षात तुरुंगातून सुटला. तो आता बाहेर आहे, याबद्दल मला काही संशय नाही. पण त्याने इथे फिरकण्याचे धाडस केले नाही. त्याचा एक लांबचा भाऊ इथे आहे आणि मला वाटते बेप्पो आता कुठे आहे, ते तो तुम्हाला सांगू शकेल."

होम्स ओरडला, "नको. नको. मी तुम्हाला विनंती करतो, त्याला याबद्दल एकही शब्द बोलू नका. ही गोष्ट महत्वाची आहे आणि मी त्यात पुढे जाईन, तसे त्याचे महत्व आणखी वाढेल. तुम्ही रजिस्टरमधील पुतळ्यांच्या विक्रीची नोंद दाखवलीत, त्यावर तारीख मागील वर्षाची ३ जून ही होती. बेप्पोला अटक झाल्याची तारीख तुम्ही सांगू शकाल का?"

व्यवस्थापक काही पाने उलटत उत्तरला, "मी पैशांच्या पावतीवरून अंदाजे तारीख सांगू शकतो. हो. त्याला २० मेला शेवटचे पैसे दिले होते."

होम्स बोलला, “आभारी आहे. मला वाटते तुमच्या वेळावर व शांतपणावर, परत घाला घालायची गरज मला पडणार नाही.” या बाबतीत अजून कोणाला काही सांगू नका, अशी काळजीपूर्वक सूचना देऊन, आम्ही पश्चिमेकडे चालू पडलो.

एका खानावळीत आम्हाला घाईने जेवण करायला, दुपार उलटून गेली होती. तिथे आत शिरतांना आम्हाला ‘केन्सिग्टनला एका वेड्या माणसाकडून भीषण खून’ अशी बातमी ऐकायला मिळाली. त्यावरून आमच्या लक्षात आले, की मिस्टर होरास हर्करने त्याचा लिखित मजकूर, वर्तमानपत्राकडे दिला असावा. त्या घटनेबद्दल लोकांची उत्सुकता चाळवेल व त्यांच्या भावनेला हात घालेल असे सनसनाटी दोन रकाने भरून मजकूर लिहिलेला दिसला. होम्सने खाता खाता ते वाचले. एकदोनदा तो गालातल्या गालात हसला.

तो म्हणाला, “वॉटसन, हे ठीक आहे. हे ऐकः

“या केसमध्ये मतमतांतरे असू शकत नाहीत, हे समाधानकारक आहे. नेमलेला अनुभवी गुप्तहेर, लेस्ट्रेड आणि खूप अनुभव असलेला तज्ञ सल्लागार शेरलॉक होम्स हे दोघेही अशा निर्णयाला आले आहेत, की दुःखांत शेवट असलेला विनोदी, कुरूप घटनाक्रम, हा जाणून बुजून घडवून आणलेल्या गुन्ह्यापेक्षा, वेडाच्या भरात झालेला असावा. सर्व बाबी लक्षात घेता, फक्त मानसिक असंतुलन हेच कारण वाटते आहे.

“वॉटसन, जर तुम्हाला ती कशी वापरायचे, ते समजले तर छापखाना ही मोठी मूल्यवान संस्था आहे. आणि आता, जर तुझे सर्व काही झाले असेल, तर आपण केन्सिग्टनला परत जाऊ. हार्डिंग ब्रदर्सचा व्यवस्थापक, या प्रकरणाबद्दल काय म्हणतो आहे, ते बघू.”

त्या मोठ्या दुकानाचा संस्थापक एक चपळ व आकर्षक, व्यवस्थित पोशाख केलेला, समजुतदार व बोलायला उत्सुक असा होता.

“हो सर, मी संध्याकाळच्या वर्तमानपत्रात आधीच सर्व वृतांत वाचलेला आहे. हा आमचे गिऱ्हाईक आहे. काही महीन्यांपूर्वी आम्ही त्याला ते पुतळे विकले. आम्ही गेल्डर आणि कंपनीकडून तसले तीन पुतळे मागवले होते. ते सगळे विकले गेले. कोणाला? ओहो, मी माझे विक्रीचे पुस्तक बघून सांगतो. हे बघा इथे सर्व लिहिलेले आहे. एक मिस्टर हर्करना, एक चिस्विक येथील लाबरनम लॉजच्या मिस्टर जोसीह ब्राउनला आणि एक रीडिंग येथील खालच्या ग्रोव्ह रस्त्यावरील मिस्टर सँडेफोर्डला विकले. तुम्ही फोटो दाखवलेल्या माणसाचे तोंड मी कधीच बघितलेले नाही. तो चेहरा विसरण्यासारखा नाही. इतका कुरूप चेहरा मी कधी पाहिला नसेल. आमच्याकडे कोणी काम करणारे लोक आहेत का? हो सर, खूप इटालीयन कामगार आहेत. त्यांना विक्रीपुस्तक बघायचे असेल, तर बघता येते. त्या पुस्तकावर करडी नजर ठेवायचे, काही कारण नाही. ठीक आहे. हे जरा विचित्र वाटते. तुम्हाला अजून काही चौकशी करायची असेल, तर जरूर करू शकता.”

मिस्टर हार्डिंग बोलत असतांना, होम्सने खूप टिपणे काढली होती. चौकशी सफल झाल्याचे, त्याच्या चेहऱ्याकडे बघून मला कळत होते. त्याने काही शेरेबाजी केली नाही. तो फक्त एवढेच बोलला, की आपण घाई केली नाही, तर लेस्ट्रेडला भेटायची वेळ चुकेल. आणि खात्रीने तसेच झाले. आम्ही बेकर रस्त्याला पोचलो, तेव्हा लेस्ट्रेड तिथे आधीच आलेला होता. तो अधीर होऊन फेऱ्या मारतांना, आम्हाला दिसला. त्याचे महत्वपूर्ण हावभाव बघून, त्याचे दिवसभराचे श्रम फुकट न गेल्याचे समजत होते.

त्याने विचारले, “मिस्टर होम्स, तुमचे नशीब कसे काय ठरले?”

माझ्या मित्राने स्पष्टीकरण दिले. “आमचा दिवस फार व्यग्रतेचा गेला. पण पूर्णपणे फुकट गेला, असे नाही. आम्ही दोन्ही किरकोळ दुकानदारांना व घाऊक विक्री करणाऱ्यालादेखील भेटलो. आता सुरवातीपासून मी पुतळ्यांचा मागोवा घेऊ शकतो.”

लेस्ट्रेड किंचाळला, “पुतळे, ठीक आहे तुमच्या तुमच्या पद्धती आहेत. मिस्टर शेरलॉक होम्स, मला त्याविरुद्ध काही बोलायचे नाही. पण मला वाटते, मी तुमच्यापेक्षा जास्त चांगले काम केले आहे. मी मेलेल्या मनुष्याला ओळखून काढले आहे.”

“काय म्हणतोस?”

“आणि गुन्ह्याचे कारण समजले.”

“मस्त!”

आमच्याकडे सॅफ्रॉन हिल नावाचा इटालीयन वस्तीतील एक विशेष इन्स्पेक्टर आहे. तर, या मृत माणसाच्या मानेभोवती एक रंगीत कॅथॉलीक चिन्ह आहे. त्यावरून मला असे वाटले, की तो दक्षिणेकडील असावा. इन्स्पेक्टर हिलने त्याला बघताक्षणी ओळखले. त्याचे नाव पेट्रो व्हेन्युसी आहे. तो नॅपल्सचा असून लंडनमधील प्रसिद्ध गुन्हेगार आहे. तो माफियांशी संबंधित आहे. तुम्हाला माहिती असल्याप्रमाणे, ती एक गुप्त राजकीय संस्था आहे. ते हुकूम देऊन खून घडवून आणतात. आता तुम्हाला समजेल, की प्रश्न कसा सुटत आलेला आहे. दुसरा माणूसही बहुधा इटालीयन असून, माफियांशी संबंधित आहे. त्याने काही नियम तोडले. त्यामुळे पेट्रोला त्याच्या मागावर पाठवले गेले. मृत माणसाच्या खिशात सापडलेला फोटो त्याचाच आहे. चुकून दुसऱ्या कुणाचा खून केला जाऊ नये, म्हणून तो ठेवलेला असावा. तो त्या माणसाचा पाठलाग करतो, त्याला घरात शिरतांना बघतो, त्याची वाट बघत बाहेर थांबतो आणि मारामारीत स्वतःच जखमी होऊन मारला जातो. हे कसे काय वाटते, मिस्टर शेरलॉक होम्स?

होम्स खुषीने टाळ्या वाजवतो व ओरडतो, “झकास, लेस्ट्रेड झकास! पण तुझे पुतळे फोडण्याचे स्पष्टीकरण, माझ्या लक्षात आले नाही.”

पुतळे! ते कधीच तुमच्या डोक्यातून बाहेर पडत नाहीत. शेवटी, हे काहीच नाही. खासगी मालमत्तेची छोटीशी चोरी, फार तर सहा महिने शिक्षा. आपण खरे तर खुनाचा शोध घेत आहोत. तुम्हाला सांगतो, मी सर्व धागेदोरे माझ्या हातात आणतो आहे.”

“पुढे काय?’

“अगदी साधे आहे. मी हिलबरोबर इटालियन घरी जाईन. फोटोतील माणूस शोधून काढीन व त्याला खुनाच्या आरोपाखाली अटक करीन. तुम्ही आमच्याबरोबर याल का?”

“मला वाटते, नाही. माझ्या मते या प्रकरणाचा शेवट, सोप्या पद्धतीने होईल. मी खात्री देऊ शकत नाही. कारण ते सगळे अशा गोष्टींवर अवलंबून आहे, की ज्या आपल्या हातात नाहीत. पण मला खूपच आशा आहे. खरे तर दोनास एक अशी पैज मी लाऊ शकतो. तू जर आमच्याबरोबर आज रात्री आलास, तर मी त्याला तुझ्या हवाली करू शकतो.”

“इटालियन घरी?”

“नाही. मला वाटते चिस्विक येथील पत्त्यावर तो मिळायची जास्त शक्यता आहे. लेस्ट्रेड, जर तू माझ्याबरोबर आज रात्री चिस्विकला आलास, तर मी तुझ्याबरोबर उद्या इटालियन घरी येण्याचे कबूल करतो. आणि उशीर झाला, तरी काही बिघडणार नाही. आता मला वाटते, काही तास झोप घेणे, आपल्या सर्वांसाठी चांगले राहील. कारण मी अकरापूर्वी निघणार नाही आहे. आणि आपल्याला परत यायला निदान पहाट होईल. लेस्ट्रेड, तू आमच्याबरोबर जेव. आणि नंतर निघेपर्यंत सोफ्यावर झोप. वॉटसन, मधल्या वेळात मला एक पत्र त्वरेने पाठवायचे असल्याने, तू ती जलद व्यवस्था केलीस, तर मला आनंद होईल.”

रोजच्या जुन्या कागदांच्या फाईल्स भरलेली एक अडगळीची खोली आमच्याकडे होती. त्या फाईल्स वाटेल तशा पद्धतीने उपसत, होम्सने संध्याकाळ घालवली. शेवटी एकदाचा तो उठला, तेव्हा त्याच्या डोळ्यात विजय दिसत होता. पण त्याच्या संशोधनाबद्दल, आमच्यापैकी

कुणालाच तो काही म्हणाला नाही. या गुंतागुंतीच्या केसमधील प्रत्येक पायरी तो कशी चढत गेला, ते मला हळूहळू कळले. आणि तरीही अजून त्याने ध्येय कसे गाठले हे मला समजले नव्हते. विनोदी, कुरूप गुन्हेगार दोन उरलेल्या पुतळ्यांवर हल्ला करणार, व त्यातील एक माझ्या आठवणीप्रमाणे चिस्विक येथील असणार असा अंदाज होम्स करत असल्याचे, मला नक्की समजले होते. त्याला ते कृत्य करतांना पकडायचे, असा आमचा प्रवासाचा हेतू असल्याचे मला कळले होते. संध्याकाळच्या वर्तमानपत्रात चुकीचा सुगावा घालून, माझ्या मित्राने केलेल्या लबाडीची मी वाखाणणी केली. त्यामुळे पकडला न जाता, तो चोर त्याचा बेत अंमलात आणू शकत होता. माझ्याबरोबर मी माझे पिस्तुल घ्यावे, असे मला होम्सने सुचवले, तेव्हा मला काही नवल वाटले नाही. त्याचे आवडते शस्त्र असलेले शिकारीचे पिस्तुल, त्याने स्वतःजवळ बाळगले होते.

अकरा वाजता चारचाकी दारात येऊन थांबली. त्यातून आम्ही हॅमरस्मिथ पुलाच्या दुसऱ्या बाजूला गेलो. इथे टांगेवाल्याला थांबवून ठेवले. थोडे चालून आम्ही, एका छान घरे असलेल्या निवांत रस्त्यावर आलो. प्रत्येक घराला ऐसपैस जागा होती. रस्त्यावरील दिव्याच्या उजेडात आम्ही गेटवर लबर्नम व्हिला असे लिहिलेले वाचले. मालक नक्की झोपला होता कारण सर्वत्र अंधार होता. फक्त हॉलच्या दरवाज्यावरील दिवा चालू होता. त्याचा पुसट गोलसर प्रकाश बागेच्या वाटेवर पडला होता. रस्त्यापासून बाग अलग करणाऱ्या लाकडी कुंपणाची गडद सावली आतील बाजूस पडली होती. तेथून आम्ही हळूहळू पुढे सरकलो.

होम्स कुजबुजला, "मला भीती वाटते की तुम्हाला बराच वेळ थांबावे लागेल. आपले नशीब बरे असल्याने, निदान पाऊस पडत नाही आहे. वेळ घालवायला आपल्याला सिगरेट ओढता येईल, असे मला वाटत नाही. तरीही हा त्रास भोगल्याबद्दल, आपल्याला काही लाभ होण्याची पन्नास टक्के शक्यता आहे."

तरी आमचा जागरणाचा वेळ, होम्सने भीती घातल्याइतका फार नव्हता. तो अचानक विचित्र पद्धतीने संपला. क्षणात काही आवाज न होता, तो येत असल्याची चाहूल लागली. बागेचे दार सताड उघडले आणि एक बारीक, डौलदार, काळसर व एखाद्या माकडासारखी चपळ आकृती, बागेतून पुढे आली. दारातून त्या दिशेने झटपट प्रकाश पडलेला, आम्ही पाहीला आणि घराच्या काळ्या सावलीत नाहीसा झाला. खूप वेळ शांतता होती. तो मनुष्य घरात शिरत होता. आम्ही अचानक अंधारी कंदिलाचा उजेड खोलीच्या आत बघितला. आम्ही जे शोधत होतो, ते तिथे नव्हते. कारण नंतर दुसऱ्या पडद्यातून आम्हाला उजेड दिसला आणि नंतर अजून दुसऱ्या.

“चला, आपण उघड्या खिडकीशी जाऊ. त्याने बाहेर उडी मारल्याबरोबर आपण त्याला पकडू.”

पण आम्ही हलण्यापूर्वी तो मनुष्य पुन्हा बाहेर आला. तो उजेडाच्या झरोक्यात आल्यावर, त्याने हाताखाली काहीतरी पांढरे धरलेले आम्ही पाहीले. त्याने काळजीपूर्वक आजूबाजूला बघितले. सुनसान रस्त्यावरील शांततेने त्याला धीर आला. आमच्याकडे पाठ करून, त्याने त्याचे ओझे खाली ठेवले. पुढच्याच क्षणी मोठा आवाज झाला त्यापाठोपाठ काही एकमेकावर आपटल्यासारखा किंवा जोरात दार खटखटवल्यासारखा आवाज आला. तो माणूस तो जे काही करत होता, त्यात इतका गुंगून गेला होता की आम्ही गवतातून पुढे सरकल्याचे त्याला समजले नाही. वाघासारखी झेप घेऊन होम्सने त्याच्या पाठीवर झडप घातली. आणि क्षणभराने लेस्ट्रेडने व मी त्याची कंबर व हात धरले. त्याला वळवल्यावर, त्याचे भेसूर फिकट पिवळे तोंड व आमच्याकडे एकटक बघणारे भयानक थरथरणारे, शरीर दिसले. मला कळले की आम्ही पकडलेला माणूस खरच फोटोतील माणूस होता. पण होम्सचे लक्ष्य असलेला कैदी तो नव्हता. दाराच्या पायऱ्यांजवळ गुडघ्यांवर बसून, तो त्या माणसाने काय आणले ते लक्षपूर्वक बघत होता. आम्ही त्या सकाळी पाहिला, तसाच नेपोलिअनचा पुतळा त्यात होता. त्याचेही तसेच तुकडे करण्यात आले होते. प्रत्येक फुटका तुकडा होम्सने

बारकाईने बघितला. तो आधीच्या फुटक्या प्लॅस्टरच्या तुकड्यांपेक्षा काही वेगळा नव्हता. त्याचे निरीक्षण संपते, तोच हॉलमधील दिवे लागले व दार उघडले. घराचा मालक, शर्टपँट घातलेली, आनंदी, जाडजूड आकृती बाहेर आली.

होम्स बोलला, “मला वाटते, मिस्टर जोसीह ब्राउन?”

“हो सर, आणि तुम्ही नक्कीच शेरलॉक होम्स? मला जलद गतीने पाठवलेली तुमची चिठ्ठी मिळाली. आणि तुम्ही सांगितल्याबरहुकूम मी केले. आम्ही आतून सगळी दारे कुलुपबंद केली आणि वाट बघत बसलो. तर मी खूष आहे की तुम्ही त्या हलकटाला पकडलेत. सभ्य गृहस्थहो, मी अशी आशा करतो की तुम्ही आत येऊन काही खाणे खाल.”

पण लेस्ट्रेड त्याच्या कैद्याला तुरुंगात टाकायला उत्सुक होता. त्यामुळे काही मिनिटात आमची गाडी चौघांसकट लंडनच्या दिशेने निघाली. आमचा कैदी एकही शब्द बोलला नाही. पण तो आमच्याकडे त्याच्या राठ केसांच्या सावलीमधून, डोळे फाडून बघत होता. माझा हात त्याच्या पकडीत आल्यावर, त्याने भुकेल्या लांडग्यासारखी त्यावर झेप घेतली. आम्ही खूप वेळ पोलीस स्टेशन मध्ये होतो. त्याच्या झडतीत फक्त काही शिलिंग व एक आच्छादित चाकू मिळाला. त्याच्या मुठीवर ताज्या रक्ताचे बरेच डाग आढळले.

जातांना लेस्ट्रेड म्हणाला, “ठीक आहे. हिल सगळ्या बड्या लोकांना ओळखतो. तो आपल्याला त्या माणसाचे नाव सांगेल. तुम्हाला कळेल की माझी माफियाची बाबच खरी ठरेल. पण तुम्ही ज्या चतुराईने त्याला पकडलेत, त्यामुळे मी तुमचा ऋणी आहे, मिस्टर होम्स, मला अजूनही ते नीटसे समजलेले नाही.”

होम्स म्हणाला, “स्पष्टीकरण द्यायला आता फार उशीर झाला आहे. शिवाय त्यातील एकदोन मुद्दे अजून नक्की झाले नाहीत. शेवटपर्यंत ही केस तडीस न्यायला हवी. उद्या सहाच्या सुमारास तू जर माझ्या खोलीवर आलास, तर मला वाटते मी तुला दाखवू शकेन की अजून या प्रकरणातील सर्व गोष्टींचा अर्थ तुला समजलेला नाही. गुन्हेगारीच्या इतिहासातील आद्य अशा

या गोष्टी आहेत. वॉटसन, माझ्या समस्या जशा क्रमाने येत गेल्या, तशा जर मी तुला लिहायला सांगितल्या, तर मला वाटते की तू या नेपोलिअनच्या पुतळ्यांच्या आगळ्यावेगळ्या साहसाबद्दल, तुझी पानेच्या पाने रुचीपूर्णतेने भरवशील."

जेव्हा दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही पुन्हा भेटलो, तेव्हा लेस्ट्रेडकडे त्या कैद्याविषयो भरपूर माहिती जमली होती. त्याचे नाव आधी म्हटल्याप्रमाणे, बेप्पो होते. दुसरे नाव माहिती नव्हते. इटालीयन घरांमध्ये तो 'कधीच चांगला नाही', असा प्रसिद्ध होता. कधी काळी तो उत्तम शिल्पकार होता व इमानेइतबारे चरितार्थ चालवीत होता. पण तो वाममार्गाला लागला. दोनदा तुरुंगाची हवा खाऊन आला. एकदा लहान चोरीबद्दल व एकदा, आपण ऐकल्याप्रमाणे, गावातील एका माणसाला भोसकल्याबद्दल. तो इंग्लिश चांगले बोलू शके. त्याचे पुतळे नष्ट करण्यामागचे कारण अजून गुलदस्त्यातच होते. त्याविषयी काही बोलायचे त्याने नाकारले. पण पोलिसांनी असा शोध लावला, की हे सारखे पुतळे कदाचित त्यानेच स्वतःच्या हातांने बनवले असतील. कारण तो गेल्डर आणि कंपनीच्या सुरवातीच्या काळात तिथे काम करत होता. यातील बरेचसे आधीच माहिती होते. तरी होम्सने सर्व काही नम्रपणे लक्ष देऊन ऐकून घेतले. पण मी त्याला पूर्ण ओळखून असल्याने, मला कळत होते की त्याचे विचार कुठेतरी भलतीकडेच आहेत. थोडा अस्वस्थपणा व मनातील अपेक्षा यांचे मिश्रण, त्याने चेहऱ्यावर चढवलेल्या मुखवट्याआडून मला दिसत होते. शेवटी तो खुर्चीतून उठला. त्याचे डोळे चमकले. दाराची घंटी वाजली. मिनिटाभराने आम्हाला पायरव आला. आणि एक वयाने मोठा, लाल तोंडाचा, करड्या मिशांचा इसम आत आला. त्याच्या उजव्या हातात, जुन्या पद्धतीची एक पिशवी धरली होती. ती त्याने गालिच्यावर ठेवली.

"मिस्टर शेरलॉक होम्स आहेत का?"

माझ्या मित्राने पुढे झुकून अभिवादन केले. त्याने विचारले, "रीडिंगचे मिस्टर सँडेफोर्ड का?"

“हो सर, मला वाटते, मला थोडा उशीर झाला आहे. पण गाड्यांच्या वेळा विचित्र होत्या. तुम्ही मला माझ्याकडील पुतळ्याबद्दल लिहिले होतेत.”

“बरोबर.”

“मी हे तुमचे पत्र आणले आहे. तुम्ही म्हणालात, ‘मला नेपोलिअनच्या सुंदर मूर्तीची हुबेहूब नक्कल माझ्याकडे असली तर आवडेल. मी तुमच्याकडील मूर्तीसाठी दहा पौंड मोजायला तयार आहे.’ बरोबर?’

“नक्की.”

मला तुमच्या पत्राचे फार आश्चर्य वाटले. कारण मला कळेना की तसा पुतळा माझ्याकडे असल्याचे, तुम्हाला कसे समजले.”

“अर्थात तुम्हाला आश्चर्य वाटणे साहजिक होते. पण स्पष्टीकरण अगदी साधे आहे. हार्डिंग ब्रदर्सचे मिस्टर हार्डिंग मला म्हणाले की त्यांनी तुम्हाला त्यांच्याकडील शेवटचा पुतळा दिला. त्यांनीच मला तुमचा पत्ता दिला.”

“ओहो, असे झाले काय! त्यांनी तुम्हाला मी त्याची काय किंमत मोजली, ते सांगितले का?”

“नाही.”

“हे बघा, मी फार श्रीमंत नसलो तरी प्रामाणिक मनुष्य आहे. मी फक्त पंधरा शिलींगला तो घेतला. आणि मी तुमच्याकडून दहा पौंड घेण्यापूर्वी, तुम्हाला हे माहिती पाहिजे.”

“मिस्टर सँडेफोर्ड, मला खात्री आहे की नैतिकता तुमचा मान वाढवते. पण मी एकदा जी किंमत सांगितली, त्याला चिकटून रहाणे मी पसंत करीन.”

“ठीक आहे. हा तुमचा चांगुलपणा आहे. मिस्टर होम्स, तुम्ही सांगितल्याप्रमाणे, मी माझ्याबरोबर पुतळा आणला आहे.’ त्याने त्याची पिशवी उघडली आणि शेवटी आम्ही तुकडे केलेल्या स्वरूपात एकापेक्षा जास्त वेळा पाहीलेला तो पुतळा टेबलावर ठेवलेला पाहीला.

होम्सने खिशातून कागद काढला व दहा पौंडाची नोट टेबलावर ठेवली.

“मिस्टर सँडेफोर्ड, एका साक्षीदाराच्या हजेरीत, तुम्ही कृपया कागदावर सही करा. त्यामुळे अशी साधी गोष्ट होईल, की तुम्ही या पुतळ्यावरचा हक्क सोडला आहे, हे सिद्ध होईल. असे बघा, मी पद्धतशीर माणूस आहे आणि नंतर गोष्टी कशा वळण घेतील, ते सांगता येत नाही. मिस्टर सँडेफोर्ड, मी तुमचा आभारी आहे. हे तुमचे पैसे, आणि शुभ संध्याकाळ.”

जेव्हा आमचा पाहुणा गेला, तेव्हा होम्सच्या हालचालींनी आमचे लक्ष वेधून घेतले. त्याने खणातून स्वच्छ पांढरे फडके घेतले व टेबलावर अंथरले. मग त्याने नवीन विकत घेतलेला पुतळा त्या कापडाच्या मध्यभागी ठेवला. नंतर त्याचे ठोसा मारायचे शस्त्र काढून नेपोलिअनच्या डोक्यावर एक प्रहार केला. ती आकृती फुटली. होम्स तुकड्यांचे निरीक्षण करू लागला. पुढच्याच क्षणी, त्याने विजयाची मोठी आरोळी मारली आणि एक गडद, गोल पुडिंगसारखा भाग आत असलेला तुकडा हातात घेतला.

तो ओरडला, “सभ्य गृहस्थहो, बोर्गीआच्या प्रसिद्ध काळ्या मोत्याशी मला तुमची ओळख करून देऊ दे.”

लेस्ट्रेड आणि मी क्षणभर गप्प बसलो. मग नाटकाचा समाधानकारक शेवट झाल्याप्रमाणे, उस्फूर्तपणे टाळ्या वाजवू लागलो. होम्सच्या गालांवर रंग चढला. प्रेक्षकांची दाद मिळालेल्या नायकासारखा, तो आमच्यापुढे झुकला. अशा क्षणी तो तर्काचे मशीन वाटण्याचे बंद होऊन, तो त्याच्या मानवी प्रेम, पसंती आणि वाखाणणी मिळवण्यासाठीच्या भावना प्रकट करु लागला. टोकाचा गर्विष्ठ आणि घुमा स्वभाव जाऊन, लोकांमधील प्रसिद्धीची नशा जाऊन, मित्रांकडून अगदी खोलवर व उस्फूर्त वाहवा मिळवण्याची अपेक्षा करू लागला.

तो बोलला, "आता जगात मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध पावलेला हा मोती आहे. जिथून तो हरवला त्या डाक्री हॉटेलमधील कोलोन्नाच्या राजकुमाराच्या झोपायच्या खोलीपासून, ते गेल्डर आणि कंपनीने बनवलेल्या नेपोलिअनच्या सहा पुतळयांमधील शेवटच्या पुतळ्यापर्यंत, ही सलग मालिका मी माझ्या चांगल्या नशीबाने तर्क करून शोधून काढली. लेस्ट्रेड, तुला आठवत असेल, या मूल्यवान रत्नाच्या नाहीसे होण्याने खळबळ उडाली होती आणि लंडन पोलीसांचे तो शोधायचे प्रयत्न फुकट गेले होते.

मी स्वतः त्या केसमध्ये सल्लागार म्हणून काम केले होते. पण मी त्यावर काही प्रकाश टाकू शकलो नाही. राजकुमारीच्या इटालिअन नोकराणीवर संशय घेतला गेला. असे सिद्ध झाले, की तिचा एक भाऊ लंडनमध्ये होता. पण त्यांच्यातील काही संबंध शोधून काढणे, शक्य झाले नाही. त्या नोकराणीचे नाव ल्युक्रेटिया व्हेन्युसी होते. आणि याबद्दल माझ्या मनात संशय नाही, की दोन रात्रींपूर्वी खून झालेला पिएट्रो हाच तो भाऊ होता. मी त्या जुन्या केसच्या फाईलमधील कागद शोधत होतो. आणि माझ्या लक्षात आले की मोती हरवण्याची घटनादेखील काही खूनखराबा केल्यावरून बेप्पोला अटक करण्याच्या दोन दिवस पूर्वीची होती ---- जेव्हा हे पुतळे बनवले गेले, त्याच वेळी गेल्डर आणि कंपनीच्या कारखान्यात ही गोष्ट घडली होती. आता तुम्हाला स्पष्टपणे घटनाक्रम लक्षात येईल. अर्थात तुम्ही तो उलट्या क्रमाने, मला तो जसा समजला, त्याप्रमाणे बघाल. बेप्पोच्या ताब्यात तो मोती होता. त्याने तो पिएट्रोकडून चोरला असावा. तो पिएट्रोचा सहकारी असावा. तो पिएट्रो व त्याच्या बहिणीमधील माणूस असावा. यापैकी कुठली गोष्ट खरी, याबद्दल आता आपल्याला काही देणेघेणे नाही.

"मुख्य गोष्ट ही आहे, की जेव्हा त्याच्याकडे तो मोती होता, त्याच वेळी पोलीसांनी त्याचा पाठलाग केला. तो ज्या कारखान्यात काम करे, तिथे तो गेला. अशी मूल्यवान वस्तू लपविण्यासाठी त्याच्याकडे फक्त काही मिनिटे होती. नाहीतर तो मुद्देमालासकट पकडला गेला असता. नेपोलिअनचे सहा पुतळे पॅसेजमध्ये वाळत पडले होते. त्यातील एक अजून

ओलसर मऊ होता. त्याने त्या ओल्या प्लॅस्टरमध्ये एक भोक पाडले व त्यात तो मोती टाकून त्यावर हात फिरवून तो पृष्ठभाग पहिल्यांदा होता तसा केला. ती लपवण्याची फारच नामी जागा होती. कोणालाच ती कळली नसती. पण बेप्पोला एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली आणि मध्यंतरीच्या काळात ते सहा पुतळे लंडनच्या विविध भागांमध्ये विकले गेले. त्यापैकी कुठल्या पुतळ्यात त्याने घबाड लपविले आहे, हे त्याला समजेना. ते फोडूनच फक्त ते समजणे शक्य होते. नुसते हलवूनही काही कळले नसते. कारण प्लॅस्टर ओले असतांना मोती त्याला चिकटून बसला असण्याची शक्यता होती. बेप्पो हताश न होता हुशारीने व चिकाटीने त्याची कारवाई करू लागला. गेल्डर आणि कंपनीच्या कारखान्यात काम करणाऱ्या त्याच्या एका भावामार्फत त्याने ते पुतळे कोणाला विकले ते शोधून काढले. त्याने मोर्स हडसनच्या दुकानात नोकरी मिळवायचा प्रयत्न केला. आणि अशा तऱ्हेने तीन पुतळ्यांचा निकाल लावला. त्यात मोती न सापडल्याने काही इटालीअन कामगारांच्या मदतीने त्याला इतर तीन पुतळ्यांचा शोध लागला. त्यातील पहीला हर्करकडे होता. तिथे बेप्पोने मोती हरवला असे वाटणाऱ्या त्याच्या सहकाऱ्याकडून, त्याचा पाठलाग केला गेला व मारामारीत त्या सहकाऱ्याला भोसकले गेले."

मी विचारले, "तो जर त्याचा सहकारी होता, तर मग बेप्पोचा फोटो कसा काय त्याच्या खिशात होता?"

"जर कुणा तिसऱ्या व्यक्तीला त्याच्याबद्दल विचारायची वेळ आली, तर काय दाखवणार म्हणून. हेच कारण असणार. आणि खुनानंतर माझ्या अंदाजाप्रमाणे, बेप्पो त्याच्या हालचाली हळू करण्यापेक्षा नक्की घाई करणार, हे उघड होते. त्याला पोलिसांची भीती होती. त्यामुळे ते येण्यापूर्वी, तो घाईने पळून गेला. अर्थात हर्करकडील पुतळ्यात त्याला मोती सापडला नाही, असे मी म्हणू शकत नाही. मला तो नक्की मोतीच आहे का, हे देखील माहिती नव्हते. पण माझी एवढी खात्री होती की तो काहीतरी शोधत होता. कारण काही घरे टाळत, त्याने तो पुतळा जिथे डोक्यावर दिवा होता, तिथे आणून ठेवला होता. ज्याअर्थी हर्करकडील पुतळा

तीनपैकी एक होता. त्यामुळे मी तुम्हाला सांगितले तसे घडण्याची, त्यात मोती असण्याची, खूप शक्यता होती ---- पन्नास टक्के. आता दोन पुतळे राहिले होते. हे उघड होते की तो लंडनचा पुतळा पहिल्यांदा फोडून बघेल. परत एखादी दुःखांतिका घडायला नको म्हणून, मी घरातील लोकांना सावध केले. सर्वात सुंदर परिणाम झाल्याच्या आनंदात आपण गेलो. अर्थात तोपर्यंत, मला एवढे नक्की समजले होते की आपण बोर्गीआ मोत्याच्या मागे होतो. खुनी इसमाच्या नावाने एक घटना दुसरीशी जोडली गेली. आता एकच पुतळा राहिला ---- रीडिंगचा ---- आणि मोती त्यातच असणार हे नक्की झाले. मी तो तुमच्या देखत त्याच्या मालकाकडून विकत आणला ---- तो इथे आहे.

आम्ही क्षणभर गप्प बसलो.

लेस्ट्रेड म्हणाला, “मी तुम्हाला अनेक केसेस हाताळतांना पाहिले आहे. मिस्टर होम्स, पण या केसपेक्षा जास्त कारागिरी व कसब, मी कधीच कुठे पाहिले नव्हते. आम्ही स्कॉटलंडचे लोक तुमचा हेवा करत नाही. नाही सर, आम्हाला तुमचा अभिमान वाटतो. आणि उद्या तुम्ही तिथे आलात, तर सर्वात वयस्क इन्स्पेक्टरपासून सर्वात तरुण इन्स्पेक्टरला तुमच्याबरोबर हस्तांदोलन करायला आवडेल.”

होम्स बोलला, “आभारी आहे. आभारी आहे.” एवढे बोलून तो वळून गेला, तेव्हा मला वाटले, की मी कधीही न पाहिलेल्या खऱ्याखुऱ्या मानवी भावनांच्या प्रदर्शनाने, त्याला गहिवरून आले होते.

थोड्या वेळाने तो परत नेहमीसारखा थंड व व्यवहारी विचार करणारा झाला. तो म्हणाला, “वॉटसन, मोती बँकेच्या सुरक्षा खणात ठेव. आणि काँक सिंगलटन सह्याचोरीचे कागद बाहेर काढ. लेस्ट्रेड, अच्छा. जर तुला काही बारीकसारीक समस्या आली, तर त्यावर एखाददोन उपाय सांगायला मला आवडेल.”

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. वृषाली जोशी यांचे हे तेरावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. डॉ. वृषालींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२२ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १४ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

*आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।*
*दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।*